# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग-२ : शिक्षणशास्त्र**

**सत्र-३ :** OE III

# शिक्षण आणि नागरिकत्व भाग २

(Education and Citizenship Part - II)

**सत्र-४ :** OE IV

# मानवी हक्क शिक्षण

(Human Rights Education)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
बी. ए. भाग - २ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ५००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-993929-5-3

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
प्र. अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती ज्योती जाधव**
प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : शिक्षणशास्त्र ■**

**प्राचार्य (डॉ.) बी. पी. मरजे,**
श्रीमती पुतळाबेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगली

- **डॉ. सी. पी. सोनकांबळे,**
  शिक्षणशास्त्र अधिविभाग
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. व्ही. एस. खंडागळे,**
  शिक्षणशास्त्र अधिविभाग
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. आरती भोसले,**
  छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ एज्युकेशन रुकडी,
  ता. हातकणंगले जि. कोल्हापूर
- **डॉ. अतुल गायकवाड,**
  आय. आर. ए. एज्युकेशन सोसायटीज,
  कॉलेज ऑफ एज्युकेशन, आर्वी (पुणे)
- **डॉ. नंदकुमार धनवडे,**
  'स्नेहांकुर' शाहूनगर, कराड रोड, विटा
  ता. खानापूर,जि सांगली
- **डॉ. प्रमोद लंबे,**
  मा. श्री आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ एज्युकेशन,
  आष्टा,ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. मुक्ता पाटील,**
  कै. श्री हणमंतराव उर्फ बाळासाहेब गणपतराव खराडे कॉलेज
  ऑफ एज्युकेशन शिवाजी पेठ, कोल्हापूर
- **प्राचार्या (डॉ.) मेघा गुळवणी,**
  मॉडर्न कॉलेज ऑफ एज्युकेशन,विटा
  ता. खानापूर, जि. सांगली
- **डॉ. आय. एन. मुजावर**
  इचलकंरजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शहापूर
  इचलकंरजी, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर
- **डॉ. पी. बी. दराडे,**
  आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ अशोक पाटील,**
  वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, उरुण इस्लामपूर
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. सी. जी. खांडके,**
  कै. श्री हणमंतराव उर्फ बाळासाहेब गणपतराव खराडे कॉलेज
  ऑफ एज्युकेशन, शिवाजी पेठ, कोल्हापूर
- **डॉ. बी. एम. पाटील,**
  संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र
  महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र ३ : शिक्षण आणि नागरिकत्व भाग २**
**सत्र ४ : मानवी हक्क शिक्षण**
**बी. ए. भाग–२**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखकाचे नाव | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. जमिर मोमीन,**<br>आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज,<br>शुक्रवार पेठ, सातारा | १, २ | – |
| **डॉ. शशिकांत अन्नदाते**<br>महावीर महाविद्यालय, ७/ई, भाऊसिंगजी रोड,<br>कोल्हापूर, जि. कोल्हापूर | – | १, २ |

■ संपादक ■

**प्रा. (डॉ.) सुरेखा नंदकुमार धनवडे,**
आदर्श कॉलेज, विटा
ता. खानापूर, जि. सांगली

**प्रा. (डॉ.) नंदकुमार धोंडीराम धनवडे**
'स्नेहांकुर' शाहूनगर, कराड रोड, विटा
ता. खानापूर,जि सांगली

# प्रस्तावना

बी. ए. भाग दोन शिक्षणशास्त्र विषयासाठी 'शिक्षण आणि नागरिकत्व' तसेच 'मानवी हक्क शिक्षण' हे स्वयंअध्ययन साहित्य विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण विभागामार्फत तयार करण्यात आलेले हे स्वयंअध्ययन साहित्य विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांची जाण, नागरिकत्वाची जबाबदारी आणि मानवी हक्कांविषयी संवेदनशीलता निर्माण करण्याचा प्रयत्न करते. लोकशाही, न्याय, समता, स्वातंत्र्य व बंधुता या भारतीय राज्यघटनेतील मूलभूत मूल्यांची समज विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हे 'शिक्षण आणि नागरिकत्व' या अभ्यासक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. याचबरोबर, मानवी हक्कांची संकल्पना, इतिहास, उद्दिष्टे, स्त्री, बालक, अल्पसंख्याक व दिव्यांग यांचे हक्क यांची समग्र माहिती देऊन 'मानवी हक्क शिक्षण' या भागाचे लेखन केले आहे. हे स्वयंअध्ययन साहित्य विद्यार्थ्यांना सुजाण नागरिकत्वाच्या वाटचालीसाठी, भक्कम बौद्धिक व मूल्याधिष्ठित आधार देईल असा आमचा विश्वास आहे.

स्वयंअध्ययन साहित्य निर्मितीमध्ये मा. कुलगुरू, प्र. कुलगुरू, मा. कुलसचिव यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील, शिक्षणशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. पी. मरजे, अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, लेखक प्रा. डॉ. जमीर मोमीन व प्रा. डॉ. शशिकांत अन्नदाते आणि दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले. सर्वांचे त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार!

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) सुरेखा नंदकुमार धनवडे,**
आदर्श कॉलेज, विटा
ता. खानापूर, जि. सांगली

**प्रा. (डॉ.) नंदकुमार धोंडीराम धनवडे**
'स्नेहांकुर' शाहूनगर, कराड रोड, विटा
ता. खानापूर,जि सांगली

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | सत्र-३ : OE III | |
| | **शिक्षण आणि नागरिकत्व भाग २** | |
| १. | नागरिकत्व मूल्ये आणि सक्रीय नागरिकत्व | १ |
| २. | लोकशाही नागरिकत्व आणि राष्ट्रीय ध्येये | ३३ |
| | सत्र-४ : OE IV | |
| | **मानवी हक्क शिक्षण** | |
| १. | शिक्षण व मानवी हक्क | ६७ |
| २. | मानवी अधिकाराचे प्रश्न, चळवळी आणि संवर्धन | ८४ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२५-२६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक-१
## नागरिकत्व मूल्ये आणि सक्रीय नागरिकत्व
(Civic Values and Active Citizenship)


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ नागरिकत्व मूल्ये-संकल्पना, अर्थ आणि स्वरूप

१.२.२ नागरिकत्व मूल्यांच्या विकसनामध्ये शिक्षणाची भूमिका

१.२.३ भारतीय नागरिकांसाठी संविधानिक सुरक्षितता-हक्क व हमी

१.२.४ नागरिकत्व शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मता

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ सारांश

१.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.६ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ चिंतन व कार्य

१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


### १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला :-

१. शिक्षण आणि नागरिकत्व यांच्या संकल्पना आणि परस्पर संबंध समजून घेता येईल

२. नागरिकत्व मूल्यांची संकल्पना, अर्थ आणि स्वरूप समजून घेता येईल.

३. नागरिकत्व मूल्यांच्या विकसनामध्ये शिक्षणाची भूमिका स्पष्ट होईल.

४. भारतीय नागरिकांसाठी उपलब्ध संविधानिक सुरक्षितता-हक्क व हमी यांबाबत माहिती मिळेल.

५. नागरिकत्व शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मता यांचा सहसंबंध समजून घेता येईल.

### १.१ प्रस्तावना

मूल्यांच्या रुजवणूकीद्वारे एक सुजन, सुजाण आणि समाज जीवनात सक्रीय योगदान देणारा नागरिक घडविणे हे शिक्षणाचे मूलभूत कार्य आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधण्याचे शिक्षण एक प्रभावी साधन आहे. बालकाचा शारीरिक, बौद्धिक, भावनिक, मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक आणि अध्यात्मिक विकास करणे हेच शिक्षणाचे मूलभूत ध्येय आणि कार्य आहे. सकारात्मक अशा अपेक्षित वर्तन बदलास शिक्षण

म्हणतात. देशाचे भावी नागरिक घडविण्याचे सत्कार्य शिक्षणाच्या प्रक्रियेतून साधले जाते. शिक्षणाच्या माध्यमातून अभिरुची संपन्न अशी व्यक्तिमत्त्वे साकारणे हे देखील शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. उच्च दर्जाच्या अभिरुची माणसाला सुसंस्कृत व गुणवान बनवितात. याउलट हीन प्रकारच्या आवडी माणसांतला पशू जागा करतात. व्यक्तीच्या अभिरुची त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यास कारणीभूत ठरतात. साहित्य, संगीत, कला आणि क्रीडा क्षेत्रात अभिरुची असलेली व्यक्तिमत्त्वे समाज जीवनास उपकारक असतात. म्हणून शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात, सामाजिक जीवनात चांगल्या अभिरुचींची रुजवणूक होणे गरजेचे असते. नीतितत्त्वे, मूल्ये, आदर्श, आहार-विहार सवयी, कार्यक्षेत्र, छंद व फुरसदीच्या वेळेचा अभिरुची संपन्न सदुपयोग याबाबतीत विद्यार्थ्यांना जागरुक व निवडक करणे महत्त्वाचे आहे.

समाजाचे आरोग्य, विकास आणि स्थैर्य हे त्या समाजातील नागरिकांच्या विचारसरणीवर, वर्तनावर आणि मूल्यांवर अवलंबून असते. म्हणूनच मूल्य शिक्षण (Value Education) हे केवळ शैक्षणिक अभ्यासक्रमाचा भाग नसून, ते एक व्यापक आणि जीवनापर्यंत पोहोचणारे संस्कारांचं साधन आहे. योग्य मूल्यांची शिकवण ही व्यक्तीला केवळ एक सुशिक्षित नागरिक बनवते असे नाही, तर ती त्याला सजग, जबाबदार, संवेदनशील आणि विवेकी नागरिक बनवते. मूल्य शिक्षण म्हणजे काय? तर ते म्हणजे जीवनात महत्त्वाच्या नैतिक, सामाजिक, आध्यात्मिक आणि मानवी मूल्यांची शिकवण. यामध्ये सत्य, अहिंसा, सहिष्णुता, प्रामाणिकपणा, सहकार्य, दया, जबाबदारी, शिस्त आणि राष्ट्रप्रेम यांसारख्या गुणांचा समावेश होतो. या मूल्यांचे बीज बालपणापासूनच मनात रुजवणे गरजेचे असते. यासाठी कुटुंब, शाळा, समाजमाध्यमे आणि समाजातील इतर संस्था यांची महत्त्वाची भूमिका असते.

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित युगात शैक्षणिक प्रगती मोठ्या प्रमाणावर झाली आहे, परंतु नैतिक अधःपतनाची समस्या अधिक गंभीर बनली आहे. केवळ परीक्षेत चांगले गुण मिळवणारे विद्यार्थी समाजासाठी उपयुक्त ठरतातच असे नाही. जर त्यांच्या आचरणात नैतिक मूल्यांचा अभाव असेल, तर ते समाजात अनास्था, भ्रष्टाचार, स्वार्थ आणि हिंसा यांना प्रोत्साहन देणारे ठरू शकतात. म्हणूनच शिक्षण हे मूल्याधिष्ठित असले पाहिजे. शाळा आणि महाविद्यालये हे मूल्य शिक्षणाचे केंद्र असावेत. शिक्षकांनी केवळ पाठ्यपुस्तकांतील ज्ञान देण्याऐवजी मुलांमध्ये चांगले संस्कार रुजवण्यावर भर द्यावा. अभ्यासक्रमात समाजोपयोगी कार्य, गटचर्चा, नाट्याविष्कार, कथाकथन, जीवनमूल्यांवरील अनुभवकथा यांचा समावेश करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी केवळ 'मी' या संकल्पनेत अडकून न राहता, 'आपण' या व्यापक विचारांची अंगीकार करायला हवा.

कुटुंबातील वातावरण हे मूल्य शिक्षणासाठी अत्यंत प्रभावी ठरते. घरातील वडीलधारे आणि पालक मुलांसमोर जे वर्तन करतात, तेच मूल लवकर आत्मसात करते. त्यामुळे पालकांनी स्वतःच्या वर्तनातून मूल्यांची शिकवण द्यावी. जसे की: प्रामाणिकपणा, वेळेचे पालन, समाजाशी सुसंवाद, इतरांची मदत, स्वच्छतेची सवय इत्यादी. समाजमाध्यमे, चित्रपट, टीव्ही यांचे लहान वयातील मुलांवर खूप मोठे प्रभाव असतो. जर या माध्यमांद्वारे चुकीच्या मूल्यांचा प्रचार झाला, तर मुलांमध्ये गोंधळ निर्माण होतो. म्हणून माध्यमांनी देखील आपल्या सामाजिक जबाबदारीची जाण ठेवून सकारात्मक आणि प्रेरणादायी गोष्टी समाजापर्यंत पोहोचवल्या पाहिजेत. मूल्य शिक्षणामुळे नागरिकांची जडणघडण एका सशक्त पायावर होते. जबाबदार नागरिक घडण्यासाठी केवळ कायदे जाणणे पुरेसे नाही, तर त्या कायद्यांचा आदर करणे आणि समाजहितासाठी त्याचे पालन करणे आवश्यक आहे. मूल्याधारित नागरिक समाजातील इतर घटकांना प्रेरणा देतात. ते सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण

करतात, पर्यावरणाचे संरक्षण करतात, मताधिकाराचा योग्य वापर करतात, स्त्रियांचा व वयोवृद्धांचा सन्मान करतात आणि राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतात.

मूल्य शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये आत्मचिंतन, संयम, सहिष्णुता, विवेक आणि सहकार्य यासारखे गुण वाढतात. हेच गुण व्यक्तीला संकटांशी लढण्यासाठी मानसिक बळ देतात. अशा नागरिकांमुळे समाजात सौहार्द, शांतता, समता आणि न्याय या मूल्यांचे पालन होते. आज जगभर असहिष्णुता, हिंसा, स्वार्थ आणि दहशतीचे वातावरण पसरताना दिसते. याला उत्तर म्हणून मूल्य शिक्षण हाच प्रभावी उपाय आहे. जर प्रत्येक देशात नागरिक घडताना मूल्यांचे बीज रुजवले गेले, तर जागतिक शांतता व बंधुभाव शक्य आहे. मूल्य शिक्षण हे नागरिकांच्या जडणघडणीसाठी मूलभूत आणि अपरिहार्य आहे. याचे उद्दिष्ट केवळ शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे नसून, व्यक्तीमत्त्व घडवणे, सामाजिक उत्तरदायित्व निर्माण करणे आणि एक आदर्श समाजाची उभारणी करणे हे आहे. म्हणूनच प्रत्येक स्तरावर – कुटुंब, शाळा, माध्यमे व शासन – मूल्य शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. आपल्याला हवे आहेत केवळ हुशार नव्हे, तर सजग, संवेदनशील आणि सुसंस्कृत नागरिक – आणि त्यासाठी मूल्य शिक्षण हेच सर्वोत्तम साधन आहे.

सामाजिक परिवर्तनाचे आणि राष्ट्रविकासाचे प्रमुख साधन म्हणजे शिक्षण होय. जॉन ड्युई च्या शब्दात, शिक्षणाचे कार्य, असहाय्य अशा विकसनशील तरुण प्राण्याच्या आनंदी, नीतिमान आणि कार्यक्षम अशा मानवात होणाऱ्या रुपांतराला मदत करणे असे आहे. म्हणजेच बालकाला स्वत्वाची जाणीव करुन देणे आणि त्यान्वये त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे आणि समाजविकासासाठी समर्थ बनविणे हे शिक्षणाचे कार्य म्हणावे लागेल. म्हणूनच स्वामी विवेकानंदांच्या मते, शिक्षणाचे ध्येय मानव निर्माण करणे, हे यथार्थ वाटते. शिक्षणाद्वारे माणसाच्या सर्व शक्तींचा नैसर्गिक, सुसंगत, प्रगतशील विकास घडवून आणणे हेच शिक्षण आहे असे पेस्टॉलॉजीचे मत आहे. ॲरिस्टॉटलच्या मते शिक्षणाने सुदृढ शरीरात सुदृढ मन तयार झाले पाहिजे.

शिक्षण विशेषतः मानवी मनाची अशी शक्ती विकसित करते की तो माणूस सत्य, शिव व सौंदर्य हे सर्वोच्च विचार असणाऱ्या पूर्ण आनंदाचा अनुभव घेऊ शकतो. श्री. अरविंद घोष म्हणतात की, अंतरात्म्याचा विकास करण्यासाठी मदत करणे म्हणजे शिक्षण. डॉ. राधाकृष्णन शिक्षणाच्या कार्यावर प्रकाश टाकताना म्हणतात, शिक्षण म्हणजे केवळ बौद्धिक धडाडी नव्हे, माणसाच्या विविध प्रवृत्ती आणि भावना यांना परिस्थितीनुरूप सुसंस्कृत वळण लावणे म्हणजे शिक्षण होय. अशा प्रकारे भारतातील व पश्चिमात्य जगतातील अनेक अभ्यासकांनी तत्वचिंतकांनी आणि शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणाची यांची संकल्पना व व्याख्या सांगताना खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या कार्याविषयी भूमिका विषद केली आहे. शिक्षणाद्वारे नेमके कोणते कार्य अभिप्रेत आहे हे यातून स्पष्ट होते.

शिक्षणाचा बाळबोध अर्थ म्हणजे शाळेत जाणे. साक्षरता म्हणजे शिक्षण, अनेक परीक्षा पास करून पदव्या घेतलेली व्यक्ती म्हणजे शिकलेली व्यक्ती, असे शिक्षणाचे अनेक अर्थ व्यवहारात रूढ असले तरी शिक्षण म्हणजे ज्ञान किंवा विद्वता. गुरू, शिक्षक अथवा श्रेष्ठ अनुभवी व्यक्ती आपल्या शिष्यांवर संस्कार करून त्यांना मार्गदर्शन करतात व त्यांच्या वर्तनात सुयोग्य व अपेक्षित बदल घडवून आणतात. त्यावेळी त्या प्रक्रियेला शिक्षण म्हणतात. कोमेनियसच्या मते शिक्षण माणसाला नवा आकार देऊ शकते. जॉन्सनच्या मते, शिक्षण माणसाला घडविते किंवा बिघडविते. शिक्षणाचा आशय, स्वरूप व पद्धती चांगल्या असतील तर विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित बदल दिसून येतो. सा विद्या या विमुक्तये। सर्व प्रकारच्या भौतिक व शारीरीक बंधनातून माणसाला मुक्त करते ती विद्या. शिक्षण आपल्या मनाला अंतिम सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा देते. शिक्षणाला इंग्रजीमध्ये

Education असा शब्द आहे. लॅटिन भाषेनुसार Educare म्हणजे to nourish, to bring up - पालनपोषण करणे, वाढविणे, संवर्धन करणे आणि Educere म्हणजे to lead out, to draw out. याचाच अर्थ व्यक्तीच्या जन्मजात, सुप्त गुणांना जागृत करून, चालना देऊन त्यांचा आविष्कार करणे, विकास करणे.

एखाद्या राष्ट्राची स्थिती ठरवण्यासाठी ज्याप्रमाणे लोक आवश्यक असतात त्याचप्रमाणे शिक्षण माणसाला आकार देते. प्रत्येक राष्ट्राची स्थापना शिक्षणावर केली जाते कारण ते विशिष्ट स्तरावरील ज्ञान, नैतिकता आणि जागरूकता वाढवते आणि तंत्रज्ञानाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. उच्च साक्षरता दरामुळे देशामध्ये वेगवान GDP वाढ आणि बेरोजगारीचा दर कमी होतो. सध्या, राष्ट्रे अनेक समस्यांना तोंड देत आहेत, जसे की महामारी, दहशतवाद, ग्लोबल वॉर्मिंग, गरिबी आणि लैंगिक असमानता. मग ते निवासी असोत किंवा दैनंदिन शाळा, ते विद्यार्थी आणि राष्ट्र घडवण्यासाठी आवश्यक आहेत. प्रत्येकजण ज्याला उच्च दर्जाचे शिक्षण आहे ते या समस्यांचे निराकरण करण्यात आणि देशभरातील जीवनमान सुधारण्यासाठी योगदान देऊ शकतात. लोकशाहीला सक्रिय, माहितीपूर्ण आणि जबाबदार नागरिकांची आवश्यकता असते – सक्रीय आणि सक्षम नागरिक स्वतःची आणि त्यांच्या समुदायाची जबाबदारी घेण्यास इच्छुक आणि सक्षम असतात आणि राजकीय प्रक्रियेत योगदान देतात. नागरिकत्व शिक्षण लोकांना राजकारण, प्रसारमाध्यमे, नागरी समाज, अर्थव्यवस्था आणि कायदा यासह लोकशाही समाजाला समजून घेण्याचे, आव्हान देण्याचे आणि त्यात सहभागी होण्याचे ज्ञान आणि कौशल्ये देते.

**१.२ विषय विवेचन :-**

समाज, प्रांत, राष्ट्रे आणि संपूर्ण जगामध्ये जबाबदार, नागरिकत्व निर्माण करण्यात शिक्षण महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. जागतिक नागरिकत्व शिक्षण इतर लोकांना ते कोण आहेत यासाठी स्वीकारण्यासाठी, त्यांच्या मतांचा आदर करण्यासाठी आणि एक शांत, निरोगी आणि समृद्ध जग तयार करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करते. कोणताही देश प्रगती करतो तो त्या देशातील नागरिकांच्या गुणांवर, वागणुकीवर आणि जबाबदारीवर आधारित असतो. नागरिक जर जागरूक, कर्तव्यदक्ष, सुशिक्षित आणि संवेदनशील असतील, तर देशाच्या विकासात ते मोठं योगदान देतात. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीने चांगला आणि जबाबदार नागरिक होण्यासाठी आवश्यक असणारी मूल्ये आत्मसात केली पाहिजेत. ही मूल्ये कोणत्या विशिष्ट पुस्तकात शिकवली जात नाहीत, तर ती आपल्याला वागण्यातून, शिकवण्यातून, अनुभवातून आणि शिक्षणातून मिळतात. यालाच आपण मूल्य शिक्षण म्हणतो.

मूल्य शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या मनामध्ये चांगले विचार, सकारात्मक दृष्टिकोन आणि इतरांबद्दल आदरभाव निर्माण करणारी प्रक्रिया होय. हे शिक्षण केवळ शाळेपुरते मर्यादित नसते, तर ते घर, समाज, आणि इतर माध्यमांतूनही मिळत असते. जसे की प्रामाणिकपणा, सहकार्य, संयम, सहिष्णुता, कर्तव्यपालन, समाजसेवा, कायद्याचा आदर, इतरांचा सन्मान आणि राष्ट्रप्रेम ही सर्व मूल्ये व्यक्तीला एक चांगला नागरिक बनवण्यासाठी मदत करतात. लहानपणी जर ही मूल्ये शिकवली गेली, तर ती व्यक्तीच्या स्वभावात घट्ट रुजतात आणि आयुष्यभर तिचा मार्गदर्शक ठरतात. आपल्या आजूबाजूला आपण पाहतो की काही लोक नियम तोडतात, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करतात, स्वार्थी वागतात किंवा भ्रष्टाचार करतात. यामागचं एक मोठं कारण म्हणजे त्यांच्याकडे मूल्य शिक्षणाचा अभाव असतो. फक्त शालेय ज्ञान असून उपयोग नाही, तर त्यासोबत योग्य संस्कार आणि समाजासाठी काही करण्याची भावना आवश्यक असते. हेच मूल्य शिक्षण व्यक्तीमध्ये निर्माण करतं. जेव्हा एखादी व्यक्ती मूल्यांच्या आधारे वागते, तेव्हा ती समाजात इतरांसाठीही प्रेरणादायक ठरते.

मूल्य शिक्षणामुळे व्यक्ती फक्त स्वतःपुरती मर्यादित राहत नाही, तर ती समाजासाठीही कार्यशील बनते. असे नागरिक मतदान करताना विचारपूर्वक निर्णय घेतात, देशातील कायद्यांचे पालन करतात, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखतात, इतरांच्या मतांचा आदर करतात आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग घेतात. यामुळेच ते फक्त सुजाण नागरिकच राहत नाहीत, तर कार्यप्रवण आणि सक्रीय नागरिक म्हणून समाजात उभे राहतात. आजच्या काळात समाजमाध्यमांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर आहे. अनेकदा चुकीची माहिती, द्वेषयुक्त संदेश किंवा अपप्रचार लोकांच्या विचारांवर परिणाम करतात. अशा वेळी मूल्य शिक्षणाचे महत्त्व अधिकच वाढते. कारण योग्य मूल्ये असलेल्या नागरिकांमध्ये विचार करण्याची क्षमता, चुकीला ओळखण्याची शक्ती आणि योग्य गोष्टीसाठी उभं राहण्याचं धैर्य असतं. ते फक्त स्वतःला वाचवत नाहीत, तर समाजातही शिस्त, सहिष्णुता आणि समता राखण्याचं काम करतात. कधी–कधी लोकांना असं वाटतं की चांगले नागरिक होण्यासाठी मोठमोठे काम करावे लागतात, पण सत्य असं आहे की, प्रत्येक लहान कृतीतूनही मोठा फरक पडतो. रस्त्यावर कचरा न फेकणं, शेजाऱ्याला मदत करणं, वयोवृद्धांचा आदर करणं, सार्वजनिक स्थळी शांतता राखणं, मतदार म्हणून आपला हक्क बजावणं – या साध्या गोष्टींसुद्धा सुजाण नागरिकत्व दर्शवतात. हे वागणं सहज आणि नैसर्गिक व्हावं यासाठी मूल्य शिक्षणाची गरज असते.

मूल्य शिक्षणामुळे व्यक्तीमधील आत्मविश्वास वाढतो, तिला आपलं मत मांडण्याचं धैर्य मिळतं आणि समाजासाठी काही करण्याची प्रेरणा मिळते. अशा व्यक्ती समाजात केवळ अनुयायी म्हणून राहत नाहीत, तर पुढे जाऊन इतरांना मार्गदर्शन करणारे नेतृत्वही करतात. अशा पद्धतीने समाजात बदल घडतो आणि देशाची प्रगती होते. निष्कर्षः, नागरिकत्त्व मूल्ये आणि मूल्य शिक्षण हे कोणत्याही देशाच्या उज्वल भविष्यासाठी आवश्यक घटक आहेत. जर आपण प्रत्येक मुलाला लहान वयापासून योग्य संस्कार आणि मूल्य शिक्षण दिलं, तर ते भविष्यात समाजासाठी उपयुक्त, सक्रीय, कार्यप्रवण आणि सुजाण नागरिक बनतील. अशा नागरिकांमुळेच देश घडतो, समाज टिकतो आणि पुढच्या पिढ्यांसाठी आदर्श उदाहरण उभं राहतं. त्यामुळे प्रत्येकाने आपल्याला मिळालेल्या शिक्षणात मूल्यांचा समावेश करून, समाजात चांगल्या नागरिकत्वाचा आदर्श निर्माण करायला हवा.

## २.१ नागरिकत्व मूल्ये–संकल्पना, अर्थ आणि स्वरूप

### १. नागरिकत्व मूल्ये संकल्पना (Concept) :

नागरिकत्व मूल्ये ही अशी नैतिक, सामाजिक आणि कायदेशीर मूल्ये आहेत, जी एखाद्या व्यक्तीला चांगला नागरिक होण्यासाठी मदत करतात. ही मूल्ये व्यक्तीला समाजात आणि राष्ट्रात योग्य आचरण शिकवतात. समाजामध्ये सहजीवनासाठी, लोकशाही टिकवण्यासाठी आणि विकासासाठी या मूल्यांचा फार मोठा वाटा असतो.

### २. नागरिकत्व मूल्ये अर्थ (Meaning) :

नागरिकत्व मूल्ये म्हणजे अशी तत्त्वे आणि आचारधर्म जे एक व्यक्ती म्हणून आपल्याला समाजातील इतर व्यक्तींबरोबर, शासन यंत्रणेबरोबर, कायदा आणि संविधानाबरोबर जबाबदारीने, सहकार्याने आणि नैतिकतेने वागण्यास शिकवतात. यामध्ये राष्ट्रभक्ती, कायद्याचे पालन, समाजसेवा, समता, बंधुता, मानवतावाद, सहिष्णुता, सार्वजनिक मालमत्तेची काळजी, मताधिकाराचा योग्य वापर, सामाजिक न्याय या मूल्यांचा समावेश होतो.

**३. नागरिकत्व मूल्ये – स्वरूप** (Nature) :

नागरिकत्व मूल्यांचे स्वरूप खालीलप्रमाणे असते:

**सर्वसमावेशक:** ही मूल्ये समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी लागू होतात, जात, धर्म, वर्ग या पलिकडे जाऊन.

**नैतिक व सामाजिक:** ही मूल्ये केवळ कायद्याने ठरलेली नसतात, तर नैतिकदृष्ट्या समाजासाठी योग्य अशी वागणूक दर्शवतात.

**व्यावहारिक:** ही मूल्ये व्यक्तीच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेली असतात – जसे की स्वच्छता राखणे, शिस्त पाळणे, इतरांचा सन्मान करणे.

लोकशाहीला बळकटी देणारी: नागरिकांनी आपले हक्क व कर्तव्ये जाणून त्यानुसार वागल्यास लोकशाही सक्षम होते.

**देशभक्तिपर:** राष्ट्रहित सर्वप्रथम असा दृष्टिकोन घडवणारी.

**४. वर्गीकरण व प्रकार** (Classification and Types) :

नागरिकत्त्व मूल्ये – चांगला नागरिक घडविणारी जीवनमूल्ये:- प्रत्येक समाज आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी केवळ तंत्रज्ञान, पैसा किंवा कायदे महत्त्वाचे नसतात, तर त्या देशातील नागरिकांची विचारसरणी, त्यांचे वर्तन आणि आचारधर्म हे अधिक महत्त्वाचे असतात. हाच पाया तयार करतात नागरिकत्त्व मूल्ये. ही मूल्ये व्यक्तीला सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात जबाबदारीने वागण्याचे मार्गदर्शन करतात. नागरिकत्त्व मूल्यांचे स्वरूप वैविध्यपूर्ण असून ती वेगवेगळ्या प्रकारांत विभागली जातात – वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय, पर्यावरणीय आणि कायदेशीर/लोकशाही मूल्ये.

वैयक्तिक मूल्ये म्हणजे व्यक्तीच्या अंतर्मनात रुजलेली नैतिक तत्त्वे. यात प्रामाणिकपणा, आत्मशिस्त, जबाबदारी, सचोटी आणि सहानुभूती यांचा समावेश होतो. एखादी व्यक्ती प्रलोभनांना बळी न पडता सत्याच्या मार्गाने जाते, इतरांच्या दुःखाशी संवेदना बाळगते, आणि स्वतःच्या कृतीबद्दल जबाबदारी घेते – ही सर्व मूल्ये तिच्या वैयक्तिक चारित्र्याची साक्ष देतात. यामुळे ती समाजासाठी आदर्श नागरिक ठरते.

सामाजिक मूल्ये ही समाजातील सहजीवनासाठी अत्यावश्यक असतात. यात समता, बंधुता, सहकार्य, सहिष्णुता आणि सामाजिक न्याय यांचा समावेश होतो. विविध धर्म, जाती, भाषा आणि विचारधारा असलेल्या भारतात सामाजिक मूल्ये टिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती जातीपातीचा भेदभाव न करता सर्वांशी सन्मानाने वागते, समाजात शांततेचे वातावरण राखते, तर ती एक सामाजिकदृष्ट्या सजग नागरिक ठरते.

राष्ट्रीय मूल्ये म्हणजे राष्ट्राशी असलेली निष्ठा, प्रेम आणि जबाबदारी. यात राष्ट्रप्रेम, देशनिष्ठा, राष्ट्रीय एकात्मता, संविधानाचा आदर, आणि सार्वजनिक मालमत्तेची जपणूक यांचा समावेश होतो. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन साजरे करणे, मतदान करणे, आणि राष्ट्रीय ध्वजाचा सन्मान करणे ही केवळ कृती नसून ती मूल्यांची जाणीव आहे. राष्ट्रीय मूल्यांमुळे देश एकसंघ राहतो आणि पुढे जातो.

पर्यावरणीय मूल्ये आजच्या काळात अत्यंत आवश्यक ठरली आहेत. पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर, स्वच्छता, आणि जैवविविधतेचे जतन ही मूल्ये केवळ आपल्या सुखासाठी नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठीही महत्त्वाची आहेत. झाडे लावणे, पाणी वाचवणे, प्लास्टिकचा वापर टाळणे या कृती म्हणजे पर्यावरणीय मूल्यांचे आचरणच आहे.

कायदेशीर आणि लोकशाही मूल्ये ही लोकशाहीच्या टिकावासाठी मूलभूत असतात. कायद्याचे पालन, हक्कांचा योग्य वापर, मताधिकाराचा उपयोग, आणि सार्वजनिक निर्णय प्रक्रियेत सहभाग घेणे ही मूल्ये प्रत्येक सुजाण नागरिकाने अंगी बाणवली पाहिजेत. शांततेत आंदोलने करणे, माहितीचा अधिकार वापरणे आणि भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवणे या गोष्टींमधून लोकशाहीचे खरे मूल्य प्रकट होते.

या सर्व मूल्यांचे पालन केल्यास एक व्यक्ती फक्त आपले कर्तव्य पार पाडत नाही, तर इतरांसाठी आदर्श ठरते. आणि अशा व्यक्तींच्या संख्येनेच समाज आणि राष्ट्र सशक्त बनते.

नागरिकत्व मूल्ये विविध प्रकारांमध्ये विभागता येतात. खाली त्याचे प्रमुख वर्गीकरण केले आहे:

**अ. वैयक्तिक मूल्ये** (Personal Values) :

**प्रामाणिकपणा**

**आत्मशिस्त**

**जबाबदारी**

**सचोटी**

**सहानुभूती**

उदाहरण: एखादा नागरिक स्वतः चुकीचा मार्ग न निवडता सत्य बोलतो, कर भरण्यात टाळाटाळ करत नाही.

**१. प्रामाणिकपणा** (Honesty): प्रामाणिकपणा म्हणजे सत्य बोलणे, खोटेपणा न करणे आणि कोणत्याही परिस्थितीत चुकीचा मार्ग न निवडणे. ही व्यक्तीच्या चारित्र्याची खरी कसोटी आहे. प्रामाणिक माणूस कोणत्याही प्रलोभनाला बळी पडत नाही. तो जे आहे, ते स्पष्टपणे सांगतो आणि जे करतो, ते खरेपणाने करतो. प्रामाणिकपणा हा केवळ शब्दांचा नाही तर कृतीचा गुणधर्म आहे. उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी परीक्षेत कॉपी न करता स्वतःच्या मेहनतीने यश मिळवतो, तर तो प्रामाणिकपणाचा आदर्श आहे. कार्यालयात एखादा अधिकारी लाच न घेता आपले कर्तव्य पार पाडतो, ही सुद्धा प्रामाणिकपणाचीच खूण आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात प्रामाणिकपणाला अनेक वेळा कमी लेखले जाते, परंतु हे मूल्यच समाजात विश्वास, सुरक्षितता आणि स्थिरता निर्माण करते. एक प्रामाणिक नागरिक आपले हक्क जितक्या निष्ठेने वापरतो, तितक्याच प्रामाणिकपणे आपली जबाबदारीही पार पाडतो.

**२. आत्मशिस्त** (Self-Discipline): आत्मशिस्त म्हणजे स्वतःवर नियंत्रण ठेवण्याची आणि आपल्या विचारांवर व कृतींवर संयम ठेवण्याची क्षमता. ही सवय व्यक्तीला नियोजनबद्ध, वेळेचे महत्त्व जाणणारी आणि जबाबदारीने वागणारी बनवते. आत्मशिस्तीच्या जोरावरच एखादी व्यक्ती मोठे ध्येय गाठू शकते. उदाहरणार्थ, एक खेळाडू रोज सराव करत असतो, वेळेचे काटेकोर पालन करतो – ही आत्मशिस्तच त्याला यशाकडे नेत असते. शाळा, कॉलेज, नोकरी किंवा सार्वजनिक जीवन – कुठेही यशस्वी व्हायचे असल्यास आत्मशिस्त आवश्यक आहे. हीच आत्मशिस्त नागरिकांना कायदे पाळण्यास, सार्वजनिक मालमत्तेची जपणूक करण्यास आणि इतरांच्या हक्कांचा सन्मान करण्यास शिकवते. जो स्वतः शिस्त पाळतो, तो समाजातही अनुशासन पाळतो. त्यामुळे आत्मशिस्त हे चांगल्या नागरिकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**३. जबाबदारी** (Responsibility) : जबाबदारी म्हणजे आपण घेतलेल्या कामांचे आणि कृतींचे परिणाम समजून घेऊन त्यांचा योग्य प्रकारे स्वीकार करणे. प्रत्येक व्यक्तीची कोणती ना कोणती जबाबदारी

असते – विद्यार्थी म्हणून शिक्षणाची, नागरिक म्हणून राष्ट्राची, मुलगा/मुलगी म्हणून कुटुंबाची. जबाबदार व्यक्ती कोणतेही कार्य पूर्ण प्रामाणिकपणे पार पाडते. ती अर्धवट काम करत नाही किंवा चूक झाली तर दोष दुसऱ्यावर ढकलत नाही. उदाहरणार्थ, एखादा नागरिक आपल्या मताधिकाराचा योग्य वापर करतो, कर वेळेवर भरतो आणि सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेतो – ही जबाबदारीचीच उदाहरणे आहेत. समाजात प्रत्येक व्यक्तीने आपापल्या भूमिका जबाबदारीने पार पाडल्या, तर कोणताही कायदा वा नियम सक्तीने लावावा लागत नाही. त्यामुळे जबाबदारी हे मूल्य लोकशाही आणि सामाजिक सलोख्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**४. सचोटी** (Integrity) : सचोटी म्हणजे आपल्या विचारांमध्ये, बोलण्यात आणि कृतीत एकसंधता असणे. म्हणजेच, जो काय विचार करतो, तोच बोलतो आणि तोच वागतोही – हीच सचोटी. हा गुण व्यक्तीच्या चारित्र्याचा गाभा आहे. सचोटीसह वागणारा माणूस आपल्या मूल्यांशी तडजोड करत नाही. तो संधी मिळाल्यावर स्वतःचा फायदा करून घेत नाही, आणि इतरांचे नुकसान होईल अशा गोष्टी टाळतो. सचोटी असलेल्या व्यक्तीवर लोक विश्वास ठेवतात, कारण तिच्या वागणुकीत खोटेपणा नसतो. सचोटीचे उदाहरण म्हणजे – एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याने जरी कोणतीही चौकशी चालू नसली, तरीही स्वतःहून खरे आकडे दाखवणे, हे त्याच्या सचोटीकडे निर्देश करते. सचोटीचे मूल्य एक चांगला समाज आणि विश्वासावर आधारित व्यवस्था निर्माण करण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे.

**५. सहानुभूती** (Empathy) : सहानुभूती म्हणजे दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होणे, त्याच्या भावना समजून घेणे आणि त्याला आधार देणे. सहानुभूती ही फक्त करुणा नव्हे, तर कृतीकडे नेणारी भावना आहे. ज्याच्या मनात सहानुभूती असते, तो इतरांच्या अडचणींवर हसत नाही, तर त्या समजून घेतो आणि शक्य असेल तेव्हा मदतीचा हात देतो. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती रस्त्यावर पडलेल्या वृद्धाला उचलून त्याला मदत करते, तर ही सहानुभूती आहे. सहानुभूतीमुळे समाजात एकमेकांविषयी प्रेम, आपुलकी आणि समज वाढते. ती आपल्याला विभाजन न करता, जोडण्याची शिकवण देते. आजच्या ताणतणावाच्या आणि स्पर्धात्मक जगात सहानुभूती हे मूल्य अधिकच आवश्यक झाले आहे. हे मूल्य केवळ सामाजिक नव्हे, तर मानवी मूल्यांमध्येही सर्वांत श्रेष्ठ मानले जाते.

**ब. सामाजिक मूल्ये** (Social Values) :

**समता**

**बंधुता**

**सहकार्य**

**सहिष्णुता**

**सामाजिक न्याय**

उदाहरण: जातीपातीचा भेद न करता सर्वांशी समानतेने वागणे, समाजात शांतता राखणे.

**१. समता** (Equality) : समता म्हणजे सर्व व्यक्तींना समान अधिकार, संधी आणि सन्मान मिळावा ही भावना. समाजात व्यक्तीच्या जाती, धर्म, लिंग, भाषा, वर्ग, वंश याच्या आधारावर भेदभाव होऊ नये, हीच समतेची खरी मागणी आहे. समता केवळ कायद्यात असणे पुरेसे नाही, ती प्रत्यक्ष जीवनात उतरवणे आवश्यक आहे. भारताच्या राज्यघटनेत समतेला मोठे स्थान दिले आहे. प्रत्येक व्यक्तीस कायद्यापुढे समान वागणूक दिली जाते. आरक्षण, मोफत शिक्षण, जातीभेदविरोधी कायदे हे सर्व समतेच्या मूल्याचेच प्रतिबिंब आहेत. समता

असल्यास समाजात सुसंवाद, विश्वास आणि सशक्त सहजीवन शक्य होते. उदाहरणार्थ, जर एका कार्यालयात सर्व कर्मचारी त्याच्या कर्तृत्वावरून वागवले गेले, तर कामाचा दर्जा आणि एकता वाढते. समतेचा अभाव असल्यास दुजाभाव, शोषण, आणि द्वेष निर्माण होतो. म्हणूनच, प्रत्येकाने आपल्या कृतीत समतेचे मूल्य जपणे आवश्यक आहे.

**२. बंधुता** (Fraternity) : बंधुता म्हणजे सर्वांमध्ये बंधुभाव, आपुलकी आणि एकतेची भावना ठेवणे. ती माणसामाणसातील दुरावा कमी करते आणि विविधतेत एकता निर्माण करते. भारतीय समाज विविध जाती, धर्म, भाषा आणि संस्कृतींनी युक्त आहे. अशा देशात बंधुतेचे मूल्य अत्यंत आवश्यक आहे. बंधुत्व असल्यास व्यक्ती दुसऱ्यावर विश्वास ठेवतो, मदत करतो आणि समाजात शांतता राखतो. उदाहरणार्थ, एखाद्या संकटकाळात वेगवेगळ्या धर्मांचे लोक एकत्र येऊन मदत करत असतील, तर ती बंधुतेचे सुंदर उदाहरण आहे. बंधुतेचा अभाव म्हणजे द्वेष, दंगली आणि असहिष्णुतेचा उदय. म्हणूनच संविधानाच्या प्रस्तावनेत बंधुतेचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. बंधुता हे मूल्य समाजात सौहार्द, समरसता आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

**३. सहकार्य** (Cooperation) : सहकार्य म्हणजे एकमेकांना मदत करून काम करणे, किंवा एकत्र येऊन उद्दिष्ट साध्य करणे. कोणतेही मोठे कार्य एकट्याने शक्य नसते; सहकार्यामुळेच ते साध्य होते. शाळा, ऑफिस, कुटुंब किंवा राष्ट्र – प्रत्येक पातळीवर सहकार्य आवश्यक असते. जिथे सहकार्य आहे, तिथे मतभेद असूनही सामंजस्य आणि यश मिळते. उदाहरणार्थ, एखादा गट प्रकल्प करताना सर्वजण आपापली जबाबदारी पार पाडतात आणि एकमेकांना मदत करतात, तर तो प्रकल्प यशस्वी होतो – हेच सहकार्याचे मूळ तत्त्व आहे. सहकार्य समाजात परस्पर विश्वास आणि मैत्री वाढवते. ते केवळ मदतीपुरते मर्यादित नसते, तर एकमेकांना समजून घेण्याचे बळही देते. सहकार्यामुळे केवळ काम सोपे होते असे नाही, तर समाज अधिक सशक्त आणि एकजूट होतो.

**४. सहिष्णुता** (Tolerance) : सहिष्णुता म्हणजे दुसऱ्याच्या विचारांना, श्रद्धांना आणि जीवनपद्धतींना स्वीकारण्याची, समजून घेण्याची आणि त्याचा आदर करण्याची वृत्ती. ती मतभेद असूनही शांततेत जगण्याचे आणि संवाद साधण्याचे बळ देते. भारतासारख्या बहु-सांस्कृतिक समाजात सहिष्णुता हे अत्यंत गरजेचे मूल्य आहे. विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरा जपताना सहिष्णुतेशिवाय सलोखा शक्य नाही. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती दुसऱ्याच्या धर्माचे सण सन्मानाने स्वीकारते, त्यात सहभागी होते, हे सहिष्णुतेचे उदाहरण आहे. सहिष्णुतेचा अभाव म्हणजे मतभेदाचे रुपांतर संघर्षात. त्यामुळेच सहिष्णुता ही लोकशाहीतील मूलभूत भावना मानली जाते. सहिष्णुतेमुळे समाजात विविधता असूनही एकात्मता टिकते, हे तिचे मोठे योगदान आहे.

**५. सामाजिक न्याय** (Social Justice): सामाजिक न्याय म्हणजे प्रत्येक व्यक्तीला जाती, धर्म, लिंग किंवा आर्थिक स्थितीच्या आधारावर भेदभाव न करता समान संधी आणि वागणूक मिळावी. भारतीय राज्यघटना सामाजिक न्यायाची ग्वाही देते. मागासवर्गीय, महिलावर्ग, दिव्यांग यांना आरक्षण, शैक्षणिक सवलती, व सामाजिक कल्याण योजना देऊन सामाजिक न्याय सुनिश्चित केला जातो. सामाजिक न्याय म्हणजे केवळ कायद्यातील संधी नव्हे, तर समाजाच्या मनोवृत्तीतील बदल. एखाद्या गरीब विद्यार्थ्याला शिक्षणासाठी मदत करणे, दलितांशी सन्मानाने वागणे – ही सामाजिक न्यायाची उदाहरणे आहेत. सामाजिक न्यायामुळेच समाजात समता आणि शांतता राखता येते. ज्यांना अनेक पिढ्यांपासून संधी मिळाल्या नाहीत, त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हे यामागील मुख्य उद्दिष्ट आहे. सामाजिक न्यायाची जोपासना केल्याशिवाय खऱ्या अर्थाने लोकशाही यशस्वी होत नाही.

**क. राष्ट्रीय मूल्ये** (National Values) :

**राष्ट्रप्रेम**

**देशनिष्ठा**

**राष्ट्रीय एकात्मता**

**संविधानाचा आदर**

**सार्वजनिक मालमत्तेची जपणूक**

उदाहरण: राष्ट्रध्वजाचा सन्मान करणे, स्वातंत्र्यदिन / प्रजासत्ताक दिन साजरे करणे, मतदान करणे.

**१. राष्ट्रप्रेम** (Patriotism) : राष्ट्रप्रेम म्हणजे आपल्या देशाबद्दल असलेले प्रेम, अभिमान आणि निष्ठा. हे केवळ भावनिक नसून कृतीतून दिसून येणारे मूल्य आहे. राष्ट्रप्रेम असणारी व्यक्ती आपला देश उन्नत होण्यासाठी प्रयत्नशील असते, देशाच्या यशाने आनंदित होते आणि देशाच्या अडचणींवर चिंतित होते. राष्ट्रप्रेम म्हणजे देशासाठी लढणे एवढेच नाही, तर आपण जे काही करतो ते आपल्या देशाच्या हितासाठी असावे ही भावना. उदाहरणार्थ, आपले काम इमानेइतबारे करणे, कर भरून देशाच्या अर्थव्यवस्थेस हातभार लावणे, स्वदेशी वस्तूंचा वापर करणे - हे सर्व राष्ट्रप्रेमाचेच स्वरूप आहे. राष्ट्रप्रेमामुळे नागरिकांमध्ये एकता, जबाबदारी आणि कर्तव्य भावना निर्माण होते. हे मूल्य व्यक्तीला केवळ स्वतःपुरते मर्यादित न ठेवता राष्ट्रहितासाठी काम करण्यास प्रेरित करते. राष्ट्रप्रेम अंधभक्ती नसून सजग आणि जागरूक नागरिकत्त्वाचे लक्षण आहे. त्यामुळे हे मूल्य प्रत्येक नागरिकाने जोपासले पाहिजे.

**२. देशनिष्ठा** (Loyalty to Nation): देशनिष्ठा म्हणजे देशाबद्दल निष्ठा ठेवणे, म्हणजेच देशाच्या संविधान, कायदे, धोरणे आणि संस्थांबद्दल विश्वास ठेवून त्यांचे पालन करणे. देशनिष्ठ व्यक्ती देशासाठी सदैव प्रामाणिक असते आणि संकटात देशाची साथ सोडत नाही. हे मूल्य फक्त युद्धाच्या वेळी आवश्यक असते असे नाही, तर रोजच्या जीवनातही अत्यंत गरजेचे आहे. उदाहरणार्थ, देशाची गुप्त माहिती शत्रूपर्यंत पोहोचवणे ही देशद्रोहाची कृती आहे, तर देशाच्या सुरक्षेसाठी सतर्क राहणे ही देशनिष्ठेची ओळख आहे.

देशनिष्ठ नागरिक कायद्याचे पालन करतो, स्वदेशी वस्तूंचा आदर करतो, मतदान करताना विचारपूर्वक निर्णय घेतो. अशा व्यक्तींच्या कृतीतून देशाचे संरक्षण, विकास आणि प्रतिष्ठा अबाधित राहते. देशनिष्ठा ही केवळ भावना नसून एक जबाबदारी आहे. देश घडवायचा असेल, तर प्रत्येक नागरिक देशनिष्ठ असणे आवश्यक आहे.

**३. राष्ट्रीय एकात्मता** (National Integration) : राष्ट्रीय एकात्मता म्हणजे देशातील विविधता असूनही सर्व नागरिकांमध्ये एकतेची भावना असणे. भारतात वेगवेगळे धर्म, जाती, भाषा, संस्कृती असताना सुद्धा आपण सर्वजण एक राष्ट्र आहोत - ही भावना निर्माण करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता. हे मूल्य लोकांमध्ये परस्पर आदर, समजूत आणि सहिष्णुता वाढवते. धार्मिक, भाषिक, प्रांतीय किंवा सामाजिक भेदभाव विसरून देशाच्या एकतेसाठी काम करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, एखाद्या राष्ट्रीय संकटाच्या वेळी संपूर्ण देश एकत्र येतो - तेव्हा ही राष्ट्रीय एकात्मता दिसून येते. शालेय पातळीवर विविध राज्यांतील संस्कृती साजऱ्या केल्यास मुलांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण होते. या मूल्याच्या अभावामुळे देशात फूट, दंगे, फुटीरवाद वाढतो. म्हणूनच, हे मूल्य राष्ट्राच्या स्थिरतेसाठी अत्यावश्यक आहे. 'विविधतेत एकता' ही भारताची ओळख टिकवायची असेल, तर राष्ट्रीय एकात्मता जोपासणे गरजेचे आहे.

**४. संविधानाचा आदर** (Respect for the Constitution) : भारतीय संविधान हे आपल्या देशाचे सर्वोच्च कायदापत्र आहे. या संविधानाचा आदर करणे म्हणजेच देशाच्या मूलभूत तत्त्वांचा सन्मान करणे. यात समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि धर्मनिरपेक्षता यांचा समावेश आहे. संविधानाचा आदर करणारा नागरिक आपले हक्क वापरताना जबाबदारी विसरत नाही. तो मताधिकाराचा योग्य वापर करतो, कायद्याचे पालन करतो आणि इतरांच्या हक्कांचा सन्मान ठेवतो. संविधानात दिलेले हक्क व कर्तव्ये नागरिकांना सक्षम बनवतात. जर नागरिकांनी संविधानाचा आदर केला नाही, तर लोकशाहीचा गाभा खिळखिळा होतो. उदाहरणार्थ, सार्वजनिक जीवनात संविधानविरोधी विचारांना विरोध करणे, आणि मूलभूत अधिकारांचे रक्षण करणे – हेच संविधानाच्या आदराचे स्वरूप आहे. संविधान हा आपल्या देशाचा आत्मा आहे. त्याचा आदर करणे म्हणजे देशाची एकता, अखंडता आणि प्रगती टिकवणे.

**५. सार्वजनिक मालमत्तेची जपणूक** (Care for Public Property) : सार्वजनिक मालमत्ता म्हणजे सरकारकडून किंवा समाजाच्या उपयोगासाठी उभारण्यात आलेल्या सुविधा – जसे की शाळा, रस्ते, उद्याने, रेल्वे, पाणीपुरवठा यंत्रणा, वीज व्यवस्था इ. ही मालमत्ता सर्व नागरिकांची असते, म्हणून तिची जपणूक करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. दगडफेक, भिंती रंगवणे, वाहतूक नियम तोडणे, विजेचा अपव्यय करणे – ही सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणारी वर्तनं आहेत. प्रत्येक नागरिकाने सार्वजनिक मालमत्तेचा वापर काळजीपूर्वक करावा, आणि इतरांनाही तशी शिकवण द्यावी. शाळांमध्ये मुलांना हे मूल्य लहानपणापासून शिकवले पाहिजे. उदाहरणार्थ, एखाद्या प्रवाशाने रेल्वेच्या सिटवर रंगरंगोटी न करता ती स्वच्छ ठेवली, तर ती सार्वजनिक मालमत्तेच्या जपणुकीचे उदाहरण आहे. जर प्रत्येकाने थोडीशी काळजी घेतली, तर सरकारी खर्च कमी होतो, आणि सुविधा टिकून राहतात. सार्वजनिक मालमत्तेची जपणूक म्हणजे सामाजिक जबाबदारीची खरी सुरुवात आहे.

**ड. पर्यावरणीय मूल्ये** (Environmental Values) :

**पर्यावरण संरक्षण**

**नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर**

**स्वच्छता**

**हरित ऊर्जा आणि जैवविविधतेचे जतन**

उदाहरण: झाडे लावणे, प्लास्टिकचा कमी वापर करणे, पाण्याची बचत करणे.

**१. पर्यावरण संरक्षण** (Environmental Protection) : पर्यावरण संरक्षण म्हणजे निसर्ग आणि त्यातील घटकांचे संतुलन राखणे, प्रदूषण टाळणे आणि जैविक संसाधनांचे जतन करणे. मानवी जीवन निसर्गावर अवलंबून असल्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. औद्योगिकीकरण, जंगलतोड, प्लास्टिकचा वापर, खनिजांचे अति दोहन, आणि प्रदूषण यामुळे पर्यावरणाला मोठा धोका निर्माण झाला आहे. तापमानवाढ, पर्जन्यमानातील बदल, समुद्रपातळी वाढणे ही त्याचीच लक्षणे आहेत. पर्यावरण संरक्षणासाठी आपण झाडे लावणे, पाण्याचा अपव्यय टाळणे, कचरा न जाळता योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे, प्लास्टिकचा कमी वापर करणे, आणि वाहनांचा विवेकी वापर करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, एखाद्या शाळेने परिसरात वृक्षारोपण मोहिम राबवली आणि नियमितपणे स्वच्छता राखली, तर ती पर्यावरण संरक्षणाच्या

दृष्टीने आदर्श कृती ठरते. पर्यावरण टिकवले तरच भविष्यातील पिढ्यांना निरोगी आणि सुदृढ जीवन मिळेल. त्यामुळे हे मूल्य प्रत्येकाच्या वर्तनात उतरवणे अत्यावश्यक आहे.

**२. नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर** (Sustainable Use of Natural Resources)
नैसर्गिक संसाधने म्हणजे पाणी, हवा, माती, खनिजे, ऊर्जा स्रोत, वनसंपत्ती इत्यादी. ही संसाधने आपल्याला निसर्गाकडून मोफत मिळतात, पण ती असीम नाहीत. त्यामुळे त्यांचा वापर जपून, विचारपूर्वक आणि पुनर्वापरक्षम पद्धतीने करणे गरजेचे आहे. आजच्या वेगाने होत असलेले शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि ग्राहकतावादामुळे संसाधनांचा अति वापर होतो आहे. त्यामुळे पाण्याचा तुटवडा, मातीची उधळपट्टी, इंधन संपत्तीचे आटवणे या समस्या उद्भवत आहेत. योग्य वापर म्हणजे – पाण्याचा अपव्यय टाळणे, पावसाचे पाणी साठवणे, सौरऊर्जेचा वापर करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करून पुनर्वापर करणे. उदाहरणार्थ, घरामध्ये डएऊ बल्ब वापरणे, गॅस जपून वापरणे, आणि प्लास्टिकऐवजी कपड्याच्या पिशव्या वापरणे हे छोटे पण प्रभावी उपाय आहेत. जर आपण आज दक्ष राहिलो, तरच उद्याच्या पिढ्यांनाही ही संसाधने मिळतील. म्हणूनच 'शाश्वत विकास' हे या मूल्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**३. स्वच्छता** (Cleanliness) : स्वच्छता म्हणजे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक पातळीवर स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण राखणे. सार्वजनिक स्वच्छता राखल्यास समाज निरोगी राहतो, आणि पर्यावरण सुरक्षित राहते. स्वच्छतेचे मूल्य केवळ घरोघरी पाळण्याचे नसून शाळा, रस्ते, कार्यालये, सार्वजनिक शौचालये अशा सर्व ठिकाणी त्याचे पालन करणे आवश्यक आहे. घरोघरी कचरा वर्गीकरण, ओला-सुका कचरा वेगळा करणे, उघड्यावर शौच न करणे, प्लास्टिक न फेकणे, स्वच्छतागृहांचा वापर, आणि हात स्वच्छ धुणे – या सवयी लावल्यास समाज अधिक स्वच्छ व आरोग्यपूर्ण होईल. उदाहरणार्थ, 'स्वच्छ भारत अभियान' ही एक अशी चळवळ होती ज्यामुळे लाखो लोकांनी स्वच्छतेचे महत्त्व ओळखले आणि कृतीत आणले. स्वच्छतेमुळे केवळ आजार दूर राहतात असे नाही, तर व्यक्तीचे मनही प्रसन्न आणि सकारात्मक राहते. म्हणूनच स्वच्छता हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य मानले गेले आहे.

**४. हरित ऊर्जा आणि जैवविविधतेचे जतन** (Green Energy and Biodiversity Conservation): हरित ऊर्जा म्हणजे नैसर्गिक स्रोतांपासून निर्माण होणारी प्रदूषणविरहित ऊर्जा – जसे की सौर, वाऱ्याची, जल, बायोगॅस इत्यादी. ही ऊर्जा पारंपरिक इंधनासारखी संपुष्टात येत नाही आणि पर्यावरणासाठी सुरक्षित असते. त्याचप्रमाणे जैवविविधता म्हणजे प्राणी, पक्षी, वनस्पती, सूक्ष्मजीव यांची विविधता. ही विविधता टिकवणे म्हणजे पर्यावरणाचे संतुलन राखणे. आज इंधनाच्या अति वापरामुळे प्रदूषण वाढते, तर जंगलतोड, शिकारी, आणि हवामान बदलामुळे अनेक प्रजाती नामशेष होतात. त्यामुळे जैवविविधतेचे जतन आणि हरित ऊर्जेचा वापर अपरिहार्य आहे. उदाहरणार्थ, एखाद्या गावी सौर दिवे बसवणे, शेतीत गोबरगॅसचा वापर करणे, किंवा निसर्ग उद्यान सुरू करणे – ही या मूल्याच्या जोपासनेची उदाहरणे आहेत. हरित ऊर्जेचा वापर केल्याने प्रदूषण कमी होते आणि भावी पिढ्यांना सुरक्षित ऊर्जा स्रोत मिळतो. जैवविविधतेचे जतन केल्याने पर्यावरणातील साखळी टिकते, आणि आपल्याला अन्न, औषधे, इंधन यासाठी लागणाऱ्या स्रोतांचे नुकसान टाळता येते. या मूल्यांमुळे पर्यावरणाचे दीर्घकालीन रक्षण शक्य होते.

**इ. कायदेशीर/लोकशाही मूल्ये** (Legal/Democratic Values) :

**कायद्याचे पालन**

**हक्कांचा योग्य वापर**

**मताधिकाराचा उपयोग**

**सार्वजनिक निर्णय प्रक्रियेत सहभाग**

उदाहरण: शांततेत आंदोलने करणे, माहितीचा अधिकार वापरणे, भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणे.

**१. कायद्याचे पालन** (Obedience to Law) : कायद्याचे पालन हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. कोणताही समाज किंवा देश कायद्याशिवाय चालू शकत नाही. कायदे हे समाजात शिस्त, सुव्यवस्था, सुरक्षितता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी बनवले जातात. कायद्याचे पालन करणारा नागरिक वाहतूक नियमांचे पालन करतो, सार्वजनिक ठिकाणी शांतता राखतो, इतरांच्या हक्कांचा सन्मान करतो आणि गुन्हेगारीपासून दूर राहतो. उदाहरणार्थ, सिग्नलला थांबणे, कर भरणे, अतिक्रमण न करणे हे सर्व कायद्याचे पालनच आहे. जर नागरिकांनी कायदे तोडले तर समाजात अराजकता निर्माण होते. अपघात, गुन्हेगारी, भ्रष्टाचार यासारख्या समस्या वाढतात. म्हणून कायदा केवळ भीतीसाठी नसून शिस्त, सन्मान आणि जबाबदारीसाठी असतो. लोकशाही देशात कायदे सर्वांसाठी सारखे असतात – मग तो गरीब असो वा श्रीमंत, शासक असो वा सामान्य नागरिक. त्यामुळे कायद्याचे पालन केल्याने समाजात समतेची भावना तयार होते. शाळेपासूनच विद्यार्थ्यांना कायद्याचे महत्त्व शिकवले गेले पाहिजे, म्हणजे ते भविष्यात जबाबदार नागरिक बनतील.

**२. हक्कांचा योग्य वापर** (Proper Use of Rights) : लोकशाहीत नागरिकांना अनेक मूलभूत हक्क दिलेले असतात – जसे की व्यक्तिस्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क, माहितीचा अधिकार इत्यादी. हे हक्क आपल्याला स्वतंत्रपणे आणि सन्मानाने जगण्यासाठी मिळालेले आहेत. मात्र हक्कांचा वापर करताना इतरांच्या हक्कांचा आणि समाजाच्या हिताचा विचार करणेही तितकेच आवश्यक असते. उदाहरणार्थ, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे म्हणून कोणीही इतर धर्म, जाती किंवा व्यक्तींवर अपमानास्पद वक्तव्य करू शकत नाही. हक्कांचा योग्य वापर करणारा नागरिक जबाबदारीने विचार करतो. तो शिक्षणाचा हक्क घेऊन स्वतः सक्षम बनतो, माहितीचा अधिकार वापरून प्रशासन पारदर्शक ठेवतो, आणि शांततेत आंदोलन करून आपल्या मागण्या मांडतो. जर हक्कांचा दुरुपयोग झाला तर त्याचे परिणाम घातक ठरतात – समाजात तेढ निर्माण होते, हिंसाचार वाढतो आणि लोकशाही मूल्ये धोक्यात येतात. म्हणूनच हक्क हे 'सवलत' नसून 'सुसंस्कारित कृती' असायला हवेत. हक्कांचा वापर संयमित, विवेकी आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने करणे हेच योग्य मार्ग आहे.

**३. मताधिकाराचा उपयोग** (Use of Voting Right) : मताधिकार म्हणजे आपल्या प्रतिनिधींना निवडण्यासाठी दिलेले अधिकार. लोकशाहीमध्ये 'प्रत्येक मत मोलाचे' असते, कारण सरकार कोण निवडायचे हे आपणच ठरवतो. मतदान हे फक्त अधिकार नाही, तर एक पवित्र कर्तव्य आहे. मत न टाकणारा नागरिक सरकार निवडण्याच्या प्रक्रियेतून स्वतःला दूर ठेवतो. त्यामुळे त्याला नंतर मिळालेल्या सरकारबद्दल तक्रार करण्याचा नैतिक अधिकारही राहत नाही. मतदान करताना उमेदवाराचे चारित्र्य, कार्यक्षमता, विकासदृष्टी आणि समाजहित याचा विचार करावा लागतो. जात, धर्म, पैसा किंवा इमोशन्सच्या आधारावर मतदान करणे म्हणजे मताधिकाराचा गैरवापर होतो. आज तरुण वर्ग मतदानापासून दूर राहतो, त्यामुळे लोकशाही दुर्बल होते.

मतदानाविषयी जनजागृती करणे, निवडणुकीसाठी प्रसंगी सुट्टी घेऊन सहभाग घेणे हे प्रत्येक नागरिकाचे आदर्श वर्तन आहे. मताचा योग्य वापर केल्यास देशात चांगले नेतृत्व येते, कायदे योग्य बनतात, आणि समाजाचा सर्वांगीण विकास होतो. म्हणून मताधिकार हा लोकशाहीचा आत्मा मानला जातो.

**४. सार्वजनिक निर्णय प्रक्रियेत सहभाग** (Participation in Public Decision-Making): लोकशाही सरकार 'जनतेचे, जनतेसाठी, जनतेद्वारे' चालते. म्हणजेच नागरिकांनी केवळ मतदानापुरतेच न थांबता, सार्वजनिक निर्णय प्रक्रियेतही सक्रिय सहभाग घ्यायला हवा. सार्वजनिक निर्णयप्रक्रिया म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामसभा, शहरी सभा, नागरिक सल्लागार समित्या, वॉर्ड मीटिंग्स यांमध्ये सहभागी होणे. अशा माध्यमातून नागरिक आपले मुद्दे, अडचणी, आणि सूचना थेट प्रशासनापर्यंत पोहोचवू शकतात. उदाहरणार्थ, एखाद्या भागात पाण्याची कमतरता असल्यास स्थानिक नागरिकांनी एकत्र येऊन नगरपालिका किंवा ग्रामपंचायतीकडे लेखी तक्रार करणे, सभा घेणे – ही या प्रक्रियेतील सक्रियता दर्शवते. सार्वजनिक निर्णयप्रक्रियेत सहभागी झाल्यामुळे प्रशासन पारदर्शक राहते, निधीचा योग्य वापर होतो आणि जनतेची गरज लक्षात घेऊन निर्णय घेतले जातात. जर नागरिक निष्क्रीय राहिले, तर चुकीचे निर्णय, अपारदर्शक कामकाज आणि भ्रष्टाचार वाढतो. म्हणून 'मी एकटा काय करू?' असा विचार न करता प्रत्येकाने आपल्या हक्कांचा वापर करून समाजात सकारात्मक बदल घडवून आणायला हवा.

**संविधानिक मूल्ये – राष्ट्राच्या आत्म्याचे प्रतिबिंब**

भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांचे पुस्तक नाही, तर ती आपल्या देशाच्या मूलभूत मूल्यांची, आदर्शांची आणि ध्येयांची जणू घोषणा आहे. या राज्यघटनेने आपल्याला दिलेल्या हक्कांइतकीच जबाबदारीही दिली आहे. ही जबाबदारी म्हणजेच संविधानिक मूल्ये, जी प्रत्येक भारतीय नागरिकाने आपल्या जीवनात आचरणात आणली पाहिजेत. संविधानिक मूल्ये म्हणजे आपल्या भारतीय राज्यघटनेतून प्रकट होणारी ती मूलभूत तत्त्वे, जी देशाच्या लोकशाही, सामाजिक न्याय, मानवाधिकार आणि एकात्मतेला बळकटी देतात. ही मूल्ये भारतीय समाज अधिक समता, न्याय आणि बंधुतेच्या मार्गावर नेण्यासाठी मार्गदर्शक ठरतात. आपल्या राज्यघटनेच्या प्रस्तावनेतच काही मूलभूत मूल्यांचा उल्लेख केला आहे. स्वातंत्र्य (Liberty), समता (Equality), बंधुता (Fraternity), न्याय (Justice) आणि लोकशाही (Democracy) ही प्रमुख संविधानिक मूल्ये आहेत.

**१. न्याय** (Justice): 'न्याय' हे भारतीय संविधानाचे एक अत्यंत मूलभूत मूल्य आहे. संविधानाच्या प्रस्तावनेत स्पष्टपणे नमूद आहे की सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळायला हवा. सामाजिक न्याय म्हणजे समाजात कोणत्याही जाती, धर्म, लिंग किंवा पार्श्वभूमीवर आधारित भेदभाव न करता सर्वांना समान संधी मिळणे. उदाहरणार्थ, अनुसूचित जाती-जमातींना शिक्षण आणि नोकरीत आरक्षण देऊन ऐतिहासिक अन्याय भरून काढण्याचा प्रयत्न केला जातो. आर्थिक न्याय म्हणजे सर्वांना आपल्या कष्टानुसार उपजीविकेची संधी मिळावी. श्रीमंत-गरिबांमध्ये प्रचंड दरी न राहता संसाधनांचे न्याय्य वाटप होणे आवश्यक आहे. राजकीय न्याय म्हणजे प्रत्येक नागरिकाला मत देण्याचा, निवडणूक लढवण्याचा आणि सार्वजनिक जीवनात सहभाग घेण्याचा हक्क मिळणे. न्यायामुळे समाजात शांतता, समता आणि बंधुता नांदते. अन्यायामुळे असंतोष, असमतोल, आणि संघर्ष निर्माण होतो. म्हणूनच न्याय हे मूल्य संविधानाचा पाया मानले जाते.

**२. स्वातंत्र्य** (Liberty): स्वातंत्र्य हे लोकशाहीचा आत्मा आहे. संविधान सर्व नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, उपासना, संघटना आणि वागणूक यांचे स्वातंत्र्य देते. स्वातंत्र्य म्हणजे मनात जे विचार येतात

ते बोलण्याचा, लिहिण्याचा आणि अंमलात आणण्याचा अधिकार. उदाहरणार्थ, कुणालाही आपल्या धर्मानुसार पूजा करण्याचा किंवा न करण्याचा हक्क आहे. कोणीही आपल्या विचारसरणीनुसार ग्रंथ वाचू शकतो, भाषण करू शकतो किंवा संघटना स्थापन करू शकतो. मात्र हे स्वातंत्र्य अमर्यादित नाही; ते कायद्याच्या चौकटीत असते. म्हणजेच, इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा न आणता आपले स्वातंत्र्य वापरणे गरजेचे असते. स्वातंत्र्यामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, नवकल्पना जन्माला येतात आणि समाज प्रगतिशील बनतो. व्यक्तीला व्यक्त होण्याची मोकळीक दिल्याशिवाय खरी लोकशाही अस्तित्वात राहू शकत नाही.

**३. समता** (Equality): 'समता' म्हणजे प्रत्येक व्यक्तीला समान वागणूक आणि समान संधी मिळणे. भारतीय संविधान म्हणते की कायद्याच्या दृष्टिकोनातून सर्व नागरिक समान आहेत. कोणत्याही व्यक्तीला जाती, धर्म, वंश, लिंग, आर्थिक स्थिती इत्यादीच्या आधारे दुजाभाव केला जाऊ नये. उदाहरणार्थ, एका गरीब विद्यार्थ्याला आणि श्रीमंत विद्यार्थ्याला एकसारखी शैक्षणिक संधी मिळाली पाहिजे. समतेच्या मूल्यामुळे समाजात वर्चस्ववादी प्रवृत्ती कमी होते आणि समरसतेचे वातावरण तयार होते. विशेषतः भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात समतेचा आदर राखणे हे अधिक आवश्यक ठरते. आरक्षण, समान वेतन, स्त्री-पुरुष समानता यांसारखे उपक्रम समतेच्या मूल्यावर आधारित आहेत. समतेशिवाय लोकशाही केवळ नावापुरती राहते. त्यामुळे संविधान प्रत्येक नागरिकाला समान अधिकारांची हमी देते.

**४. बंधुता** (Fraternity): बंधुता म्हणजे सर्व भारतीयांमध्ये आपुलकी, सहकार्य आणि परस्पर सन्मान यांची भावना निर्माण करणे. हे मूल्य भारतातील एकतेत अनेकता टिकवण्यासाठी अत्यावश्यक आहे. भारत हा बहुभाषिक, बहुधार्मिक, बहुजाती देश आहे. येथे विविधतेतून एकता राखण्यासाठी सर्व नागरिकांनी एकमेकांविषयी आदर आणि विश्वास ठेवणे आवश्यक आहे. बंधुतेमुळे समाजात सामाजिक सलोखा निर्माण होतो. बंधुतेची भावना नसल्यास समाजात तेढ, वाद, भांडणे आणि हिंसाचार वाढतो. म्हणूनच संविधान बंधुतेवर जोर देते. उदाहरणार्थ, कोणत्याही आपत्तीच्या वेळी, रक्तदानाच्या वेळी किंवा सामाजिक कामात सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र येतात - हे बंधुतेचे उत्तम उदाहरण आहे. बंधुतेमुळे सामाजिक सुरक्षा वाढते, व्यक्तीला आत्मभान मिळते, आणि देशाची एकता मजबूत होते.

**५. लोकशाही** (Democracy): लोकशाही म्हणजे जनतेचे सरकार, जे जनतेच्या प्रतिनिधीद्वारे चालते. संविधान भारताला एक सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक म्हणते. लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क, स्वतंत्र विचार मांडण्याचा आणि सरकारवर प्रश्न विचारण्याचा अधिकार असतो. यात नागरिकांनी केवळ मत देऊन थांबू नये, तर शासनात सक्रिय सहभाग घ्यावा लागतो. उदा., ग्रामसभा, जनसुनावण्या, आंदोलने, यांच्यात सहभागी होणे. लोकशाहीत स्वातंत्र्य, समता, आणि न्याय ही मूल्ये अस्तित्वात राहण्यासाठी सजग आणि सुजाण नागरिकांची गरज असते. जर लोक निष्क्रीय राहिले तर लोकशाहीचा अपभ्रंश होतो. म्हणूनच, लोकशाही मूल्य म्हणजे जबाबदारीने हक्कांचा वापर आणि कर्तव्यांची जाणीव.

लोकशाही ही एक अशी राजकीय व सामाजिक व्यवस्था आहे जिथे लोकांना आपले शासक नियमितपणे घटनात्मक मार्गाने बदलण्याची संधी मिळते, आणि बहुसंख्य लोक निवडणुकांच्या माध्यमातून महत्त्वाच्या धोरणांवर प्रभाव टाकू शकतात.

**६) सरतोरी**

लोकशाही शासनव्यवस्था म्हणजे अशी व्यवस्था जी शासनकर्त्यांना जबाबदार आणि उत्तरदायी बनवते. या व्यवस्थेची प्रभावीता राजकीय नेतृत्वाच्या कौशल्यावर अवलंबून असते.

**७) हेरोडोटस**

ज्या समाजात नागरिकांना समान हक्क प्राप्त असतात आणि जिथे राज्यकर्ते त्यांच्या कृतीसाठी जबाबदार असतात, तो समाज लोकशाही समाज मानला जातो.

**८) जॉन स्टुअर्ट मिल**

लोकशाही हा शासनप्रकार असा आहे की ज्यामध्ये सर्व लोक किंवा त्यांच्या निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून राज्यसत्ता कार्यान्वित केली जाते.

**९) रिओ ख्रिश्चनसन**

लोकशाहीत नागरिक स्वतःहून शासनाला मान्यता देतात आणि राज्यकारभारात बहुसंख्येने सक्रिय सहभाग घेतात.

**१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

लोकशाही म्हणजे अशी शासनव्यवस्था जिथे सामाजिक व आर्थिक परिवर्तन शांततेच्या मार्गाने आणि कायदेशीर प्रक्रियेद्वारे घडवून आणले जाते.

**लोकशाहीच्या ऐतिहासिक विकासाचे प्रमुख टप्पे**

**१. प्राचीन ग्रीस:**

लोकशाहीच्या इतिहासाची सुरुवात प्राचीन ग्रीसपासून मानली जाते. इ.स.पू. ५व्या शतकात अथेन्स शहरात नागरिकांना सभा व निर्णयप्रक्रियेत थेट भाग घेण्याचा हक्क होता. याला प्रत्यक्ष लोकशाही (Direct Democracy) असे म्हणतात. मात्र, या वेळी स्त्रिया, गुलाम आणि परकीयांना मतदानाचा अधिकार नव्हता.

**२. प्राचीन भारत:**

भारतातही लोकशाहीविचारांची परंपरा खूप जुनी आहे. वेदकाळात आणि बौद्धकालात 'सभा' आणि 'समिती' या संकल्पना होत्या. या संस्था निर्णयप्रक्रियेसाठी वापरल्या जात. महाजनपद काळात काही गणराज्ये होती, जिथे नागरिकांनी सामूहिक निर्णय घेतले.

**३. आधुनिक लोकशाहीचा प्रारंभ – इंग्लंड:**

इ.स. १२१५ मध्ये इंग्लंडमध्ये मॅग्ना कार्टा या दस्तावेजामुळे राजाची सत्ता मर्यादित झाली आणि नागरिकांच्या अधिकारांना सुरुवात झाली. पुढे १६८८ मध्ये ग्लोरियस रेव्होल्यूशननंतर संसदेला सर्वोच्च मान्यता मिळाली.

**४. अमेरिकन स्वातंत्र्य आणि लोकशाही:**

१७७६ मध्ये अमेरिकेने ब्रिटनपासून स्वातंत्र्य घेतले आणि लोकशाही तत्वांवर आधारित संविधान स्वीकारले. लोकसत्तेचे सरकार, लोकांनी निवडलेले सरकार आणि लोकांसाठी सरकार या लिंकनच्या विचारांनी लोकशाहीला दिशा दिली.

**५. फ्रेंच राज्यक्रांती:**

१७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये लोकशाहीच्या केंद्रस्थानी आणली. ही मूल्ये पुढे अनेक देशांच्या संविधानांमध्ये स्थान मिळवू शकली.

**६. १९व्या व २०व्या शतकातील लोकशाहीचा प्रसार:**

या कालखंडात अनेक देशांमध्ये राजेशाहीची जागा लोकशाहीने घेतली. मताधिकार हळूहळू सर्व नागरिकांसाठी खुला झाला. स्त्रियांनाही मतदानाचा हक्क मिळाला.

**७. भारतातील लोकशाहीचा विकास:**

भारताने १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळवले आणि १९५० मध्ये लोकशाहीप्रधान संविधान स्वीकारले. भारत ही आज जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. येथे सार्वत्रिक निवडणुका, मूलभूत अधिकार, स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य ही तत्त्वे पाळली जातात.

**आदर्श लोकशाहीची अंगे:**

विसाव्या शतकात लोकशाहीच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अशा पैलूंचा विकास झाला. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक ही आदर्श लोकशाहीची विविध अंगे आहेत.

लोकशाहीमध्ये राजकीय लोकशाही हा शासनाचा प्रकार आहे. या प्रकारामध्ये लोक स्वतः प्रत्यक्षरित्या किंवा प्रतिनिधीद्वारे शासन सत्तेचा उपयोग करतात. राजकीय लोकशाहीमध्ये प्रौढ नागरिकाला भाषा, जात, धर्म, वंश, संपत्ती, सामाजिक दर्जा, प्रदेश या आधारावर कोणताही भेदभाव न करता मतदानाचा समान अधिकार दिला आहे. प्रौढ नागरिकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवले जात नाही. राजकीय लोकशाहीमध्ये निवडणूकीत उभे राहण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. वैधानिक मार्गाने शासन वदलण्याचा अधिकार लोकांना असतो. राजकीय पक्षाची निर्मिती, मताधिकार राजकीय लोकशाहीचा मुख्य उद्देश आहे. कांही देशात राजकीय लोकशाहीचा अभाव दिसून येतो साम्यवादी देशात आर्थिक लोकशाहीवर भर दिला जातो. त्यामूळे राजकीय लोकशाही मर्यादित होते अशा देशात इतर राजकीय पक्ष निर्माण करण्याचे स्वातंत्र्य नसते तसेच शासनाचे धोरण आणि कार्याबद्दल विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य नसते.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वावर सामाजिक लोकशाही मधील समाजव्यवस्था आधारलेली असावी. जाती, धर्म, वंश, भाषा, श्रेष्ठ, कनिष्ठ, गरीव, श्रीमंत अशा प्रकारचा भेदभाव नसावा. प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेला महत्व असावे असे अपेक्षित असते. काही क्षेत्रामध्ये राजकीय लोकशाही प्रस्थापित होते पण सामाजिक लोकशाहीचा अभाव दिसून येतो. उदा. अमेरिकेत राजकीय लोकशाही उच्च प्रतिची आहे पण अजूनही तेथील कृष्णवर्णीय सामाजिक जीवनात सन्मानाचे आणि इतरांच्या वरोबरीचे स्थान प्राप्त झालेले नाही. तसेच भारतात देखील राजकीय लोकशाही आहे, पण व्यबहारात सामाजिक लोकशाही अजूनपर्यंत रूजलेली नाही ही वास्तविकता नाकारता येत नाही. कांही देशात सामाजिक लोकशाही आहे तर काही देशात राजकीय लोकशाही नाही म्हणून सामाजिक आणि राजकीय लोकशाही परस्पर पूरक आहे. यासाठी दोन्हीचे अस्तित्व असणे आवश्यक आहे.

आर्थिक लोकशाही हा राजकीय लोकशाहीचा पाया आहे. लोकशाही समाजवादात राजकीय आणि आर्थिक लोकशाहीला सारखेच महत्व देण्यात येते. राजकीय लोकशाही प्रस्थापित झाल्यानंतर आर्थिक लोकशाहीच्या स्थापनेवर भर दिला जातो. प्रत्येकाला अर्थाजन करण्याची आणि आपला स्वतःचा विकास करण्याची समान संधी प्राप्त होणे म्हणजे आर्थिक लोकशाही होय समाजवादी विचारवंतांच्या मते, उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची असावीत. भांडवलशाही व्यवस्थेत उत्पादनाची साधने काही व्यक्तींच्या हातात केंद्रीत झाल्यामूळे जनतेचे शोषण होते. त्यामूळे लोकांना आपला आर्थिक विकास करण्याची संधी प्राप्त होत नाही. अशा परिस्थितीत राजकीय लोकशाही अर्थहीन ठरते आर्थिक लोकशाही जो पर्यंत प्रस्थापित होत नाही तो पर्यंत राजकीय लोकशाही खऱ्या अर्थाने प्रस्थापित होऊ शकत नाही.

लोकशाहीच्या कारभारात लोकांचा सहभाग कोणत्या रीतीने होतो यावरून लोकशाहीचे प्रत्यक्ष लोकशाही व अप्रत्यक्ष लोकशाही असे प्रकार आपण पाडत आलो आहोत. प्रत्यक्ष लोकशाहीचे आदर्श स्वरूप ग्रीक नगरराज्यांमध्येच अस्तित्वात होते. त्या नगरराज्यांचा कारभार करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी त्या त्या नगरातील सर्व नागरिक एकत्र होत असत आणि निर्णय घेत असत. प्रत्यक्ष लोकशाही ही स्वित्झर्लंड देशातच काही प्रमाणात आढळते. तिथल्या नागरिकांना कायदयाचा मसुदा मांडण्याबाबत पुढाकार घेता येतो, आपल्या प्रतिनिधींना परत बोलावण्याचा हक्क असतो आणि तिथले राज्यकर्ते काही प्रस्ताव निर्णय घेण्यापूर्वी नागरिकांच्या सार्वमताला टाकू शकतात. एवढ्याच संदर्भात तिथे प्रत्यक्ष लोकशाहीचे अवशेष आहेत असे म्हणायला जागा आहे. वार्षिक मेळाव्यात नागरिकांनी एकत्र येऊन राजकीय निर्णय घेण्याची प्रथा स्वित्झर्लंड मधील सव्वीस पैकी फक्त पाच घटकराज्यात आढळते.

अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक लोकशाहीतील नागरिक निवडणूकींव्दारे आपले प्रतिनिधी निवडतात आणि ते प्रतिनिधी लोकांच्यावतीने राज्यकारभार करतात. प्रातिनिधीक लोकशाहीचे अध्यक्षीय व संगदीय असे दोन प्रकार आढळतात. त्यातील पहिल्या प्रकारात म्हणजेच अध्यक्षीय लोकशाहीत कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ एकमेकांपासून स्वतंत्र असतात. अशाप्रकारची व्यवस्था अमेरिकेत आढळते तर दुसऱ्या प्रकारच्या म्हणजेच संसदीय लोकशाहीत कार्यकारी मंडळ विधिमंडळात उत्तरदायी असते आणि त्याचा विश्वास असे पर्यंतच सत्तेवर राहू शकते. ही व्यवस्था भारत आणि इंग्लंड या देशात आढळते. नागरिक सार्वत्रिक निवडणूकांच्या माध्यमातून आपले प्रतिनिधी निवडतात. हे प्रतिनिधी नागरिकांच्या वतीने शासन कारभार चालवितात ते जनतेला उत्तरदायी आणि जवावदार असतात. या प्रतिनिधींनी घेतलेल्या निर्णयांना ठरविलेल्या धोरणांना जनतेची अधिमान्यता असते जनतेला निवडणूकींच्या माध्यमातून शासनकर्त्यांना बदलण्याचा अधिकार असतो. थोडक्यात प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये जनता जरी प्रत्यक्ष शासन कारभारात सहभागी होत नसली तरी सत्तेची खरी सुत्रे जनतेच्या हातात असतात.

### १.१.२. लोकशाही –एक आदर्श जीवन प्रणाली आणि राजकीय–सामाजिक व्यवस्था

**लोकशाहीची तत्वे :**

लोकशाही ही एक जीवनप्रणाली असून ती काही तत्त्वांवर आधारित असते. ती तत्वेचे पुढील प्रमाणे

**१) लोकांचे राज्य:** लोकांचे राज्य म्हणजेच लोकांकडून चालवले जाणारे शासन होय. लोकशाहीमधील अंतिम सत्ता सार्वभौमत्व हे लोकांचे असते. राजकीय दृष्टीने तीच अखेरची सत्ता असते लोक स्वतंत्र होणे आणि ते सक्षम होणे हे उदारमतवादी लोकशाहीचे ध्येय आहे. आधुनिक काळात अप्रत्यक्ष लोकशाही ही प्रौढ मतदानाच्या हक्कामधून मान्य झालेली आहे. सार्वत्रिक, खुल्या व नियमित निवडणूकांतून लोकांची सत्ता व्यक्त होते आणि राजकीय सत्तेला अधिमान्यता मिळते.

**२) बहूमताचे शासन :** राजकीय व्यवहार सुरळीत चालण्यासाठी व राजकीय स्थित्यंतर शांततामय पद्धतीने होण्यासाठी बहूमताचे शासन हा लोकशाहीतील महत्वाचा नियम आहे. निवडणूकीच्या पद्धतीत प्रचलित असलेल्या प्रत्येक प्रकाराचे काही फायदे व मर्यादा आहेत मतदानाचा अधिकार पवित्र आणि जवाबदारीचा अधिकार मानला गेलेला आहे. तथापि तो सर्वजण बजावतीलच असे नाही आणि त्यावावत सक्ती करण्यावावतही दुमत आढळते. प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पद्धती, व्यावसायिक, दुवार मतदान इ. अनेक पध्दतीचा वापर होत असला तरी प्रौढ सार्वत्रिक मतदान सर्वसामान्यतः वापरण्यात येते. अशा पध्दतीत संघटित अल्पमत बहुसंख्येने निवडुन येणाऱ्यांना वहुमताचा आधार असेलच असे नाही. वहुमताने घेतलेला निर्णय सर्वाना मान्य करावा लागतो

**३) व्यक्ती विकासाला प्राधान्य :** जनतेच्या सार्वभौमत्वाचा पुरस्कार करताना व्यक्तीचा विकास घडवून आणणे आणि त्यासाठी राज्याने अनुकूल, वाह्य परिस्थिती निर्माण करणे हे राज्याचे कर्तव्य मानलेले आहे उदारमतवादी विचारांत व्यक्तीहित  आणि समाजहित यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो व्यक्तिवादी सिद्धांत राज्याच्या कोणत्याही हस्तक्षेपाला विरोध करतो इतकी टोकाची भूमिका लोकशाही सिद्धांत घेत नाही. आधूनिक गज्यघटनेत व्यक्तीच्या मूलभूत हक्कांची नोंद करण्याची प्रथा आहे. व्यक्तीस्वातंत्र्याचा, व्यक्तीविकासाच्या मूलभूत हक्कांची नोंद आणि त्यांच्या रक्षणाची खास मोय राज्यघटनेत केलेली आढळते.

**४) व्यक्तीविकासासाठी व्यक्तीस्वातंत्र्याचा आग्रह :** व्यक्तीविकासासाठी राज्याने केवळ अनूकूल वाह्य परिस्थिती निर्माण करून न थांवता त्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत आणि समाजहितासाठी त्यावर काही वंधने आणावी लागली तर ती कमीत कमी व सामाजिक उपयुक्ततेच्या मयदितच असली पाहिजेत. जे. एस. मिलने व्यक्तीचे स्वसंबंध आणि समाजसंबंध असे दोन भाग पाडलेले असून स्वसंबंधी क्षेत्रात त्याला संपूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे असे म्हटले आहे.

**५) लोकांचा सहभाग :** लोकशाहीमध्ये लोकांचा सहभाग वाढावा म्हणून शासन प्रकिया अधिकाधिक सहभागी करण्याकडे अधीक कल दिसून येतो. शासकीय निर्णयप्रकियेत व अंमलबजावणीत लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी लोकांच्या निर्णयाचे क्षेत्र वाढविले जाते विकेंद्रिकरणातून हे शक्य होते तसेच शासनाच्या रचनेत विभागणी नियंत्रणाचा वापर करून समतोल निर्माण केला जातो जनतेचा सहभाग, प्रशासन प्रकिया जिल्हा व खालील स्तरापर्यंत पंचायती राज्यव्यवस्थेने नेऊन वाढविलेला आहे.

**६) शासकीय व्यवस्थेचे विकेंद्रिकरण :** विकेंद्रिकरण लोकशाही शासन व्यवस्था स्थिर करण्यात महत्वाची कामगिरी बजावते विकेंदिकरणाचा फायदा केवळ प्रशासकीय क्षेत्रापूरता मर्यादित न राहता राजकीय दृष्ट्या ही व्यवस्थेला मान्यता देण्याच्या दृष्टिने महत्वाचा ठरतो. केंदिकरणाचे तोटे त्यामूळे कमी होऊन राजकीय व्यवस्था लोकांना जवळची वाटू लागते. लॉकने लोकांची संमती विधिमंडळाचे सार्वभौमत्व आणि वहूमताचे प्रतिनिधिक शासन या कल्पनांचा पुरस्कार केला. मॉटेस्क्यूने सत्ताविभाजनाची कल्पना लोकशाहीच्या संदर्भात पूढे आणली.

**७) शासन जनतेला जबाबदार :** संसदीय व अध्यक्षीय पध्दती हे प्रातिनिधिक शासनाचेच भिन्न भिन्न प्रकार आहेत. या निरनिराळया प्रकारामुळे राज्याच्या व्यवस्थेत व शासनप्रणालीत जरी फरक असला तरी दोन्ही व्यवस्थेत शासन जनतेला जवाबदार असते आणि जनतेच्या प्रतिनिधिंच्याव्दारे आणि त्यांच्या नियंत्रणानुसार शासनाचे कार्य होते.

**लोकशाहीची वैशिष्ट्ये :**

**१) अंतिम निर्णय घेण्याची सत्ता जनतेकडे :** लोकशाही व्यवस्थेचे हे सर्वात महत्वाचे वैशिष्टय आहे अमेरीकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अवाहम लिंकन यांनी लोकशाहीची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, Democracy is the rule of the people for the people and by the people. याचा अर्थ जनतेला केंद्रस्थानी ठेऊन कार्य करणारी ही व्यवस्था आहे. राज्यातील सर्वोच्यमत्ता ही जनतेच्या हातात असलेमूळे अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा जनतेकडेच असतो. लोकशाही जनता ही आपल्या पतिनिधिच्या माध्यमातून शासन चालवत आहे हे प्रतिनिधी जनतेकडून निवडले गेले असल्यामूळे त्यांनी घेतलेले निर्णय हे जनतेचे निर्णय असतात.

**२) मुक्त आणि सार्वत्रिक निवडणूका :** मुक्त आणि सार्वत्रिक निवडणूका हे लोकशाहीचे दुसरे महत्वाचे वैशिष्ट्य आहे मुक्त आणि सार्वत्रिक निवडणूकांशिवाय लोकशाहीचे अस्तित्व शक्य नाही. या निवडणूकांद्वारे जनता आपले प्रतिनिधी शासन कारभारासाठी निवडते लोकसंख्या वाढल्यामूळे प्रत्यक्ष लोकशाही आज शक्य नाही प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये पत्येक नागरिक शासन कारभारात सहभाग घेतो पण ते आज शक्य नाही परिणामी जनता अप्रत्यक्षपणे आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून शासन चालविते. हा अप्रत्यक्ष लोकशाहीचा प्रकार लोकशाहीमध्ये केवळ निवडणूका असून पुरेसे नाही जनतेपुढे विविध राजकीय पर्याय उपलब्ध असणे गरजेचे आहे. जनता या पर्यायामधून निवडणूकीच्या माध्यमातून आपल्या पसंतीचा पर्याय निवडते. निवडणूकांमुळे जनतेला केवळ आपले प्रतिनिधी निवडण्याचीच संधी मिळत नाही तर अस्तित्वात असलेले शासन वदलण्याची संधीही मिळते.

**३) सार्वत्रिक प्रौढ मताधिकार :** गेल्या दोन दशकात लोकशाहीसाठी चाललेला संघर्ष प्रामुख्याने सार्वत्रिक प्रौढ मताधिकारासाठीचा संघर्ष आहे. कोणत्याही भेदभावाशिवाय राज्यातील प्रत्येक प्रौढ नागरिकाला एक मत मिळायलाच हवे (One man-One vote) आणि त्या एका मतालाही मुल्य असायला हवे हे लोकशाहीचे वैशिष्टय आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वाधापर्यंत मतदानाचा अधिकार हा समाजातील विशिष्ट वर्गापुरताच मर्यादित होता. महिलांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आले होते परंतु आता जगातील सर्वच राष्ट्रांनी महिलांनाही मतदानाचा अधिकार दिला आहे. भारतात वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या भारतीय नागरिकाला कोणत्याही भेदभावाशिवाय, पूर्व अटीशिवाय मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे.

**४) व्यापक राजकीय सहभाग :** लोकशाहीमध्ये जनतेचा राजकीय सहभाग हा व्यापक स्वरूपाचा असतो हा राजकीय महभाग विशिष्ट अंतराने होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकांमधून प्रतिबिंबीत होतो प्रौढ मताधिकारांमूळे सर्वच नागरिक राजकीय प्रकियेत सहभागी होत असतात. नागरिकांच्या व्यापक राजकीय सहभागावरच लोकशाहीची यशस्विता अवलंबून असते. विकसीत राष्ट्रात नागरिकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो. त्या प्रमाणात अविकसीत राष्ट्रांत सहभाग हा अल्प असतो.

**५) सत्तेचे विकेंद्रीकरण :** लोकशाही शासनात सत्तेचे विकेंद्रीकरण महत्वाचे असते. लोकशाहीत कोणत्याही घटकाकडून सत्तेचा गैरवापर होऊ नये यासाठी सत्ता विभाजन आवश्यक असते कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ, यांच्यात अधिकारांची विभागणी केलेली असते. तव्दतच केंद्रीय पातळीपासूनच ते ग्रामपातळीपर्यंत सत्तेच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करून सर्वसामान्य नागरिकांनाही राजकीय प्रकियेत सहभागी होण्याची संधी दिली जाते.

**६) स्पर्धात्मकता :** स्पर्धात्मकता हे लोकशाहीचे महत्वाचे वैशिष्टय आहे. विविध राजकीय पक्ष सत्ताप्राप्तीसाठी निवडणूकांच्या रिंगणात असतात. निवडणूकाच्या माध्यमातून सत्ता प्राप्त करण्यासाठी त्यांच्यात चढाओढ असते या बहूलतेमुळे नागरिकांनाही पर्याय उपलब्ध होतात. भारतात वहुपक्ष पद्धतीमूळे ही ग्पर्धात्मकता वाढली आहे.

**७) घटनात्मक कायदा आणि जनअधिकारांना केंद्रस्थान :** लोकशाहीचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे घटनात्मक कायदा आणि जनअधिकारांना असलेले केंद्रस्थान. निवडणूकीद्वारे निवडून आलेल्या प्रत्येक शासनाला घटनात्मक कायदयाच्या चौकटीत राज्यकारभार करावा लागतो घटनात्मक कायदा हा राज्यातील सर्वोच्च कायदा

असून तो सर्वांसाठी समान असतो. घटनात्मक कायदयाने जनतेला काही नागरी आणि राजकीय अधिकार बहाल केलेले असतात. या अधिकारांचे रक्षण करणे शासनाचे कर्तव्य आहे शासनाकडून या अधिकारांचे उल्लंघन झाल्यास व्यक्तीला न्यायपालिकेकडे दाद मागण्याचा अधिकार आहे. हे अधिकार लोकशाहीतील राजकीय सहभाग वाढविण्यासाठी महत्वाचे आहेत.

**लोकशाहीचे गुण :**

लोकशाही हा शासनव्यवस्थेचा सर्वोत्तम प्रकार असुन त्याचे गुण पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१) समता, स्वातंत्र्य व बंधूता या तत्त्वांना पोषक :** लोकशाही हा एकमेव शासन प्रकार असा आहे की जिथे प्रत्येक व्यक्तीला आपले स्वतःचे असे मोल असते आणि प्रत्येक व्यक्तीच्या अंगी विकासाच्या अमर्याद सुप्त शक्यता दडलेल्या असतात असे गृहित धरले जाते. प्रत्येकाला स्वतःच्या सुप्त गुणांचा व मानवी व्यक्तिमत्वाचा जास्तीत जास्त विकास करण्याची संधी पुरविली जाते. लोकशाही राज्यव्यवस्थेत सर्वांना समान वर्तणूक मिळते समान हक्क व स्वातंत्र्ये दिली जातात आणि सर्वांचे परम्परांशी असलेले संबंध बंधुभावाचे राहतील असे प्रयत्न केले जातात.

**२) सर्वाच्या हितसंबंधांचे संरक्षण:** नोकशाहीमध्ये गमाजातील सर्व लोकांच्या हितयंबंधांचे गंरक्षण होते. लोकशाहीत गर्व जनतेचे प्रतिनिधित्व करणारे शासन असल्यामूळे जनतेचे प्रश्न शासनाला माहित असतात आणि ते सोडविण्यासाठी प्रयत्न केला जातो.

**३) कल्याणकारी भूमिका:** आधूनिक काळात लोकशाही शासन व्यवस्थांनी कल्याणकारी भूमिका स्वीकारली असून या शासन व्यवस्था सामाजिक प्रगतीसाठी वचनबद्ध आहेत जनतेचे अधिकाअधिक कल्याण करणे हे या आसनाचे उद्दिष्ट असते त्यानुसार विकास योजना राबविल्या जातात.

**४) लोकमताला प्राधान्य:** लोकशाही ही लोकमत किंवा जनमताला प्राधान्य देणारी शासन पद्धती आहे. लोकशाहीत शासन हे लोकमताचे प्रतिनिधित्व करणारे असते कोणताही निर्णय घेताना किंवा धोरण ठरविताना लोकमताचा विचार केला जातो. राज्यकर्त्यांवर लोकमताचा सातत्याने दबाव असतो.

**५) विकेंद्रीकरण :** लोकशाही शासन व्यवस्था ही विकेंद्रीकरणाच्या तत्वावर आधारलेली आहे. या पद्धतीत सत्ता ही विविध पातळयांवर आणि विविध घटकांमध्ये विभागली जाते सत्ता विभागणीमूळे परस्पर समतोल आणि नियंत्रण साधले जाते. कोणताही निर्णय परस्पर विचार चर्चेतून घेतला जातो लोकशाही विकेंद्रीकरणामूळे निर्णय निर्मिती प्रक्रियेत अधिकाअधिक लोकांना समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न होतो.

**६) जनशक्ती श्रेष्ठ :** लोकशाहीत सत्तेची अंतिम सुत्रे ही जनतेच्या हातात असतात. जनता आपले प्रतिनिधी निवडून देते हे प्रतिनिधी आपल्या कार्यासाठी जनतेला जवाबदार असतात. या पद्धतीत शासन निरंकुश बनण्याचा किंवा एकाधिकारशाही पणे वागण्याचा प्रश्न उद्भवत नाही राज्यकर्त्यामध्ये जवाबदारीची जाणीव असते.

**७) राजकीय प्रशिक्षण :** लोकशाही ही जनतेला राजकीय प्रशिक्षण देणारी त्यांना स्वयंशासनाची कला शिकविणारी प्रयोगशाळा आहे. या पद्धतीत सर्व जनतेला राजकीय प्रकियेत समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

**८) शांतता, सुरक्षिततेला प्राधान्य:** लोकशाही शासन व्यवस्था शांतता आणि सुरक्षिततेच्या तत्वांना प्राधान्य देणारी आहे. या पद्धतीत सत्तांतराची प्रकियादेखील शांततेच्या आणि घटनात्मक पद्धतीने होते जनता निवडणूकांच्या माध्यमातून आपल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करत सत्तांतर घडवून आणते. शांतता आणि सुरक्षितता व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी उपकारक ठरते.

भारतीय लोकशाही – एक आदर्श उदाहरण

**१. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे योगदान:**

भारतीय स्वातंत्र्यलढा हा लोकशाही मूल्यांच्या आधारेच लढला गेला. महात्मा गांधींनी 'सत्याग्रह' आणि 'अहिंसा'च्या मार्गाने जनतेला सशक्त केलं. या लढ्यातून समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि आत्मनिर्भरतेचे तत्त्व माणसाच्या मनात रूजले.

**२. संविधानाचा स्वीकार:**

भारताने २६ जानेवारी १९५० रोजी लोकशाही राज्यघटना स्वीकारली. ही घटना लोकशाही मूल्यांवर आधारित आहे. प्रस्तावनेतच 'लोकशाही प्रजासत्ताक' ही संकल्पना स्पष्ट केली आहे.

**३. सार्वत्रिक मताधिकार:**

भारतात पुरुष-स्त्री, गरीब-श्रीमंत, कोणताही भेद न करता प्रत्येक प्रौढ व्यक्तीस मतदानाचा अधिकार आहे. ही बाब भारताला सर्वसमावेशक लोकशाही बनवते.

**४. लोकशाही संस्था:**

भारतात लोकशाही टिकवण्यासाठी संसद, न्यायपालिका, कार्यपालिका, निवडणूक आयोग, लोकपाल, सीएजी, माहिती आयोग इत्यादी संस्था आहेत. या संस्था एकमेकांपासून स्वतंत्र आहेत व पारदर्शकतेसाठी कार्य करतात.

**लोकशाहीची मूल्ये व तत्वे**

लोकशाही फक्त राजकीय प्रक्रिया नाही, ती सामाजिक आणि नैतिक मूल्यव्यवस्था आहे. तिची मूलतत्त्वे अशी आहेत:

**समानता:** सर्व नागरिक कायद्यापुढे समान.

**स्वातंत्र्य:** व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य.

**बंधुता:** सर्व समाज घटकांमध्ये ऐक्य आणि एकोपा.

**न्याय:** सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय.

**सहिष्णुता व समवयता:** भिन्न मतांचा आदर करणे.

**पारदर्शकता व जबाबदारी:** सत्ताधाऱ्यांची उत्तरदायित्वाची भावना.

**नागरिकत्त्व शिक्षण आणि लोकशाही**

लोकशाहीची खरी ताकद जागरूक, सुशिक्षित व जबाबदार नागरिकांमध्ये असते. यासाठी नागरिकत्त्व शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे.

**१. नागरिकत्त्व शिक्षण म्हणजे काय?**

हे शिक्षण विद्यार्थ्यांना त्यांच्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांची जाण करून देते. यातून लोकशाही मूल्यांचे संवर्धन होते.

**२. यामध्ये काय शिकवले जाते?**

संविधानातील मूल्ये आणि उद्दिष्टे.

निवडणूक प्रक्रिया आणि मतदानाचे महत्त्व.

सामाजिक न्याय, मानवाधिकार, आणि समतेची भावना.

विविधतेतील एकता आणि सहिष्णुता.

पर्यावरणीय जबाबदारी.

माध्यम साक्षरता व माहितीचा योग्य वापर.

**३. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांची भूमिका:**

शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे ही केवळ ज्ञान देण्याचे माध्यम नसून, नागरिक घडवण्याचे केंद्र आहे. प्रार्थनासभा, वादविवाद, रोल-प्ले, सामूहिक निर्णयप्रक्रिया या माध्यमांतून नागरिकत्त्वाचे प्रशिक्षण देता येते.

**राष्ट्रीय ध्येये आणि लोकशाही**

भारताच्या संविधानाच्या प्रस्तावनेत राष्ट्रीय ध्येये नमूद आहेत. ही ध्येये म्हणजे भारतीय लोकशाहीचे अंतिम उद्दिष्ट आहेत:

**स्वातंत्र्य:** प्रत्येक व्यक्तीला विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म आणि उपासना स्वातंत्र्य.

**समता:** सर्वांना संधींची समानता.

**बंधुता:** सर्व नागरिकांत बंधुभाव व एकात्मतेची भावना.

**न्याय:** समाजातील प्रत्येक घटकाला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळावा.

ही ध्येये फक्त घोषवाक्य नसून, शासन व नागरिकांनी मिळून साध्य करायची उद्दिष्टे आहेत.

**लोकशाहीवरील आव्हाने**

भ्रष्टाचार

सामाजिक विषमता

जाती-धर्माच्या आधारावरील राजकारण

खोट्या बातम्या व माहितीचा गैरवापर

नागरिकांचा अनासक्तपणा

**१.२ विषय विवेचन:**

लोकशाही ही केवळ एक राज्यपद्धती नसून ती एक जीवनपद्धती आहे. लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींची निवड, शासनव्यवस्था, कायदे आणि प्रशासन या सर्वांचा पाया म्हणजे नागरिकांचा सक्रीय सहभाग. अशा व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीचे मत, हक्क, जबाबदारी आणि कृती महत्त्वाची ठरते. त्यामुळेच कोणतीही लोकशाही यशस्वी होण्यासाठी 'सुजाण नागरिकत्व' असणे ही आवश्यक अट ठरते. परंतु सुजाण नागरिक म्हणजे नक्की कोण? केवळ मतदान करणारा व्यक्ती सुजाण नागरिक ठरत नाही. तर लोकशाही मूल्यांची जपणूक करणारा, सामाजिक भान असलेला, कर्तव्यनिष्ठ, विवेकबुद्धीने विचार करणारा, आणि राष्ट्रहितासाठी योगदान देणारा माणूसच खरा सुजाण नागरिक मानला जातो. लोकशाही मूल्ये म्हणजे कायदेपालन, समानता, स्वातंत्र्य, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि मानवमूल्यांवर आधारित आचरण. ही मूल्ये केवळ घटनेत लिहून ठेवली गेली आहेत म्हणून ती सुरक्षित राहणार नाहीत. ती मूल्ये लोकांच्या वागणुकीत उतरली पाहिजेत. सुजाण नागरिक हीच ती व्यक्ती आहे जी केवळ स्वतःचे हित न पाहता समाजातील सर्व घटकांचा विचार करते, इतरांचे अधिकार तितक्याच आदराने मान्य करते आणि आपल्या कर्तव्यांचे गांभीर्याने पालन करते. याचमुळे सुजाण नागरिक हा लोकशाहीचा कणा ठरतो.

सुजाण नागरिक लोकशाही प्रक्रियांमध्ये फक्त सहभाग घेत नाही तर त्यांचा अर्थही समजून घेतो. निवडणुका केवळ उमेदवारांचा खेळ नसतात, तर त्या एक जबाबदारीची प्रक्रिया असते. कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा उमेदवाराला केवळ जातीधर्माच्या आधारावर किंवा क्षणिक लाभाच्या आशेवर मतदान करणे म्हणजे लोकशाही मूल्यांचा अपमानच ठरतो. सुजाण नागरिक उमेदवाराची पार्श्वभूमी, विचारसरणी, कामगिरी यांचा अभ्यास करून मत देते. तिचा हेतू केवळ सत्तांतर नसून सशक्त, पारदर्शक आणि उत्तरदायी शासन व्यवस्था निर्माण करणे हा असतो. सुजाण नागरिक केवळ राजकारणातच नाही, तर आपल्या दैनंदिन जीवनातही लोकशाही मूल्यांची अंमलबजावणी करतो. सार्वजनिक ठिकाणी शिस्त पाळणे, इतरांचे हक्क मान्य करणे, स्त्रियांबद्दल आदर बाळगणे, पर्यावरणाची काळजी घेणे, कर भरून शासनाच्या कार्यात सहभागी होणे, आपत्तीच्या काळात मदतीचा हात देणे, हे सर्व कृती लोकशाही मूल्यांच्या अंगभूत भाग आहेत.

सामाजिक समता आणि बंधुता या मूल्यांचे जतन करणे हे सुजाण नागरिकाचे कर्तव्य असते. समाजामध्ये अनेक जाती, धर्म, भाषा, प्रांत, आर्थिक स्तर यांमध्ये भेद असतो. परंतु लोकशाही व्यवस्था सर्वांना एकसमान हक्क देते. त्यामुळे या विविधतेचा सन्मान करत सहअस्तित्वाच्या तत्त्वावर चालणे हीच खरी लोकशाही आहे. सुजाण नागरिक कधीच द्वेषमूलक भाषण, अफवा, सोशल मीडियावरील चुकीची माहिती यांना बळी पडत नाही. तो माहितीचे सत्य तपासतो, विवेकाने निर्णय घेतो आणि गरज पडल्यास चुकीच्या गोष्टींविरुद्ध उभा राहतो. लोकशाही मूल्यांची खरी परीक्षाच अशा वेळी घेतली जाते जेव्हा समाजात मतभेद निर्माण होतात. सुजाण नागरिक अशा परिस्थितीत संयम, संवाद, आणि समजूतदारपणा या गोष्टींचा आधार घेतो. त्याला माहिती असते की विरोध करणे म्हणजे देशविरोध नव्हे, आणि समर्थन करणे म्हणजे नेहमी योग्य नव्हे. मतभिन्नतेला जागा देणे, विरोधकांनाही बोलण्याची संधी देणे, हेच लोकशाहीचे खरे सौंदर्य आहे.

आजच्या डिजिटल युगात सुजाण नागरिक बनण्यासाठी माहितीची योग्य पारख करणेही अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. खोट्या बातम्या, फेक न्यूज, द्वेषमूलक पोस्ट्स, अफवा यांचा समाजावर नकारात्मक परिणाम होतो. अशा गोष्टींपासून दूर राहून, समाजात शांतता आणि समजूत निर्माण करणारे नागरिक लोकशाहीच्या रक्षणासाठी अनिवार्य ठरतात. सुजाण नागरिक फक्त प्रतिक्रिया देत नाही तर कृतीशील असतो. तो पर्यावरणपूरक जीवनशैली

निवडतो, सामाजिक कार्यात सहभागी होतो, स्वच्छता राखतो, आणि इतरांनाही प्रेरणा देतो. शाळा, महाविद्यालये, माध्यमे, समाजसंस्था या सर्वांनी लोकशाही मूल्यांची शिकवण देणं गरजेचं आहे. पण केवळ शाब्दिक शिकवण पुरेशी नसते, ती कृतीत उतरली पाहिजे. घरी, शाळेत, समाजात आपण काय वागतो, कसे बोलतो, कोणत्या गोष्टींना प्राधान्य देतो, यावरून पुढची पिढी शिकते. त्यामुळेच प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करून लोकशाही मूल्यांचे प्रत्यक्ष पालन करणे हे आजच्या काळात नितांत गरजेचे झाले आहे.

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे अधिकच महत्त्वाचे आहे. इथं भाषेची, धर्माची, जातीची, संस्कृतीची विविधता आहे, पण तरीही आपण एकसंघ आहोत, कारण आपली लोकशाही आपल्याला समानता आणि बंधुतेचे भान देते. हीच आपली खरी ओळख आहे. जर प्रत्येक नागरिकाने स्वतःला या मूल्यांचा रक्षक समजले, तर देश अधिक सशक्त, समतेचा आणि शांततेचा मार्ग पकडू शकतो. सुजाण नागरिक हा केवळ देशाचा घटक नसतो, तर तो देशाच्या भवितव्याचा शिल्पकार असतो. लोकशाही मूल्यांची जपणूक करणारा सुजाण नागरिक म्हणजे समाजाच्या उज्ज्वलतेकडे नेणारा दीपस्तंभच आहे. त्याच्या विचारशीलतेत, कृतीशीलतेत, विवेकबुद्धीत आणि जबाबदारीतूनच लोकशाही सुदृढ होते. म्हणूनच प्रत्येकाने आपल्यातील सुजाण नागरिक जागवणे, आणि लोकशाही मूल्यांची जपणूक करणे हीच काळाची गरज आहे.

### १.२.१ लोकशाही नागरिकत्व –संकल्पना, अर्थ आणि स्वरूप:

लोकशाही ही केवळ एक शासनपद्धती नसून ती एक मूल्याधिष्ठित सामाजिक जीवनपद्धती आहे. या पद्धतीचे यश नागरिकांच्या सक्रिय सहभागावर आणि त्यांच्या सजगतेवर अवलंबून असते. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेमध्ये नागरिकत्व या संकल्पनेला विशेष महत्त्व प्राप्त होते. परंतु हे नागरिकत्व केवळ कायदेशीर ओळख किंवा निवडणुकीतील सहभागापुरते मर्यादित नसून त्याला मूल्यात्मक आणि जबाबदारीपूर्ण पैलू असतो. या मूल्याधिष्ठित, सक्रिय आणि जबाबदारीच्या भावनेने युक्त नागरिकत्वाला लोकशाही नागरिकत्व (Democratic Citizenship) असे म्हणतात.

**संकल्पना:**

लोकशाही नागरिकत्व ही संकल्पना तीन मुख्य अंगांवर आधारित असते – हक्क, कर्तव्ये आणि सहभाग. हक्कांमध्ये मूलभूत अधिकार, सामाजिक संरक्षण, समान संधी यांचा समावेश होतो. कर्तव्यांमध्ये कायदे पाळणे, कर भरणे, सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेणे, मत व्यक्त करताना इतरांचा आदर राखणे यांचा समावेश असतो. सहभाग म्हणजे केवळ निवडणुकांमध्ये नव्हे तर सार्वजनिक चर्चांमध्ये, सामाजिक कार्यात, शैक्षणिक, पर्यावरणीय आणि स्थानिक प्रश्नांमध्येही नागरिकांनी सक्रीय भूमिका बजावणे. लोकशाही नागरिकत्व ही एक अशी संकल्पना आहे ज्यामध्ये व्यक्ती केवळ राज्यघटनेनुसार नागरिक म्हणून ओळख प्राप्त करत नाही, तर ती व्यक्ती लोकशाही मूल्यांचे पालन करणारी, सामाजिक उत्तरदायित्व स्वीकारणारी आणि सहअस्तित्वात विश्वास ठेवणारी असते. यामध्ये नागरिकाचा सहभाग फक्त मतदानापुरता मर्यादित न राहता, तो समाज आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी सक्रियपणे योगदान देणारा असतो.

**अर्थ:**

लोकशाही नागरिकत्व म्हणजे अशा नागरिकाची भूमिका जी केवळ स्वतःच्या फायद्यापुरती सीमित न राहता संपूर्ण समाजाच्या कल्याणाचा विचार करते. अशा नागरिकाला आपल्या अधिकारांची जाणीव असते, पण त्याचबरोबर त्याला आपल्या कर्तव्यांचीही जाणीव असते. तो मत स्वातंत्र्याचा उपयोग जबाबदारीने करतो.

तो फक्त कायदे पाळत नाही, तर इतरांनाही कायदापालक बनण्याची प्रेरणा देतो. तो शासनावर टीका करतो, पण ती विधायक असते. तो सामाजिक प्रश्नांबाबत संवेदनशील असतो आणि गरज पडल्यास कृतीही करतो. लोकशाही नागरिकत्वाचा अर्थ म्हणजे एक समतावादी, सहिष्णु, विवेकी, आणि संवादशील जीवनपद्धती स्वीकारणे. यात प्रत्येक व्यक्तीला समान संधी आणि आदर मिळतो, तसेच प्रत्येक व्यक्ती इतरांच्या दृष्टिकोनाची कदर करते. यामध्ये वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा समतोल राखला जातो.

**स्वरूप:**

लोकशाही नागरिकत्वाचे स्वरूप बहुआयामी आहे. यामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरांवर नागरिकाची भूमिका ठरते.

१. **सामाजिक स्वरूप –** लोकशाही नागरिक हा जाती, धर्म, लिंग, भाषा यामधील भेद न करता सर्वांशी समानतेने वागतो. तो सामाजिक न्यायाच्या मूल्यांवर विश्वास ठेवतो. स्त्री–पुरुष समानता, सामाजिक समावेश, आणि संवेदनशीलता याला महत्त्व देतो.

२. **राजकीय स्वरूप –** असा नागरिक मताधिकाराचा योग्य वापर करतो. निवडणूक प्रक्रिया समजून घेतो, राजकीय पक्षांचे विश्लेषण करतो, आणि योग्य प्रतिनिधी निवडण्यासाठी सजग राहतो. त्याचबरोबर तो विविध नागरी चळवळींमध्येही सहभागी होतो, शांततामय मार्गाने आपले मत व्यक्त करतो.

३. **आर्थिक स्वरूप –** सुजाण नागरिक देशाच्या आर्थिक प्रगतीत आपले योगदान देतो. तो कर भरणे, भ्रष्टाचाराविरोधात उभे राहणे, स्थानिक उद्योजकतेला प्रोत्साहन देणे या मार्गांनी सहभागी होतो. पर्यावरणपूरक आणि जबाबदार उपभोग पद्धतीही त्याच्या आचरणात असतात.

४. **सांस्कृतिक स्वरूप –** लोकशाही नागरिक विविध संस्कृतींचा सन्मान करतो. तो आपल्या परंपरेचा अभिमान बाळगतो, पण त्याचबरोबर इतर संस्कृतींचा आदर राखतो. सहिष्णुता, विविधतेचा स्वीकार आणि संवाद याच्या आधारे तो सामाजिक सलोखा प्रस्थापित करतो.

शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण, समाजमाध्यमे, सामाजिक संस्था, आणि कुटुंब हे सर्व घटक लोकशाही नागरिकत्वाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. लोकशाही नागरिकत्व ही केवळ एक वैयक्तिक गोष्ट नसून ती संपूर्ण समाजाच्या स्थैर्याशी आणि प्रगतीशी निगडित असते. म्हणूनच आजच्या काळात प्रत्येकाने सजगपणे आणि जबाबदारीने आपली लोकशाही नागरिकाची भूमिका पार पाडणे गरजेचे आहे. लोकशाही ही केवळ एक राजकीय प्रणाली नसून ती मूलतः एक मूल्याधिष्ठित सामाजिक व्यवस्था आहे. हक्क, समता, स्वातंत्र्य, न्याय, सहभाग आणि जबाबदारी यांसारख्या घटकांवर आधारलेली ही प्रणाली केवळ संस्थात्मक किंवा कायदेशीर पातळीवर मर्यादित राहत नाही, तर ती समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या आचार, विचार आणि कृतीतून साकार होत असते. या व्यवस्थेतील प्रत्येक नागरिकाची भूमिका अत्यंत निर्णायक ठरते. या पार्श्वभूमीवर लोकशाही नागरिकत्व ही संकल्पना आधुनिक राज्यशास्त्रीय विचारसरणीत अत्यंत केंद्रस्थानी आहे.

लोकशाही नागरिकत्व म्हणजे अशा व्यक्तीची ओळख जी केवळ कायद्याने नागरिक म्हणून मान्यता प्राप्त करत नाही, तर लोकशाही मूल्यांशी बांधिलकी मानणाऱ्या, सामाजिक भान असणाऱ्या आणि सार्वजनिक हितासाठी सक्रिय सहभाग घेणाऱ्या नागरिकाची भूमिका स्वीकारते. या प्रकारचे नागरिकत्व म्हणजे केवळ वैध हक्कांचा उपभोग घेणे नव्हे, तर विवेकाधिष्ठित सहभाग, नैतिक जबाबदारीची जाणीव आणि सार्वजनिक जीवनात सृजनशील भूमिका निभावणे होय. या संकल्पनेच्या व्यापकतेचा विचार करताना 'हक्क' आणि 'कर्तव्य' यांचा

परस्परसंबंध लक्षात घेणे अत्यावश्यक ठरते. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना मूलभूत हक्क प्रदान केले आहेत – जसे की स्वातंत्र्याचा अधिकार, समतेचा अधिकार, धर्मस्वातंत्र्य, सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार इत्यादी. परंतु या हक्कांचा उपभोग घेताना ते इतरांच्या अधिकारांना बाधा पोहोचवणार नाहीत, याची जबाबदारीदेखील नागरिकांवरच असते. म्हणूनच लोकशाही नागरिकत्व हे केवळ कायदेशीर स्थिती नसून ती एक नैतिक आणि सामाजिक जाणीव असते.

लोकशाही नागरिकत्वाचे स्वरूप बहुआयामी आहे. ते सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक घटकांशी निगडित आहे. सामाजिक स्तरावर, नागरिकाला इतर व्यक्तींच्या हक्कांचा आदर राखत सहिष्णुता, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा अंगीकार करावा लागतो. उदाहरणार्थ, जातीभेद, लिंगभेद, धार्मिक असहिष्णुता यांसारख्या विघातक प्रवृत्तींचा निषेध करणे ही केवळ वैयक्तिक भूमिका नसून ती लोकशाही नागरिकत्वाची मूलभूत अपेक्षा आहे. राजकीय स्तरावर लोकशाही नागरिक हा फक्त निवडणुकीमध्ये मत देणारा घटक नसून, तो सक्रिय मतदार, जागरूक टीकाकार, आणि सार्वजनिक नितीमत्त्वाचा संरक्षक असतो. तो शासनाच्या कारभारावर प्रश्न विचारतो, नीतिगत निर्णयांवर अभ्यासपूर्ण मत मांडतो आणि गरज भासल्यास सामाजिक चळवळीत सहभागी होतो. अशा नागरिकाची लोकशाही प्रक्रियेतील भूमिका निव्वळ प्रतिनिधी निवडण्यापुरती मर्यादित राहत नाही, तर ती लोकशाहीतील उत्तरदायी सहभागाची अभिव्यक्ती बनते. आर्थिक स्तरावर विचार केला असता, लोकशाही नागरिकत्व ही संकल्पना नागरिकांच्या आर्थिक नैतिकतेशी निगडित आहे. करभरणा, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, भ्रष्टाचाराविरोधातील भूमिका, स्थानिक उत्पादनास प्राधान्य देणे, आणि पर्यावरणस्नेही उपभोगाच्या संकल्पनांचा अंगीकार करणे या बाबी नागरिकाच्या जबाबदारीत येतात. सांस्कृतिक स्तरावर, लोकशाही नागरिकत्व म्हणजे विविधतेचा स्वीकार, सहसंवेदनशीलता आणि संवादक्षमतेचा विकास. भारतीय समाज बहुभाषिक, बहुधार्मिक आणि बहुसांस्कृतिक असल्याने, येथे सहिष्णुतेचा आणि सामंजस्याचा अंगीकार करणे हे लोकशाही टिकवण्याच्या दृष्टिकोनातून अत्यावश्यक ठरते.

लोकशाही नागरिकत्वाच्या विकासासाठी शिक्षण एक अत्यंत महत्त्वाचे माध्यम आहे. शिक्षणाच्या माध्यमातून मूल्यांची रुजवणूक, विवेकाचा विकास, प्रश्न विचारण्याची क्षमता आणि सार्वजनिक जीवनात सक्रिय सहभागाची भावना वृद्धिंगत केली जाते. आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात तर नागरिकांनी समाजमाध्यमांच्या माध्यमातून विवेकाने वागणे, फेक न्यूजपासून दूर राहणे, आणि माहितीची पडताळणी करणे ही देखील लोकशाही नागरिकत्वाची अंगभूत गरज बनली आहे. लोकशाही नागरिकत्व ही संकल्पना एक व्यापक मूल्यात्मक चौकट आहे जी प्रत्येक व्यक्तीला केवळ कायदेशीर नागरिक म्हणून नव्हे तर सामाजिकदृष्ट्या जागरूक, नैतिकदृष्ट्या जबाबदार आणि सक्रिय भागधारक बनवते. लोकशाहीच्या खऱ्या यशासाठी असे सजग, सुसंस्कृत आणि सशक्त नागरिक अत्यावश्यक असतात. म्हणूनच, लोकशाही नागरिकत्व हे शिक्षण, समाज आणि शासन या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे पोसावे अशी काळाची गरज आहे.

### १.२.२ लोकशाही नागरिकत्वाची वैशिष्ट्ये:

नागरिक हा लोकशाहीचा केंद्रबिंदू आहे. नागरिकांच्या सहभागामुळेच लोकशाही बळकट होते. त्यामुळेच लोकशाही नागरिकत्व हे केवळ कायदेशीर हक्कांची संकल्पना नसून एक सामाजिक व नैतिक जबाबदारीदेखील आहे. एका लोकशाही देशात नागरिकत्वाचे विशिष्ट वैशिष्ट्ये असतात, जी त्या समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची ठरतात.

**१. हक्क आणि जबाबदाऱ्यांचा समतोल**

लोकशाही नागरिकत्वाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नागरिकांना विविध मूलभूत हक्क मिळतात – जसे की अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मतदानाचा अधिकार, धर्मस्वातंत्र्य, शिक्षणाचा अधिकार इ. मात्र या हक्कांसोबतच जबाबदाऱ्या देखील येतात. उदाहरणार्थ, मतदान करणे ही केवळ संधी नाही, तर कर्तव्य आहे. समाजातील कायदा आणि सुव्यवस्था राखणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, इतरांच्या हक्कांचा सन्मान करणे या जबाबदाऱ्या प्रत्येक नागरिकाने पाळणे आवश्यक असते.

**२. सक्रिय सहभाग**

लोकशाहीत नागरिक निष्क्रिय असतील तर ती रुग्णावस्थेत जाते. म्हणूनच लोकशाही नागरिकत्वाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सक्रिय सहभाग. नागरिकांनी निवडणुकांमध्ये मतदान करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सहभाग घेणे, जनमत व्यक्त करणे, समाजमाध्यमांवर सजग राहणे, आंदोलने आणि जनहित याचिकांमध्ये भाग घेणे ही सक्रियतेची उदाहरणे आहेत.

**३. संविधाननिष्ठा**

लोकशाही राष्ट्रातील नागरिकांनी आपल्या संविधानाबद्दल निष्ठा बाळगणे हे अत्यंत आवश्यक आहे. संविधान हे राष्ट्राचे सर्वोच्च कायदापत्र आहे. त्यामध्ये नागरिकांचे हक्क, कर्तव्ये व शासनव्यवस्था निश्चित केलेली आहे. लोकशाही नागरिक संविधानाच्या मूल्यांप्रती निष्ठावान असतो आणि त्याचा अवमान होणार नाही याची काळजी घेतो.

**४. समता आणि सामाजिक न्यायाची जाणीव**

लोकशाही नागरिकत्वाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व नागरिकांमध्ये समतेची भावना आणि सामाजिक न्यायाची जाणीव असणे. जाती, धर्म, लिंग, भाषा यांवर आधारित भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीकडे माणूस म्हणून पाहणे, वंचित घटकांना मदत करणे, सामाजिक सुधारणांच्या प्रक्रियेत भाग घेणे, हे सर्व सामाजिक समतेचे भाग आहेत.

**५. सहिष्णुता व संवादक्षमतेचा स्वीकार**

लोकशाहीमध्ये विविधता ही नैसर्गिक आहे. यामुळे सहिष्णुता, परस्पर आदर आणि संवादक्षमता ही नागरिकत्वाची अनिवार्य वैशिष्ट्ये आहेत. वेगवेगळ्या मतांना सहन करणे, विरोधी विचारांना प्रतिष्ठा देणे, चर्चेतून निर्णय घेणे, हिंसक मार्ग टाळणे – ही लोकशाही संस्कृतीचे लक्षणे आहेत.

**६. नैतिक आणि सामाजिक जाणीव**

लोकशाही नागरिक हा केवळ कायद्याने बांधिल नाही, तर नैतिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार असतो. तो खोटा प्रचार करत नाही, अफवा पसरवत नाही, करचुकवेगिरी करत नाही, सार्वजनिक संसाधनांचा गैरवापर करत नाही. अशा वर्तनातून समाजात पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा वाढतो.

**७. शिक्षण आणि माहितीची जाण**

लोकशाही नागरिकत्वासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. नागरिकांनी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक घडामोडींबाबत माहिती ठेवणे आवश्यक आहे. सुशिक्षित व सजग नागरिकच चांगले निर्णय घेऊ शकतो. माहितीचा उपयोग करून नागरिक सरकारच्या कामकाजावर प्रश्न विचारतो, जवाबदारी मागतो आणि सशक्त नागरी समाज तयार करतो.

### ८. पर्यावरण आणि संसाधनांची जबाबदारी

लोकशाही नागरिक हे निसर्ग आणि सार्वजनिक संसाधनांचे रक्षण करणारे असतात. ते पाण्याचा अपव्यय करत नाहीत, स्वच्छता राखतात, जैवविविधतेचे संवर्धन करतात आणि भविष्यासाठी शाश्वत विकासाचा मार्ग अवलंबतात. पर्यावरणप्रेमी व जबाबदार नागरिक हे लोकशाहीच्या टिकावासाठी आवश्यक घटक आहेत.

### ९. राष्ट्रीय ऐक्य आणि विविधतेचा सन्मान

भारतासारख्या बहुभाषिक, बहुधार्मिक देशात लोकशाही टिकवण्यासाठी नागरिकांनी राष्ट्रीय एकात्मतेला प्राधान्य देणे आणि विविधतेचा आदर करणे गरजेचे आहे. प्रांतिकता, संप्रदायिकता किंवा जातीयता यांना बळी न पडता 'भारत माझा देश आहे' ही भावना बाळगणारा नागरिक खरा लोकशाही नागरिक ठरतो.

### १०. लोककल्याणवादी दृष्टिकोन

लोकशाही नागरिक हा केवळ स्वतःच्या फायद्याचा विचार करत नाही, तर समाजाच्या सर्व स्तरातील लोकांच्या कल्याणाचा विचार करणारा असतो. तो गरीब, वंचित, महिला, अपंग, वृद्ध यांच्यासाठी आवाज उठवतो. केवळ स्वतःचा हक्क नव्हे तर इतरांचा हक्कही जपण्याची तयारी ठेवतो.

लोकशाही नागरिकत्व ही संकल्पना व्यापक, सर्वसमावेशक आणि गतिशील आहे. नागरिक हा केवळ राष्ट्राचा घटक नाही, तर राष्ट्राच्या विकासाचा आधारस्तंभ आहे. जेवढा नागरिक सजग, जागरूक आणि जबाबदार असेल, तेवढी लोकशाही सक्षम होईल. म्हणूनच, लोकशाही टिकवण्यासाठी आणि वृद्धिंगत करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या हक्कांसोबतच जबाबदाऱ्या पार पाडणे अत्यावश्यक आहे. एक नागरिक म्हणून आपण स्वतःला विचारले पाहिजे – मी माझ्या हक्कांचा आणि कर्तव्यांचा योग्य वापर करतो का? मी समाजासाठी योगदान देतो का? मी संविधानाशी प्रामाणिक आहे का? अशा आत्मपरीक्षणातूनच खरी लोकशाही फुलते.

## १.२.३ लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य आणि समता यांच्या अनुषंगाने शिक्षणाचे महत्त्व:

भारतीय राज्यघटनेचा आत्मा लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांमध्ये अंतर्भूत आहे. या मूल्यांची फलश्रुती केवळ कायदेशीर चौकटीपुरती मर्यादित न राहता ती सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक व्यवहारातही प्रतिबिंबित होणे अत्यावश्यक ठरते. या मूल्यांना मूर्त स्वरूप देण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे शिक्षण. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून ते सामाजिक परिवर्तनाचे व व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी साधन आहे. विशेषतः जेव्हा आपण लोकशाही व्यवस्थेतील सजग, विवेकशील व जबाबदार नागरिक घडविण्याची अपेक्षा करतो, तेव्हा शिक्षणाची भूमिका केवळ महत्त्वाची नव्हे तर अनिवार्य ठरते.

### लोकशाही आणि शिक्षण

लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित संकल्पना नाही. ती एक जीवनपद्धती आहे जिथे सर्व नागरिकांना निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याचा समान अधिकार आहे. या प्रक्रियेत प्रभावी सहभाग घेण्यासाठी नागरिकांमध्ये विश्लेषणात्मक विचारशक्ती, राजकीय साक्षरता, विवेक आणि सामाजिक जाणीव असणे आवश्यक असते. शिक्षण हीच ती प्रक्रिया आहे जी लोकशाहीच्या या अंगांना समृद्ध करते. एक निरक्षर वा अपूर्ण शिक्षित समाज मतदानाचा अधिकार असला तरी त्याच्या परिणामांची दूरगामी जाणीव नसते. अशा परिस्थितीत लोकशाही केवळ संख्यात्मक बहुमतावर आधारित होत असून त्याचा दर्जा आणि नैतिक अधिष्ठान खालावते. शिक्षण लोकांमध्ये निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करते. ते व्यक्तीला केवळ आपल्या अधिकारांची नव्हे तर जबाबदाऱ्या आणि सामाजिक उत्तरदायित्वांचीही जाणीव करून देते.

### न्याय आणि शिक्षण

'न्याय' हा राज्यघटनेतील महत्त्वाचा मूलभूत आधार आहे. तो सामाजिक, आर्थिक व राजकीय या तिन्ही पातळ्यांवर समानतेचे व सर्वसमावेशकतेचे आश्वासन देतो. मात्र न्याय हा केवळ कायद्याच्या चौकटीतून मिळणारा नाही. तो मुळात सामाजिक भानातून उगम पावतो. अशा न्यायसंपन्न समाजाची निर्मिती शिक्षणाशिवाय अशक्य आहे. शिक्षण व्यक्तीला भेदभावाच्या विविध प्रकारांविषयी जागरूक करते – मग ते जातीवर आधारित असोत, लिंगावर आधारित असोत की आर्थिक असमानतेवर आधारित. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्ती केवळ आपल्यावरील अन्यायाची जाणीव ठेवतेच असे नाही, तर इतरांवरील अन्यायालाही संवेदनशीलपणे पाहू लागते. ही सामाजिक संवेदनशीलता म्हणजेच न्यायाच्या बीजांची पेरणी. याशिवाय, शिक्षण व्यक्तीला न्यायप्राप्तीचे वैधानिक मार्ग शिकवते. एक शिक्षित नागरिक आपल्या अधिकारांसाठी न्यायालयीन पर्यायांचा अवलंब करू शकतो, न्यायदान प्रक्रियेतील अडथळे ओळखू शकतो आणि गरज असल्यास व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करू शकतो. अशा प्रकारे शिक्षण हे केवळ न्यायाची जाणीव देणारे नव्हे, तर न्यायसिद्धीस सक्षम बनवणारे साधन ठरते.

### स्वातंत्र्य आणि शिक्षण

स्वातंत्र्य ही संकल्पना फक्त राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित नाही. ती विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, उपासना, संघटन व कृती यांच्या स्वातंत्र्याला समाविष्ट करते. ही स्वातंत्र्याची व्याप्ती केवळ कायद्याच्या अंमलबजावणीतून प्राप्त होत नाही. ती व्यक्तीच्या आंतरमनात बिंबवावी लागते – आणि हीच जबाबदारी शिक्षणाच्या माध्यमातून पार पाडता येते. शिक्षण विचारस्वातंत्र्याला खतपाणी घालते. एका खुल्या वर्गात, जिथे विविध दृष्टिकोनांना वाव असतो, तिथेच खरे स्वातंत्र्य फुलते. स्वातंत्र्याचा सार्थ उपयोग करण्यासाठी विवेक व सजगता लागते. अन्यथा ते स्वैराचारात परिवर्तित होते. शिक्षण व्यक्तीला जबाबदारीची जाणीव करून देते व तिच्या कृतींना मूल्याधिष्ठान देते. स्वातंत्र्याची खरी किंमत समजून घेण्यासाठी ऐतिहासिक व सामाजिक संदर्भांची जाणीव आवश्यक आहे. हे संदर्भ शिक्षणाच्या माध्यमातूनच मिळू शकतात. त्यामुळे शिक्षण हे स्वातंत्र्याचा बौद्धिक पाया ठरते.

### समता आणि शिक्षण

भारतीय राज्यघटना समतेचे वचन देते, परंतु प्रत्यक्षात आजही आपल्या समाजात जात, लिंग, भाषा, धर्म व आर्थिक स्थितीवर आधारित असमानता अस्तित्वात आहे. ही असमानता दूर करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम ठरते. समतावादी शिक्षण व्यवस्था सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देते. सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. आरक्षण धोरणांचा आधार शिक्षण व्यवस्थेने घेतल्याने अनेक मागासवर्गीय विद्यार्थी मुख्य सामाजिक प्रवाहाशी जोडले गेले आहेत. शिक्षण त्यांच्यासाठी आत्मभान, स्वाभिमान व सामाजिक गतिशीलतेचे साधन ठरले आहे. शिक्षण वर्गभेद व जातीभेदाच्या संकल्पना आव्हान देते. एका समान शैक्षणिक व्यासपीठावर बसलेले विविध पार्श्वभूमीतील विद्यार्थी सहअस्तित्वाचे धडे शिकतात. अशा प्रकारे शिक्षण ही समतेची प्रयोगशाळा ठरते जिथे समानतेचे मूल्य केवळ शिकवले जात नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून अनुभवले जाते.

लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य आणि समता ह्या केवळ तात्त्विक संकल्पना नाहीत, तर त्या प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी निगडित मूल्ये आहेत. या मूल्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी शिक्षणाशिवाय शक्य नाही. शिक्षण व्यक्तीला केवळ साक्षर करत नाही, तर ती विवेकशील, जागरूक, जबाबदार व संवेदनशील बनवते.

त्यामुळेच शिक्षण हे केवळ वैयक्तिक उन्नतीचे साधन नसून राष्ट्रीय मूल्यांची प्रतिष्ठा, टिकाव व विकासाचे मूळ आहे. शिक्षण या संविधानिक मूल्यांची अधिक परिपक्व रुजवणूक करते. येथे विचारप्रवृत्ती, विश्लेषण व आत्मचिंतन यांना चालना दिली जाते. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांनी मूल्याधारित, सर्वसमावेशक आणि समतेचे बाळकडू देणारी शिक्षणपद्धती स्वीकारणे काळाची गरज आहे. शिक्षण जर मूल्यनिष्ठ असेल, तरच आपण खऱ्या अर्थाने लोकशाहीवादी, न्यायनिष्ठ, स्वतंत्र आणि समतावादी राष्ट्राच्या दिशेने वाटचाल करू शकतो.

### १.२.४ नागरिकत्व शिक्षण आणि भारतीय संविधानामध्ये समाविष्ट असलेली राष्ट्रीय ध्येये:

कोणतेही राष्ट्र हे केवळ भौगोलिक सीमांमुळे, लोकसंख्येमुळे किंवा शासनामुळे अस्तित्वात येत नाही. राष्ट्र म्हणजे एक अशी संघटना, जिथे विविधतेतून एकता साधली जाते, आणि जिथे लोक एका समान राष्ट्रीय ध्येयासाठी एकत्र येतात. या दृष्टिकोनातून पाहिल्यास, 'राष्ट्रीय ध्येये' म्हणजे त्या तत्त्वांचा, मूल्यांचा व उद्दिष्टांचा समूह आहे, जो राष्ट्राच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक विकासाची दिशा ठरवतो.भारतासारख्या लोकशाही, विविधतेने नटलेल्या देशात राष्ट्र बांधणी (Nation-Building) आणि राष्ट्र उभारणी (Nation-Development) हे कार्य राष्ट्रीय ध्येयांच्या आधारावर घडते.  राष्ट्रीय ध्येये म्हणजे राष्ट्राने स्वतःसमोर ठेवलेली अशी मूल्याधारित उद्दिष्टे, जी संपूर्ण देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक असतात. ही ध्येये संविधान, शैक्षणिक धोरणे, शासनाच्या योजनांमध्ये, आणि सर्वसामान्य नागरिकांच्या स्वप्नांमध्ये प्रतिबिंबित होतात. नागरिकत्व शिक्षण हे राष्ट्रीय ध्येयांची रुजवणूक भावी नागरिकांमध्ये करते. नागरिकत्व शिक्षण म्हणजे एखाद्या व्यक्तीला जबाबदार, सजग व सक्रिय नागरिक बनवण्याची प्रक्रिया. यात लोकशाही मूल्ये, मूलभूत अधिकार व कर्तव्ये, सामाजिक उत्तरदायित्व, सहिष्णुता, सहकार्य, कायद्याचे पालन, आणि राष्ट्रप्रेम या बाबींचा समावेश होतो.

**भारतीय संविधानातील राष्ट्रीय ध्येये**

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेमध्ये (Preamble) खालील चार मुख्य ध्येये नमूद केली आहेत:

**१. न्याय** (Justice)

सामाजिक न्याय: जाती, धर्म, लिंग, भाषा यावर आधारित विषमता दूर करणे.

आर्थिक न्याय: गरिबी, बेरोजगारी कमी करून समान आर्थिक संधी उपलब्ध करून देणे.

राजकीय न्याय: सर्व नागरिकांना मतदान व प्रतिनिधित्वाचा समान अधिकार.

**२. स्वातंत्र्य** (Liberty)

विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, उपासना आणि आचारधर्म यांचे स्वातंत्र्य.

व्यक्तिमत्त्वाचा विकास स्वतंत्र वातावरणात होणे.

**३. समता** (Equality)

कायद्यापुढे सर्व समान.

संधींची समानता: शिक्षण, रोजगार, न्यायप्रक्रिया आदींमध्ये भेदभाव न करणे.

**४. बंधुता** (Fraternity)

सर्व भारतीयांमध्ये बंधुभाव वाढवणे.

राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक सलोखा टिकवून ठेवणे.

**राष्ट्र बांधणीमध्ये राष्ट्रीय ध्येयांचे महत्त्व**

**१. एकात्मतेचा पाया**

राष्ट्रीय ध्येये हे विविध राज्ये, जाती, भाषा व धर्मामधील समन्वय साधण्यास मदत करतात. ही ध्येये एक सार्वत्रिक मूल्यव्यवस्था निर्माण करतात जी सर्व नागरिकांना जोडून ठेवते.

**२. शासनाचे मार्गदर्शन**

राष्ट्रीय ध्येये हे धोरण निर्मितीचे मूलभूत निकष ठरतात. योजना आयोग, नीत आयोग, शिक्षण, आरोग्य, रोजगार, कृषी, इ. क्षेत्रांतील धोरणे याच ध्येयांवर आधारित असतात.

**३. सामाजिक परिवर्तन**

न्याय, समता आणि स्वातंत्र्य या मूल्यांमुळे जातीभेद, लिंगभेद, आर्थिक विषमता यावर मात करणे शक्य होते.

**४. शिक्षणात मूल्यसंवर्धन**

शालेय आणि उच्च शिक्षण संस्थांमधून राष्ट्रीय ध्येये समजावून सांगितल्यास विद्यार्थ्यांमध्ये नागरिकत्त्वाचे भान निर्माण होते.

**राष्ट्र उभारणीसाठी आवश्यक असलेली कार्यवाही**

**१. न्यायव्यवस्थेचा सुदृढपणा**

गरीब, दुर्बल घटकांसाठी मोफत व जलद न्याय.

लोकन्यायालये, ग्राम न्यायालयांची स्थापना.

**२. समतोल आर्थिक विकास**

गरिबांसाठी स्वयंरोजगार योजना.

शेती, उद्योग, सेवा क्षेत्राचा समांतर विकास.

**३. शिक्षण व आरोग्य**

सर्वासाठी मोफत आणि सकस शिक्षण.

ग्रामीण आरोग्य सेवा मजबूत करणे.

**४. सामाजिक समावेश**

अनुसूचित जाती-जमाती, महिला, दिव्यांग यांच्यासाठी विशेष धोरणे.

समान प्रतिनिधित्व व सहभागाची हमी.

**५. बंधुभावासाठी सांस्कृतिक स्नेह**

आंतर-राज्य स्नेहसंबंध वाढविणे.

विविध सण, उत्सवांमध्ये सहभाग.

**शाश्वत विकास आणि राष्ट्रीय ध्येये**

**आधुनिक काळात राष्ट्रीय ध्येयांमध्ये शाश्वत विकासाचे मूल्यही समाविष्ट होत आहे:**

पर्यावरणाचे संवर्धन

जलवायु बदलांविरोधात उपाययोजना

नैसर्गिक साधनसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन

भविष्यातील पिढ्यांच्या गरजांची पूर्तता

**राष्ट्रीय ध्येये आणि युवकांचे योगदान**

युवक ही राष्ट्रनिर्मितीतील महत्त्वाची शक्ती आहे.

जर त्यांना न्याय, समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचे भान दिले गेले, तर ते सामाजिक परिवर्तनाचे वाहक ठरतात.

युवा आंदोलन, स्टार्टअप्स, सेवा क्षेत्र, विज्ञान-तंत्रज्ञानात युवा योगदान दिसते.

धोरणनिर्मितीत राष्ट्रीय ध्येयांचा प्रभाव

पंचवार्षिक योजना, सर्व शिक्षा अभियान, मेक इन इंडिया, स्वच्छ भारत मिशन, डिजिटल इंडिया - या सर्व योजनांमध्ये राष्ट्रीय ध्येयांची छाया आहे.

विविध योजना समतेचे, स्वावलंबनाचे, सहभागाचे मूल्य रुजवतात.

**भविष्यातील आव्हाने आणि संधी**

**आव्हाने:**

सामाजिक आणि आर्थिक विषमता

राजकीय अस्थैर्य आणि भ्रष्टाचार

धार्मिक-जातीय तणाव

पर्यावरणाचा ऱ्हास

**संधी:**

लोकसंख्येचा युवा घटक

डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर

जागतिक व्यासपीठावर भारताची प्रतिमा

सहकार्यात्मक संघराज्य व्यवस्थेचा वापर

**नागरिकत्व शिक्षण आणि राष्ट्रीय ध्येये यातील संबंध**

**१. मूल्याधारित शिक्षण:**

नागरिकत्व शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये संविधानातील मूल्यांप्रती आदर निर्माण होतो. न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये त्यांच्या वर्तनात उतरवण्याचा प्रयत्न होतो.

**२. सक्रिय नागरिकत्व:**

शिक्षणाद्वारे व्यक्ती आपल्या अधिकारांची आणि कर्तव्यांची जाणीव ठेवते. ती मतदान करते, सामाजिक चळवळींमध्ये सहभागी होते, भ्रष्टाचारविरोधी भूमिका घेते.

**३. राष्ट्रनिर्मिती:**

नागरिकत्व शिक्षणामुळे नागरिक राष्ट्रहिताचा विचार करतात. ते कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर जबाबदारी स्वीकारतात.

**४. लोकशाहीची मजबुती:**

नागरिक शिक्षित असतील, तर ते लोकशाही प्रक्रियेमध्ये सक्रिय राहतात. त्यांनी योग्य नेत्यांची निवड केली, तर शासन लोकहितासाठी काम करेल.

राष्ट्रीय ध्येये ही राष्ट्र बांधणी आणि राष्ट्र उभारणीची मूलभूत दिशा आहेत. संविधानातील न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये केवळ ग्रंथांत राहता कामा नये, ती व्यवहारात उतरली पाहिजेत. शासन, संस्था, समाज आणि नागरिक या सर्वांनी या ध्येयांची अमलबजावणी केली, तरच आपले राष्ट्र अधिक सशक्त, विकसित आणि सुसंस्कृत बनू शकते. राष्ट्रीय ध्येये ही केवळ तत्त्वच नाहीत, तर ती राष्ट्राच्या आत्म्याची ओळख आहेत.

## १.३ पारिभाषिक संकल्पना, शब्द, शब्दार्थ

**लोकशाही** (Democracy)

| संकल्पना / शब्द | अर्थ / स्पष्टीकरण |
|---|---|
| लोकशाही | लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींमार्फत चालणारी शासनव्यवस्था |
| प्रतिनिधित्व | लोकांनी निवडून दिलेले नेते त्यांच्या वतीने निर्णय घेतात |
| बहुसंख्याक तत्त्व | बहुमताचा निर्णय स्वीकारणे |
| मतदानाचा हक्क | शासन निवडण्यासाठी नागरिकांना मिळालेला अधिकार |
| नागरिक अधिकार | संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार (उदा. भाषण स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य) |
| विधानसभा / संसद | लोकप्रतिनिधींच्या सभा ज्या कायदे करतात |
| विरोधी पक्ष | सत्तेत नसलेला पण जनतेचा प्रतिनिधी असलेला राजकीय पक्ष |
| निवडणूक आयोग | भारतातील स्वच्छ निवडणुका आयोजित करणारी संस्था |

**मूल्ये** (Values)

| संकल्पना / शब्द | अर्थ / स्पष्टीकरण |
|---|---|
| नैतिक मूल्य | योग्य-अयोग्य यामधील फरक दर्शवणारी जीवनमूल्ये |
| मानवी हक्क | प्रत्येक व्यक्तीला जन्मतः प्राप्त असलेले नैसर्गिक अधिकार |
| सहिष्णुता | इतरांच्या मतांचा व विचारांचा आदर करणे |
| सामाजिक न्याय | सर्व घटकांना समाजात समान अधिकार मिळणे |
| समानता | प्रत्येक व्यक्तीला संधी, वागणूक व अधिकारांमध्ये समता असणे |

| | |
|---|---|
| बंधुत्व | समाजातील व्यक्तींमध्ये बंधुभाव व एकात्मतेची भावना |
| कर्तव्यतत्परता | जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे काम करणे |

**लोकशाही नागरिकत्व** (Democratic Citizenship)

| संकल्पना / शब्द अर्थ / स्पष्टीकरण | |
|---|---|
| नागरिकत्व | एखाद्या देशाशी असलेले अधिकृत, कायदेशीर नाते |
| जबाबदार नागरिक | देशाच्या कायद्यांचे पालन करणारा, हक्क आणि कर्तव्यांबाबत सजग असलेला नागरिक |
| सक्रिय सहभाग | सामाजिक, राजकीय आणि शासकीय प्रक्रियांमध्ये नागरिकांचा सहभाग |
| संविधान निष्ठा | भारतीय संविधानाचे पालन करणे आणि त्यावरील निष्ठा ठेवणे |
| स्वयंसेवा / समाजसेवा | समाजासाठी स्वेच्छेने सेवा देणे |
| सामाजिक भान | इतर घटकांच्या अडचणी समजून घेण्याची आणि मदतीची भावना |

**राष्ट्रीय ध्येये** (National Goals/Objectives)

| संकल्पना / शब्द अर्थ / स्पष्टीकरण | |
|---|---|
| **न्याय** (Justice) | प्रत्येक नागरिकाला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळवून देणे |
| **स्वातंत्र्य** (Liberty) | विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, आचार व उपासना स्वातंत्र्य |
| **समता** (Equality) | कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान वागणूक |
| **बंधुता** (Fraternity) | सर्व नागरिकांमध्ये ऐक्य आणि एकात्मतेची भावना |
| **उद्देशिका** (Preamble) | संविधानाची प्रस्तावना, जी भारताच्या मूलभूत ध्येयांची माहिती देते |
| **धर्मनिरपेक्षता** | राज्य सर्व धर्मांपासून अलिप्त राहून सर्व धर्मांना समान मान देते |
| **लोकशाही गणराज्य** | लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून चालणारे राज्य, जिथे राष्ट्राध्यक्षही निवडून दिला जातो |
| **समाजवाद** | संपत्तीचे न्याय्य वितरण, संसाधनांवर सर्वांचा समान अधिकार |

**अतिरिक्त संबंधित संकल्पना**

| संकल्पना / शब्द अर्थ / स्पष्टीकरण | |
|---|---|
| **मूलभूत अधिकार** | संविधानाने नागरिकांना दिलेले मूलभूत हक्क |
| **मूलभूत कर्तव्ये** | नागरिकांनी पालन कराव्यात अशी नैतिक आणि राष्ट्रीय जबाबदाऱ्या |
| **सामाजिक सलोखा** | विविध जाती, धर्म, भाषा यांच्यात शांतता आणि सहकार्य |
| **एकात्मता** | देशाच्या अखंडतेची आणि ऐक्याची भावना |
| **लोकशाही मूल्ये** | पारदर्शकता, उत्तरदायित्व, सहभाग, कायद्याचे शासन, मानवी हक्क यांसारखी तत्त्वे |

## १.४ सारांश:

समकालीन भारतातील सामाजिक, शैक्षणिक व राजकीय घडामोडींच्या संदर्भात लोकशाही, मूल्ये, नागरिकत्व, राष्ट्रीय ध्येये व युवकांचे योगदान यांचे बहुपर्यायी परस्परसंबंध समजून घेणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेमध्ये अधोरेखित न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये केवळ तात्त्विक संकल्पना नसून ती राष्ट्राच्या उभारणीत मूलगामी भूमिका बजावणारी बौद्धिक व सामाजिक दिशा आहेत. लोकशाही मूल्यांची आणि ध्येयांची शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रनिर्मितीतील उपयुक्तता अनन्यसाधारण महत्त्वाची आहे. लोकशाही म्हणजे केवळ शासनव्यवस्था नव्हे, तर ती एक मूल्याधिष्ठित जीवनपद्धती आहे. 'जनतेकडून, जनतेसाठी, जनतेद्वारे चालणारे सरकार' ही अब्राहम लिंकनची व्याख्या लोकशाहीच्या आत्म्याचे यथार्थ दर्शन घडवते. भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य म्हणजे तिचा समावेशी, बहुलतावादी व धर्मनिरपेक्ष स्वभाव. लोकशाही म्हणजे संवाद, वाद, सहमती व सर्जनशील विरोध यांचा संगम. भारतातील लोकशाही प्रणाली ही सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष व गणराज्यात्मक तत्त्वांवर आधारित असून ती प्रत्येक नागरिकाला सहभागाचा अधिकार प्रदान करते. मात्र, लोकशाही ही तशीच प्रभावी ठरते जेव्हा ती मूल्याधारित व जबाबदार नागरिकत्वाने पूरक ठरते.

राष्ट्राच्या सांस्कृतिक अधिष्ठानाची मूल्यव्यवस्था जाणणारा नागरिक घडविणे हे शिक्षण प्रक्रियेचे मुख्य उद्दिष्ट असते. मूल्ये ही कोणत्याही राष्ट्राच्या सामाजिक जीवनाचे अधिष्ठान असतात. मानवतावाद, सहिष्णुता, अहिंसा, समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता इत्यादी मूल्ये व्यक्ती व समाजाच्या परस्परसंबंधांमध्ये नैतिक संतुलन साधतात. भारतीय परंपरेतील 'सर्वे भवंतु सुखिनः', 'वसुधैव कुटुंबकम' या तत्त्वांनी मूल्याधिष्ठित सामाजिक सौहार्दाचे संकेत दिले आहेत. शैक्षणिक प्रक्रियेमध्ये या मूल्यांचे प्रत्यारोपण ही केवळ अध्यापनाची जबाबदारी नसून ती व्यक्तिमत्त्व विकासाच्या व्यापक उद्दिष्टांचा एक भाग आहे. मूल्यशिक्षणाविना शिक्षण हे केवळ माहितीपुरते मर्यादित राहते; त्यामुळे समाजमनात सृजनशील, समतामूल्यवादी व सहिष्णु नागरिक घडवणे अशक्य ठरते.

लोकशाही नागरिकत्व हे अधिकार आणि कर्तव्यांचा समतोल साधते. लोकशाही नागरिकत्व ही संकल्पना केवळ मतदान करण्यापुरती मर्यादित नसून ती समाजातील सक्रिय, जबाबदार आणि सुसंवेदनशील सहभागाच्या भूमिकेशी निगडीत आहे. लोकशाही नागरिकत्वामध्ये व्यक्ती केवळ हक्कांचा उपभोग करणारी घटक नसते, तर ती एक विधायक व कृतीशील घटक म्हणून कार्य करते. लोकशाही नागरिकत्वात काही मूलभूत गुण अपेक्षित असतात. उदाहरणार्थ, संविधाननिष्ठा व कायद्याचे पालन, इतरांच्या हक्कांचा आदर, सार्वजनिक जीवनात सहभाग-जसे की स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवा पर्यावरण, सार्वजनिक मालमत्ता याबाबत जाणीवपूर्वक वर्तन, राष्ट्रहितासाठी जबाबदार निर्णयक्षमता, इत्यादी. या प्रकारचे नागरिकत्व केवळ शैक्षणिक अभ्यासक्रमातून घडवले जात नाही, तर अनुभवात्मक शिक्षण, सामाजिक सहभाग व प्रात्यक्षिकांनी विकसित होते.

राष्ट्र उभारणीसाठीची मूल्यदिशा राष्ट्रीय ध्येये निश्चित करतात. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेमध्ये वर्णिलेली राष्ट्रीय ध्येये म्हणजे न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता - ही केवळ राज्यव्यवस्थेची तत्वे नसून ती राष्ट्राच्या विकासाची मूल्यपर अधिष्ठाने आहेत. या मूल्यांचे अनुसरण करूनच आर्थिक विषमता दूर केली जाऊ शकते, सामाजिक समावेशकता साधता येते, सांस्कृतिक ऐक्य टिकवून ठेवता येते आणि विविध घटकांचा समतोल विकास साधता येतो. ही ध्येये शिक्षण, शासन, समाजसेवा आणि नागरी सहभाग यांच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरवली जातात.

शिक्षणप्रक्रिया ही लोकशाही मूल्यांची रुजवणूक करणारे माध्यम आहे. शिक्षण हा लोकशाही टिकवण्यासाठी व बळकट करण्यासाठी आवश्यक घटक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, शिका, संघटित व्हा, संघर्ष करा – ही शिक्षणप्रक्रियेची दिशादर्शक तत्त्वे आहेत. शिक्षणामार्फत व्यक्तीमध्ये विवेक, सामाजिक भान, आकलनशक्ती, आणि नैतिक जबाबदारीची भावना विकसित होते. लोकशाही मूल्यांच्या संवर्धनासाठी शिक्षणप्रक्रियेमध्ये काही बाबींचा समावेश आवश्यक आहे. उदाहरणार्थ, सक्रिय सहभागात्मक अध्यापन पद्धती, मूल्यशिक्षण व नैतिक निर्णय क्षमतेचा विकास, सामाजिक सेवा व प्रकल्पाधारित शिक्षण, घटक राज्यशास्त्र, संविधान व मानवाधिकार यांचे शिक्षण.

समाज आणि विशेषतः युवाशक्ती परिवर्तनाचे वाहक आहेत. समाज ही मूल्यांची कार्यशाळा आहे, जिथे लोकशाही मूल्यांचा अनुभव घेतला जातो. समाजातील संस्था – कुटुंब, शाळा, माध्यमे, स्वयंसेवी संस्था – या सर्व संस्था व्यक्तिमत्त्व व मूल्यसंस्कार घडवण्यात सहकार्य करतात. विशेषतः युवक समाजपरिवर्तनाचे वाहक ठरू शकतात. युवाशक्ती ही राष्ट्रनिर्मितीतील सर्वात मोठी शक्ती आहे. जर युवकांमध्ये सक्रिय नागरिकत्त्व, सामाजिक जाणीव, संवैधानिक निष्ठा व मूल्यांप्रती बांधिलकी असेल, तर देशाच्या आर्थिक, वैज्ञानिक, सामाजिक क्षेत्रात व्यापक प्रगती शक्य आहे. युवकांची क्षमता विधायक दिशेने वळवण्यासाठी आवश्यक आहे. युवा परिषद, मतदार जागरूकता मोहीम, एन.एस.एस./एन.सी.सी. सारख्या उपक्रमांमध्ये युवकांचा सहभाग असला पाहिजे. सार्वजनिक चर्चासत्रे, वादविवाद, उपक्रमशील शिक्षण यांचे आयोजन आणि नियोजन योग्य रित्या व्हायला पाहिजे. डिजिटल माध्यमातून सामाजिक चळवळींचा प्रसार अपेक्षित आहे.

विधायक व कृतीशील नागरिकत्व हेच भविष्यातील लोकशाहीचे आशास्थान आहे. विधायक नागरिकत्व म्हणजे आपल्या कृतीद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवण्याची प्रक्रिया. हे नागरिक स्वतःच नकारात्मकतेचा प्रतिकार करतात आणि सर्जनशील, लोकहितकारी विचारांना प्रोत्साहन देतात. कृतीशील नागरिकत्त्वामध्ये: लोकशाही प्रक्रियांमध्ये नियमित सहभाग, समाजातील समस्यांवर उपाययोजना, पर्यावरण संवर्धन, स्त्री–सक्षमीकरण, सार्वजनिक आरोग्य यांसारख्या क्षेत्रांमध्ये प्रत्यक्ष सहभाग अपेक्षित आहे. हे नागरिक स्वतःला केवळ समाजाचे निरीक्षक मानत नाहीत, तर सक्रिय शिल्पकार समजतात. लोकशाही, मूल्ये, राष्ट्रीय ध्येये, नागरिकत्व आणि शिक्षण यांचा संबंध केवळ सैद्धांतिक स्तरावर नाही, तर ते राष्ट्रनिर्मितीच्या प्रत्यक्ष प्रक्रियेशी संबंधित आहेत. शिक्षण ही त्या मूल्यांची वाहक भूमिका पार पाडते, समाज ही त्यांची कार्यशाळा ठरते, आणि युवक ही त्यांची ऊर्जा असते. विधायक व कृतीशील नागरिक हीच लोकशाहीची खरी संपत्ती असून तीच राष्ट्राच्या उज्वल भवितव्यासाठी आधारस्तंभ आहे. अशा नागरिकांचे घडवणारे शिक्षण आणि मूल्यांशी सुसंगत सामाजिक प्रक्रिया हीच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा आत्मा आहे.

**१.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न:**

**अ) रिकाम्या जागा भरा** – Fill in the blanks.

**१. संविधानाच्या प्रस्तावनेत..........................या शब्दाने भारताचे वर्णन केले आहे.**

अ) धर्मनिरपेक्ष

ब) राजतंत्र

क) अधिनायक

ड) हुकूमशाही

**२. नागरिकत्व शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट...........................नागरिक घडवणे हे आहे.**

अ) सुशिक्षित

ब) सुजाण

क) श्रीमंत

ड) लोकप्रिय

**३. ...........................हे भारतीय संविधानातील एक मूलभूत मूल्य आहे.**

अ) समानता

ब) भेदभाव

क) दहशतवाद

ड) विषमता

**४. राष्ट्रीय ध्येयांमध्ये...........................हे एक सामाजिक ध्येय आहे.**

अ) समता

ब) सत्ता

क) संपत्ती

ड) संघर्ष

**५. सुजाण नागरिकांनी कायद्याचे...........................पाळले पाहिजे.**

अ) उल्लंघन

ब) नियम

क) पालन

ड) विरोध

**६. संविधान दिवस...........................रोजी साजरा केला जातो.**

अ) २६ नोव्हेंबर

ब) १५ ऑगस्ट

क) २६ जानेवारी

ड) १ मे

**७. ...........................ही सुजाण नागरिकाची ओळख आहे.**

अ) जबाबदारी

ब) हिंसा

क) स्वार्थ

ड) अपमान

**८. राष्ट्रीय एकात्मता टिकवण्यासाठी...........................आवश्यक आहे.**

अ) सहकार्य

ब) द्वेष

क) मतभेद

ड) संघर्ष

**९. संविधानाचे मुख्य लेखक...........................होते.**

अ) डॉ. आंबेडकर

ब) महात्मा गांधी

क) जवाहरलाल नेहरू

ड) राजेंद्र प्रसाद

**१०. नागरिकत्व शिक्षणामुळे मुलांमध्ये...........................निर्माण होते.**

अ) देशभक्ती

ब) असहिष्णुता

क) निष्काळजीपणा

ड) द्वेष

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. नागरिकत्व शिक्षण म्हणजे काय? त्याचे उद्दिष्ट काय असते?

२. भारतीय संविधानातील मुख्य संविधानिक मूल्ये कोणती आहेत?

३. राष्ट्रीय ध्येये कोणती आहेत? त्यांचा नागरिकांच्या जीवनाशी काय संबंध आहे?

४. सुजाण नागरिक कोणाला म्हणतात? त्याचे प्रमुख गुणधर्म कोणते?

५. नागरिकत्व शिक्षण आणि संविधानिक मूल्ये एकत्रितपणे सुजाण नागरिक घडवण्यासाठी कशी मदत करतात?

**१.६ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे:**

**अ) रिकाम्या जागा भरा –** Fill in the blanks:

१. संविधानाच्या प्रस्तावनेत धर्मनिरपेक्ष या शब्दाने भारताचे वर्णन केले आहे.

**उत्तर: अ) धर्मनिरपेक्ष**

२. नागरिकत्व शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट सुजाण नागरिक घडवणे हे आहे.

**उत्तर: ब) सुजाण**

३. समानता हे भारतीय संविधानातील एक मूलभूत मूल्य आहे.

**उत्तर: अ) समानता**

४. राष्ट्रीय ध्येयांमध्ये समता ही एक सामाजिक ध्येय आहे.

**उत्तर: अ) समता**

५. सुजाण नागरिकांनी कायद्याचे पालन पाळले पाहिजे.

**उत्तर: क) पालन**

६. संविधान दिवस २६ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो.

**उत्तर: अ) २६ नोव्हेंबर**

७. जबाबदारी ही सुजाण नागरिकाची ओळख आहे.

**उत्तर: अ) जबाबदारी**

८. राष्ट्रीय एकात्मता टिकवण्यासाठी सहकार्य आवश्यक आहे.

**उत्तर: अ) सहकार्य**

९. संविधानाचे मुख्य लेखक डॉ. आंबेडकर होते.

**उत्तर: अ) डॉ. आंबेडकर**

१०. नागरिकत्व शिक्षणामुळे मुलांमध्ये देशभक्ती निर्माण होते.

**उत्तर: अ) देशभक्ती**

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१. नागरिकत्व शिक्षण म्हणजे काय? त्याचे उद्दिष्ट काय असते?**

नागरिकत्व शिक्षण म्हणजे व्यक्तीला तिच्या राष्ट्राशी संबंधित असलेल्या हक्क, कर्तव्ये, जबाबदाऱ्या, संविधानिक मूल्ये, राष्ट्रीय ध्येये आणि समाजातील भूमिका यांविषयी जागरूक करण्याचे शिक्षण होय. हे शिक्षण शालेय आणि सामाजिक स्तरावर दिले जाते. यामध्ये व्यक्तीचे राष्ट्रप्रेम, सामाजिक एकात्मता, लोकशाही मूल्यांवरील विश्वास, सामाजिक जबाबदारी यांचे संवर्धन होते. नागरिकत्व शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सुजाण, जबाबदार आणि सक्रिय नागरिक घडवणे होय. अशा नागरिकांना त्यांच्या मूलभूत हक्कांची आणि कर्तव्यांची जाणीव असते. ते समाजात समता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांचा प्रसार करतात. त्यांना संविधानाचे महत्त्व समजते आणि ते राष्ट्रहितासाठी कार्यरत राहतात.

या शिक्षणाद्वारे व्यक्तीमध्ये सहिष्णुता, विविधतेतील एकता, पर्यावरण संरक्षण, मतदानाचा हक्क, कायद्याचे पालन, सामाजिक समरसता आणि शांतता यासारख्या मूल्यांची रुजवणूक होते. त्यामुळे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टीने देश मजबूत होतो. नागरिकत्व शिक्षणाचा उद्देश केवळ माहिती देणे नसून सामाजिक भान, नैतिक मूल्ये, संवेदनशीलता आणि जबाबदारी यांचे प्रशिक्षण देणे देखील आहे. त्यामुळे शिक्षणपद्धतीतून केवळ विद्या न मिळता एक चांगला नागरिक घडतो.

**२. भारतीय संविधानातील मुख्य संविधानिक मूल्ये कोणती आहेत?**

भारतीय संविधानात अनेक मूलभूत मूल्ये समाविष्ट आहेत, जी भारतीय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक मानली जातात. या मूल्यांचे उद्दिष्ट म्हणजे एक समतावादी, न्यायप्रिय, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही समाज निर्माण करणे.

**मुख्य संविधानिक मूल्ये पुढीलप्रमाणे आहेत:**

| | |
|---|---|
| १. **न्याय** (Justice): | सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय हे संविधानाचे मूलतत्त्व आहे. प्रत्येक व्यक्तीस न्याय मिळावा यासाठी कायदे तयार केले गेले आहेत. |
| २. **स्वातंत्र्य** (Liberty): | विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म व उपासना यांचे स्वातंत्र्य सर्व नागरिकांना दिले आहे. |
| ३. **समता** (Equality): | कायद्यापुढे सर्व नागरिक समान आहेत. जाती, धर्म, लिंग, भाषा यावर आधारित भेदभाव निषिद्ध आहे. |
| ४. **बंधुता** (Fraternity): | सर्व नागरिकांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करून राष्ट्रीय एकात्मता वाढवणे हे उद्दिष्ट आहे. |
| ५. **धर्मनिरपेक्षता** (Secularism): | भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. कोणत्याही धर्माचा अवलंब किंवा विरोध करण्याचा अधिकार राज्याला नाही. |
| ६. **लोकशाही** (Democracy): | लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधीद्वारे शासन चालवले जाते. |
| ७. **सार्वभौमत्व** (Sovereignty): | भारत स्वतंत्र राष्ट्र आहे. त्याच्या अंतर्गत आणि बाह्य निर्णयांवर कुणीही हस्तक्षेप करू शकत नाही. |

ही मूल्ये समाजातील समतेचा पाया रचतात. ही मूल्ये प्रत्येक भारतीय नागरिकाच्या जीवनाचा भाग बनली पाहिजेत.

**३. राष्ट्रीय ध्येये कोणती आहेत? त्यांचा नागरिकांच्या जीवनाशी काय संबंध आहे?**

भारताच्या संविधानात सामाजिक, आर्थिक व राजकीय संदर्भात काही राष्ट्रीय ध्येये निर्धारित केली गेली आहेत. ही ध्येये केवळ शासनाच्या कामकाजासाठी नसून प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी निगडीत आहेत.

राष्ट्रीय ध्येये:

| | |
|---|---|
| १. **समता:** | सर्व नागरिकांना समान संधी देणे आणि भेदभाव दूर करणे हे महत्त्वाचे ध्येय आहे. |
| २. **बंधुता:** | विविधतेत एकता राखण्यासाठी बंधुता आवश्यक आहे. जात, धर्म, भाषा यामधील तफावत विसरून सर्वांनी एकत्र राहणे हे अपेक्षित आहे. |
| ३. **न्याय:** | सामाजिक व आर्थिक विषमता कमी करून सर्वांना न्याय मिळावा हे राष्ट्रीय ध्येय आहे. |
| ४. **स्वातंत्र्य:** | प्रत्येक व्यक्तीला तिचे विचार, श्रद्धा, अभिव्यक्ती यांचे स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. |
| ५. **राष्ट्रीय एकात्मता:** | देशाची अखंडता, सार्वभौमत्व व एकता टिकवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. |

**नागरिकांच्या जीवनाशी संबंध:**

या ध्येयांचा संबंध नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी आहे. उदाहरणार्थ, समतेमुळे प्रत्येक व्यक्तीस शिक्षण, नोकरी, निवडणूक यामध्ये समान हक्क मिळतात. बंधुतेमुळे समाजात सौहार्द निर्माण होते. न्यायामुळे गरीब व दुर्बल व्यक्तींनाही संरक्षण मिळते. या ध्येयांमुळे नागरिक स्वतंत्र, सुरक्षित आणि सन्मानाने जगू शकतात.

**४. सुजाण नागरिक कोणाला म्हणतात? त्याचे प्रमुख गुणधर्म कोणते?**

सुजाण नागरिक म्हणजे असा व्यक्ती जो आपल्या राष्ट्राच्या हितासाठी जबाबदारीने व प्रामाणिकपणे वागतो. तो केवळ आपल्या हक्कांची जाणीव ठेवत नाही, तर कर्तव्यांचीही जबाबदारी घेतो. अशा नागरिकाचा समाजाच्या व राष्ट्राच्या विकासात मोलाचा वाटा असतो.

**सुजाण नागरिकाचे प्रमुख गुणधर्म:**

**१. जबाबदारी:** तो आपले कर्तव्य पार पाडतो – मतदान करणे, कर भरणे, कायद्याचे पालन करणे.

**२. देशभक्ती:** राष्ट्रासाठी अभिमान व प्रेम असणे, संकटात राष्ट्रासाठी पुढे येणे.

**३. सहिष्णुता व समता:** विविध मत, भाषा, धर्म यांचा आदर करणे.

**४. सामाजिक जाण:** समाजातील प्रश्नांबद्दल जागरूक असणे आणि सहभाग घेणे.

**५. कायद्याचे पालन:** तो कोणतेही कायदे उल्लंघत नाही आणि इतरांनाही पालन करण्यास प्रेरित करतो.

**६. सक्रिय सहभाग:** स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, समाजकार्य, स्वच्छता अभियान इ. मध्ये सहभाग.

सुजाण नागरिक राष्ट्राची प्रतिष्ठा वाढवतो, एकतेस हातभार लावतो आणि संविधानिक मूल्यांचे पालन करतो.

**५. नागरिकत्व शिक्षण आणि संविधानिक मूल्ये एकत्रितपणे सुजाण नागरिक घडवण्यासाठी कशी मदत करतात?**

नागरिकत्व शिक्षण आणि संविधानिक मूल्ये ही एकमेकांशी निगडीत असून एकत्रितपणे व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधतात. या दोन्ही घटकांचा उद्देश सुजाण नागरिक घडवणे आहे. नागरिकत्व शिक्षण व्यक्तीला तिचे हक्क, कर्तव्ये, अधिकार यांची माहिती देते. ती व्यक्ती समाजात आपली भूमिका काय आहे हे समजून घेते. दुसरीकडे, संविधानिक मूल्ये म्हणजे समाजाच्या आराखड्यातील नैतिक मार्गदर्शक तत्त्वे. या मूल्यांमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता यांचा समावेश आहे. जेव्हा नागरिकत्व शिक्षणाद्वारे व्यक्तीला ही मूल्ये शिकवली जातात, तेव्हा त्या व्यक्तीत लोकशाही प्रक्रियेबद्दल आदर, सहिष्णुता, सामाजिक समरसता आणि सार्वजनिक जीवनात भाग घेण्याची इच्छाशक्ती निर्माण होते. उदाहरणार्थ, मतदान करणे हे हक्क असूनही अनेक नागरिक त्यात भाग घेत नाहीत. पण नागरिकत्व शिक्षणाद्वारे त्यांना हे समजते की त्यांच्या सहभागामुळेच लोकशाही मजबूत होते. संविधानिक मूल्यांमुळे हा सहभाग सजग, नैतिक आणि जबाबदारीने केला जातो. त्यामुळे दोन्ही घटक एकत्र येऊन अशा नागरिकांचा समूह निर्माण करतात, जो राष्ट्राच्या विकासात आणि लोकशाहीच्या बळकटीकरणात सक्रिय योगदान देतो.

**१.७ सरावासाठी स्वाध्याय:**

**१. भारतीय संविधानाचे प्रमुख तत्त्व काय आहे?**

अ) हुकूमशाही

ब) लोकशाही

क) राजतंत्र

ड) एकाधिकार

**२. संविधानाच्या प्रस्तावनेत बंधुता या शब्दाचा अर्थ काय आहे?**

अ) पैसा कमवणे

ब) एकमेकांशी भांडणे

क) भावनिक एकता

ड) वेगळेपणा

**३. सुजाण नागरिक नेहमी काय करतो?**

अ) कायद्याचे उल्लंघन

ब) फक्त स्वतःचा विचार

क) जबाबदारीने वागतो

ड) इतरांवर दोष टाकतो

**४. भारतीय संविधान कोणत्या मूल्यांवर आधारित आहे?**

अ) हुकूमशाही व विषमता

ब) न्याय, समता, स्वातंत्र्य

क) अन्याय व बळजबरी

ड) संघर्ष आणि दहशत

**५. नागरिकत्व शिक्षणामुळे काय घडते?**

अ) आळस वाढतो

ब) देशद्रोह वाढतो

क) सुजाण नागरिक घडतो

ड) कायद्याचे उल्लंघन होते

**६. समता म्हणजे काय?**

अ) सर्वांना समान संधी

ब) अमीर लोकांना जास्त अधिकार

क) एका गटाला विशेष हक्क

ड) केवळ शिक्षित लोकांचे महत्त्व

**७. संविधान दिवस कोणत्या दिवशी साजरा केला जातो?**

अ) २६ जानेवारी

ब) १५ ऑगस्ट

क) २६ नोव्हेंबर

ड) १ मे

**८. धर्मनिरपेक्ष या शब्दाचा अर्थ काय?**

अ) एका धर्माचा प्रचार

ब) सर्व धर्मांचा सन्मान

क) धर्मावर बंदी

ड) फक्त आपला धर्म मानणे

**९. सुजाण नागरिक मतदानाच्या वेळेस काय करतो?**

अ) मतदान करत नाही

ब) पैसे घेऊन मतदान करतो

क) जबाबदारीने मतदान करतो

ड) इतरांना मतदान करू देत नाही

**१०. राष्ट्रीय एकात्मतेसाठी सर्वात महत्त्वाचे घटक कोणते आहेत?**

अ) द्वेष आणि मतभेद

ब) सहकार्य आणि समजूत

क) हिंसक आंदोलन

ड) परकीय हस्तक्षेप

## १.८ चिंतन व कार्य:

**चिंतन** (Reflective Thinking Activity)

विषय: सुजाण नागरिक होण्यासाठी माझी भूमिका काय असू शकते?

**चिंतन कृती:**

खालील प्रश्नांचा विचार करा आणि छोट्या परिच्छेदात उत्तर लिहा (६–७ ओळी).

प्रश्न:

१. मी समाजासाठी काय चांगले करू शकतो?

२. मी कायदाचे पालन का करायला हवे?

३. मी इतरांचा आदर कसा करतो?

४. मी कोणते संविधानिक मूल्य प्रत्यक्ष आयुष्यात अमलात आणतो?

**कार्य** (Action-Based Activity)

विषय: संविधानातील मूल्यांवर आधारित पोस्टर तयार करा

कार्य कृती:

१. 'न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता' या चार मूलभूत संविधानिक मूल्यांवर आधारित एक रंगीत पोस्टर तयार करा.

२. प्रत्येक मूल्याचा अर्थ छोट्या वाक्यात लिहा.

३. त्या मूल्याशी संबंधित एक चित्र किंवा चिन्ह (symbol) तयार करा.

४. पोस्टर तुमच्या जवळच्या महाविद्यालयात / शाळेत प्रदर्शनासाठी लावा.

**१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके:**


भोळे, भास्कर लक्ष्मणः भारताचे स्वातंत्र्य-पन्नास वर्षांचा मागोवा.

बाळ, प्रकाश व किशोर बेडकिहाळ (संपा.): भारतीय राजकीय व्यवस्था-प्रक्रिया आणि स्वरूप.

कोहली, अतुल (संपा.): दि सक्सेस ऑफ इंडियाज् डेमॉक्रसी,

फडके, य. दि.: लोकसभा निवडणुका - १९५२ ते १९९९.

बाळ, प्रकाश व किशोर बेडकिहाळ (संपा.): धर्म आणि राजकारण-विपर्यास आणि वस्तुस्थिती.

महाजन, गुरप्रीतः आयडेन्टीटीज् अँड राइटस् आस्पेक्टस् ऑफ लिबरल डेमॉक्रसी इन् इंडिया.

देसाई, ए. आर्. (संपा.): व्हायोलेशन ऑफ डेमॉक्रेटिक राइटस् ( इन् इंडिया.

बक्षी उपेंद्र व भिकू पारेख (संपा.) क्रायसिस अँड चेंज इन् कंटेम्परारी इंडिया.

चंद्र, विपनः एस्सेज् ऑन कैटेम्परारी इंडिया.

पारसनीस न.रा.,(१९८७) शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका, नूतन प्रकाशन, पुणे.

घोरपडे के.यु.(२००६) शैक्षणिक विचारवंत - भारतीय व पाश्चात्य, नागपूर: विद्या प्रकाशन

डॉ. करंदीकर सुरेश, मीना मंगरुळकर, (२००५) उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन,कोल्हापूर.

डॉ. करंदीकर सुरेश, (२००८) शिक्षण आणि भारतीय समाज, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

देशमुख एल.जी., (२००९) शिक्षणाचे तत्त्वज्ञान व समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

प्रा. धनवडे नंदकुमार, धनवडे सुरेखा, (२०११) शिक्षणशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर


❑❑❑

A

# घटक १
# शिक्षण व मानवी हक्क


१.०. उद्दिष्टे

१.१. प्रास्ताविक

१.२. विषय विवेचन

१.२.१. मानवी हक्क शिक्षणाचा अर्थ व इतिहास

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १

१.२.२. मानवी हक्क शिक्षणाची ध्येये व उद्दिष्ट्ये

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न २

१.२.३. मानवी हक्क शिक्षणाची गरज व महत्व

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ३

१.२.४. मानवी हक्क शिक्षणाची तत्वे

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ४

१.३. सारांश

१.४. महत्वाच्या संकल्पना

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.६ अधिक सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


## १.० . उद्दिष्टे

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपणास

१. मानवी हक्कांचा अर्थ सांगता येईल.

२. मानवी हक्क शिक्षणाची संकल्पना समजेल.

३. मानवी हक्क शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टे समजतील.

४. मानवी हक्क शिक्षणाची गरज व महत्व लक्षात येईल.

५. मानवी हक्क शिक्षणाची तत्वे उपयोगात आणण्यास मदत होईल.

## १.१. प्रास्ताविक

समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानव या नात्याने जन्मापासूनच स्वाभाविकपणे प्राप्त होणारे हक्क म्हणजे मानवी हक्क होय. व्यक्तीच्या व्यक्तिगत व सामाजिक विकासासाठी तिला मानवी हक्क आवश्यक असतात. मानवी हक्क व स्वातंत्र्यामुळे व्यक्ती आपला सर्वांगीण विकास करत असते. मानवी हक्क हे नैतिक, कायदेशीर, राजकीय व आर्थिक स्वरूपाचे असतात.

विसाव्या शतकापासून मानवी हक्क व त्याच्या समाजातील जनजागृतीसाठी मानवी हक्क शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला जाऊ लागला. मानवी हक्क हे मानवाच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे. मानवी हक्क नाकारण्याचा अधिकार कोणत्याही व्यक्तीला, घटकाला अथवा संघटनेला असू शकत नाही.

**हक्क म्हणजे काय ?**

१. हेरॉल्ड लास्की  हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय कि, ज्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला स्वत:ची जास्तीत जास्त प्रगती घडवून आणता येत नाही.

२. प्रा. बोझांके  आपण ज्या समाजाचे घटक असतो, त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होय.

३. टी. एच. ग्रीन  मानवाच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असलेली बाह्य परिस्थिती म्हणजे हक्क होय.

**मानवी हक्क अर्थ व व्याख्या**

१. समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानव या नात्याने स्वाभाविकपणे प्राप्त होणारे हक्क म्हणजे मानवी हक्क होय.

२. ॲड. जे. पी. एस. सिरोही  मानवी हक्क म्हणजे असे हक्क कि, जे मानवी व्यक्तीच्या जीवनाशी आणि स्वातंत्र्याशी निगडीत असून सर्व संस्थांद्वारे आणि संयुक्त राष्ट्रसंघासहित सर्व राष्ट्रांच्या कायद्यामार्फत त्यांना संरक्षण प्रदान करण्यात आले पाहिजे.

३. मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३  मानवी हक्क म्हणजे असे हक्क कि, जे मानवी जीवन, मानवी स्वातंत्र्य, मानवी समानता व मानवी प्रतिष्ठा  यांच्याशी संबंधित असतात. भारताच्या राज्यघटनेने त्यांच्या अंमलबजावणीची नुसतीच खात्री दिली नाही तर त्यांचा समावेश आंतरराष्ट्रीय करारानुसार, भारतीय राज्यघटनेत करून त्यांची अंमलबजावणी भारतीय न्यायालयाकडे सोपवली आहे.

**मानवी हक्कांचे स्वरूप व वैशिष्ट्ये**

१. समाजात निर्मिती  मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. अनेक व्यक्तींच्या एकत्रित वास्तव्यातून व्यक्तीच्या हितासाठी समाजाची निर्मिती होत असते. त्यामुळे हक्कांची निर्मिती समाजातच होते असे आपणास म्हणता येते.

२. हक्कांचे बदलते स्वरूप  कोणताही समाज हा नेहमीच परिवर्तनशील असतो. समाजातील परिस्थितीबरोबरच लोकांच्या गरजाही बदलत असतात. त्यानुसार हक्कांच्या स्वरूपातही बदल होत असतो. उदा. माहितीचा अधिकार, लोकसेवा हक्क अधिकार, शिक्षणाचा हक्क इत्यादी.

३. राज्याची मान्यता आवश्यक  मानवी हक्कांची निर्मिती जरी समाजात होत असली तरी त्यास राज्याची मान्यता मिळणे आवश्यक असते. कारण राज्याची मान्यता मिळाल्यानंतरच नागरिकांना त्यांचा लाभ घेता येतो.

४. हक्क व कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू राज्यातील सर्व नागरिकांना मानवी हक्कांचा समान लाभ होत असतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या हक्कांचा लाभ घेतांना आपल्याकडून इतरांच्या हक्कांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. याचाच अर्थ हक्काबरोबर कर्तव्य उदयास येतात. हक्क व कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

५. सर्वांगीण विकासासाठी आवश्यक मानवी हक्कांचा लाभ झाल्याशिवाय मानवाला चांगले व परिपूर्ण जीवन जगता येणे शक्य नसते. मानवी व्यक्तीमत्वाच्या विकासाबरोबरच त्याची अंगभूत गुणवत्ता, कौशल्ये, क्षमता आणि सदसदविवेकबुद्धी यांच्या विकासासाठी मानवी हक्क आवश्यक असतात.

६. वैश्विक हक्क मानवी हक्क वैश्विक स्वरूपाचे असतात. प्रत्येक व्यक्तीला ती कोणत्याही धर्म, जाती, वंश, लिंग, सामाजिक वा आर्थिक स्तरातील किंवा भाषा व प्रांतातील असली तरी तिला मानवी हक्क प्राप्त होतात. याचाच अर्थ असा कि, हे हक्क सर्वांनाच असतात. मग ती व्यक्ती कोठेही असली अगदी दुसऱ्या देशात गेली तरी त्याचे हक्क त्यांच्या सोबत राहतात.

**भारतीय संविधानातील मानवी हक्क**

भारतीय संविधान हा मानवी हक्कांचा अधिकृत दस्तऐवज आहे. भारतीय संविधान नागरिकांना मूलभूत हक्क व स्वातंत्र्याची हमी देते. संविधानातील मानवी हक्काशी संबंधित काही कलमे पुढीलप्रमाणे आहेत–

(१) कलम १४ – कायद्यासमोर समानता

(२) कलम १५ – धर्म, जात, वंश यावर आधारित भेदभावास प्रतिबंध

(३) कलम १६ सार्वजनिक सेवेत समान संधी

(४) कलम १७ अस्पृश्यतेचे निर्मूलन

(५) कलम १९ – अभिव्यक्ती स्वातंत्र्य

(६) कलम २१ – जीवन व देहिक स्वातंत्र्याचे संरक्षण

(७). कलम २१ ए – प्राथमिक शिक्षण मिळण्याचा अधिकार

(८) कलम ३० – अल्पसंख्यांकांना शिक्षणसंस्था स्थापण्याचा अधिकार

(९) कलम ३२ – घटनात्मक उपाययोजना करण्याचा अधिकार

**मानवी हक्कासंबंधी शिक्षकाची भूमिका**

(१) विद्यार्थ्याला पाठ्यघटकाचे अध्यापन करताना मानवी हक्क, मूल्ये यांच्यावर वर्गात चर्चा घडवून आणावी

(२) मानवी हक्कांवर कार्य करणाऱ्या व्यक्तींशी विद्यार्थ्यांची भेट घडवावी.

(३) मानवी हक्कांशी संबंधित चित्रपट विद्यार्थ्यांना दाखववावेत.

(४) मानवी हक्कांचे विविध दस्तऐवज शिक्षकाने स्वतः वाचून त्याची माहिती पाठ्यआशयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना द्यावी.

(५) १० डिसेंबर या मानवी हक्क दिनाच्या दिवशी पोस्टर प्रदर्शन आयोजित करावे.

अशा रीतीने शिक्षणातून मानवी हक्क व स्वातंत्र्याचे संवर्धन झाल्यास लोकशाही समाज निर्मित होण्यास खऱ्या अर्थाने हातभार लागतो.

## १.२. विषय विवेचन

### १.२.१. मानवी हक्क शिक्षणाचा अर्थ व इतिहास

मानवी हक्कांच्या परिणामकारक अंमलबजावणीच्या दृष्टीने व्यक्तीने स्वतः आणि इतरांच्या मानवी हक्कांसंबंधित शिक्षण घेणे आवश्यक आहे. शिक्षण असेल तरच हक्काच्या अंमलबजावणीसाठी आणि संरक्षणासाठी मागणी करू शकतो. यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १९८८ साली मानवी हक्कांसाठी जागतिक सार्वजनिक माहितीची मोहीम आखून त्यामध्ये प्रचार आणि प्रसार केला. या मोहिमेअंतर्गत मानवी हक्कासंबंधित ज्ञान, अध्यापन शिक्षण याबाबत कृती कार्यक्रम आणि प्रात्यक्षिक उपक्रम राबविणे व विकसित करणे हा या मोहिमेचा मुख्य हेतू आहे. भारतामध्ये मानवी हक्कांबाबत लोकांमध्ये जागृती करण्यासाठी मानवी हक्काबाबत छापील साहित्य, कार्यशाळा, चर्चासत्रे, परिषदा, शिष्यवृत्त्या प्रदान करणे, प्रसारमाध्यमांकडून जनजागृती, शालेय व उच्च शिक्षणात मानवी हक्कांचा समावेश इत्यादी ऊपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक राष्ट्राने आपल्या अभ्यासक्रमातून मानवी हक्कासंबंधी सर्वसमावेशक माहितीचा अंतर्भाव करावा. यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक, शिक्षणतज्ज्ञ यांच्यामध्ये मानवी हक्कविषयक निकोप दृष्टिकोण निर्माण होईल. यासाठी प्रत्येक व्यक्तीने शिक्षण घेणे आवश्यक आहे.

थिओडोर मेनन यांच्या मते, मानवी हक्कांचे ज्ञान व जाणीव ही युद्ध आणि शांतता या दोन्ही काळात महत्वपूर्ण ठरते. त्यामुळे मानवी हक्कांचे शिक्षण गरजेचे ठरते. पुढील व्याख्यांच्या आधारे मानवी हक्क शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करता येईल.

१. मानवी हक्क शिक्षण म्हणजे लोकांनी वैयक्तिकरित्या आणि गटांमध्ये स्वतःला मानवी हक्कांचे उल्लंघन करणाऱ्यांपासून संरक्षण मिळविण्यासाठी आणि त्यांनी केलेल्या चुका सुधारण्यासाठी ज्ञान आणि दृष्टीकोन प्राप्त करणे. सहकाऱ्यांना कशाप्रकारे वागणूक द्यावी, त्यांच्या हक्कांचे संरक्षण कसे करावे, त्यांना संपूर्ण विकासास समान संधी कशी मिळवून द्यावी या सर्व मुद्दयांचा समावेश मानवी हक्क शिक्षणात केला जातो.

२. मानवाधिकार शिक्षण म्हणजे व्यक्तींना त्यांच्या मानवाधिकार, जबाबदाऱ्या आणि हक्कांची माहिती देऊन, त्यांना अधिक जागरूक करणे. हे शिक्षण सर्वांसाठी आवश्यक आहे, कारण ते व्यक्तींना स्वतःचे हक्क ओळखण्यास, त्यांचा बचाव करण्यास आणि इतरांच्या मानवाधिकार-संरक्षणासाठी मदत करते.

३. मानवी हक्क शिक्षण म्हणजे अशा शिक्षणाची प्रक्रिया जी व्यक्तीला स्वतःच्या व इतरांच्या मानवी हक्कांची जाणीव करून देते, त्यांचा आदर करायला शिकवते आणि हक्कांचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी प्रेरित करते.

वरील व्याख्यांवरून आपणास असे म्हणता येईल कि, शांत व सुरक्षित जीवन जगण्यासाठी आणि मानवी प्रतिष्ठेप्रति आदरासाठी, संपूर्णपणे शांती, समता, न्याय, अहिंसा, सहिष्णुता सारख्या मूल्यांचा मानवी हक्क शिक्षणात समावेश करायला हवा. ही उद्दिष्टे केवळ मानव अधिकारांच्या शिक्षणाद्वारे साध्य करता येतील. मानव अधिकार शिक्षण हे मानव अधिकार आणि कर्तव्ये यांच्यात समन्वय निर्माण करण्यासाठी उपयुक्त आहे.

**मानवी हक्क इतिहासातील महत्वाचे टप्पे**

**अ. मानवी हक्कांशी निगडीत जागतिक इतिहासातील प्रमुख घडामोडी**

१) **'मॅग्नाकार्टा करार'** – इंग्लडमधील १२१५ चा 'मॅग्नाकार्टा करार' हा मानवी हक्कांचा पहिला अधिकृत दस्तऐवज मानला जातो. या करारात राजाच्या अधिकारांना मर्यादा घालण्यात आल्या होत्या आणि काही मूलभूत अधिकार लोकांना देण्यात आले होते. हा करार 'महान सनद' म्हणूनही ओळखला जातो.

२) **'मानवी हक्काचा जाहीरनामा'** – फ्रान्समधील मानवी आणि नागरिकांच्या हक्कांचा जाहीरनामा हा १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांतीदरम्यान जारी करण्यात आला. हा जाहीरनामा फ्रेंच राज्यक्रांतीचा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे, जो मानवी आणि नागरिकांचे मूलभूत हक्क स्थापित करतो. या जाहीरनाम्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता, कायद्यासमोर समानता, विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य इत्यादी मानवी हक्क नमूद करण्यात आले आहेत.

३) **अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा** – १७७६ मध्ये थॉमस जेफरसनने अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा मांडला. यामध्ये मानवाधिकार, स्वातंत्र्य आणि समानतेच्या तत्वांची घोषणा करण्यात आली. हा जाहीरनामा अमेरिकेच्या इतिहासात एक महत्वाचा टप्पा आहे, ज्याने अनेक देशांमध्ये स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा दिली.

४) **संयुक्त राष्ट्रांचा मानवी हक्क आयोग**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेनंतर मानवी हक्क चळवळीला आंतरराष्ट्रीय पातळीवर विशेष महत्त्व प्राप्त झाले. संयुक्त राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक समितीने २१ जून, १९४६ रोजी 'संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्क आयोगा'ची (United Nations Commission for Human Rights) स्थापना केली. आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवी हक्कांशी संबंधित विविध प्रश्न, समस्या सोडविण्याचा प्रयत्न मानवी हक्क आयोगाने केला आहे.

आयोगाने अल्पसंख्याकांचे हक्क, आदिवासींचे हक्क, निर्वासितांचे हक्क यावर विशेष कृतिगट नेमून आपले अहवाल संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक समितीला सादर केले आहेत.

आंतरराष्ट्रीय पातळीवर वैश्विक मानवी हक्कांचा जाहीरनामा तयार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मानवी हक्क आयोगाने केले आहे. हा जाहीरनामा संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १० डिसेंबर, १९४८ रोजी 'मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा' म्हणून संमत व स्वीकृत केला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्क आयोगाचे रूपांतर १५ मार्च, २००६ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्क परिषदेत झाले आहे.

५) **'आंतरराष्ट्रीय मानवी हक्क वर्ष'** – संयुक्त राष्ट्रानी १९६८ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय मानवी हक्क वर्ष' म्हणून साजरे केले.

**ब. मानवी हक्कांशी निगडीत भारतीय इतिहासातील प्रमुख घडामोडी**

**१. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग**

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक असते. त्यासाठी सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये मानवी हक्कांचे संरक्षणाचे महत्त्वाचे कार्य करतात. त्याचप्रमाणे, मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी वैधानिक उपायही करण्यात आले आहे.

भारतामध्ये मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी 'मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३'हा संमत करण्यात आला. त्याची अंमलबजावणी भारतात २८ सप्टेंबर, १९९३ पासून करण्यात आली. या कायद्यात मानवी हक्काच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राज्य मानवी हक्क आयोग आणि मानवी हक्क न्यायालये यांच्या स्थापनेची तरतूद करण्यात आली आहे.

**आयोगाचे अधिकार व कार्ये**

१) **दिवाणी न्यायालयाचे अधिकार :** आयोगाला नागरी प्रक्रिया संहिता, १९०८ अंतर्गत दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्राप्त झाले आहेत. त्याअंतर्गत आयोगाला साक्षीदारांची साक्ष घेणे, ॲफिडेव्हीटवर पुरावा नोंदविणे, न्यायालयातून किंवा शासकीय कार्यालयातून शासकीय अभिलेख मिळविणे इत्यादी अधिकार प्राप्त झाले आहेत.

२) **तक्रारींची चौकशी:** मानवी हक्कांच्या उल्लंघनाची तक्रार प्राप्त झाल्यास आयोग त्याची सखोल चौकशी करते. त्याचप्रमाणे, न्यायालयातील प्रकरणांची न्यायालयाच्या अनुमतीने चौकशी आयोग करू शकतो.

३) **तुरुंगांना भेटी :** आयोग भारतातील विविध राज्यातील तुरुंगांना भेटी देऊन तेथील कैद्यांची स्थिती पाहू शकतो. तुरुंगातील परिस्थिती सुधारण्यासंबंधी आयोग सरकारला शिफारशी करू शकतो.

४) **मानवी हक्कांचा प्रचार व प्रसार:** आयोग मानवी हक्कांची समाजात जागृती व्हावी यासाठी संशोधने, प्रकाशने, परिषदा, चर्चासत्रे यांचे आयोजन करतो.

५) **कायद्याची प्रभावी अंमलबजावणी:** आयोग मानवी हक्कांशी संबंधित राज्यघटनेतील तरतुदी आणि मानवी हक्कांशी संबंधित विविध कायदे यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजना करते. तसेच, मानवी हक्क कायद्यांमध्ये आवश्यक नवीन तरतुदींच्या समावेशासाठी पाठपुरावा करते.

६) **स्वयंसेवी संघटनांच्या कार्याला प्रोत्साहन :** मानवी हक्कांच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांच्या प्रयत्नांना आयोग प्रोत्साहन देतोः

७) **अहवालाचे सादरीकरण :** आयोग दरवर्षी आपला वार्षिक अहवाल आणि वेळोवेळी आवश्यक विशेष अहवाल केंद्र व राज्य सरकारला सादर करतो.अशा प्रकारे राष्ट्रीय मानवी हक्क आयोग मानवी हक्कांविषयी जनजागृती व नागरिकांच्या राज्यघटनेने प्रदान केलेल्या मूलभूत हक्कांचे जतन व संवर्धनाच्या दृष्टीने बहुमोल योगदान दिल्याचे दिसते.

**२. राज्य मानवी हक्क आयोग**

मानवी हक्काच्या राज्य पातळीवरील संरक्षणासाठी 'मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३' मधील प्रकरण पाचमध्ये राज्य मानवी हक्क आयोग स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने ६ मार्च, २००१ रोजी महाराष्ट्र मानवी हक्क आयोगाची स्थापना केली आहे.

राज्य मानवी हक्क आयोगाचे अधिकार व कार्ये राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाप्रमाणेच असले तरी ते संबंधित राज्यापुरतेच मर्यादित असतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १**

१. **संयुक्त राष्ट्रसंघाने --------- मध्ये मानवी हक्कांसाठी जागतिक सार्वजनिक माहितीची मोहीम आखून त्यामध्ये प्रचार आणि प्रसार केला.**

अ.१९८८ ब. १९९० क. १९९२ ड. १९९४

२. **इंग्लडमधील इ.स. १२१५ चा 'मॅग्नाकार्टा करार' हा मानवी हक्कांचा ------ अधिकृत दस्तऐवज मानला जातो.**

अ.पहिला ब. दुसरा क. तिसरा ड. चौथा

३. **--------- यांच्या मते, मानवी हक्कांचे ज्ञान व जाणीव ही युद्ध आणि शांतता या दोन्ही काळात महत्वपूर्ण ठरते.**

अ.थिओडोर मेनन ब. थोमस जेफरसन

क.अब्राहम लिंकन ड. आर्य चाणक्य

अ. **१७७६ मध्ये थॉमस जेफरसनने -------- जाहीरनामा मांडला.**

अ.अमेरिकन स्वातंत्र्याचा ब. फ्रांस स्वातंत्र्याचा

क.इंग्लड स्वातंत्र्याचा ड. जर्मनी स्वातंत्र्याचा

४. **महाराष्ट्र शासनाने ------- रोजी महाराष्ट्र मानवी हक्क आयोगाची स्थापना केली आहे.**

अ.६ मार्च, २००१ ब. २१ मार्च २००२

क.१ मार्च २००० ड. ३१ मार्च २००५

### १.२.२. मानवी हक्क शिक्षणाची ध्येये व उद्दिष्ट्ये

मानवाधिकार शिक्षणाचा एक महत्वाचा परिणाम सशक्तीकरण आहे. ही एक प्रक्रिया आहे, ज्याद्वारे लोक आणि समुदाय यांना त्यांचे स्वतःचे जीवन आणि त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या निर्णयांवर नियंत्रण ठेवता येते. सोप्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे मानवी हक्क शिक्षण हे असे अध्ययन आहे जे मानवी हक्कांशी निगडीत ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये विकसित करते.

संयुक्त राष्ट्रसंघाने मानव अधिकार दशक (१९९५-२००४) म्हणून घोषीत केलेले होते. त्यांनी मानवी हक्क शिक्षणाला असे परिभाषित केले आहे कि, मानवी हक्क शिक्षणात ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करणे आणि मनोवृत्ती (अभिवृत्ती) निर्माण करुन मानवी हक्कांची सार्वभौमिक संस्कृती निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रशिक्षण, प्रसार आणि माहिती प्रयत्न जे पुढीलप्रमाणे निर्देशित केलेले आहेत.

#### अ. मानवी हक्क शिक्षणाची ध्येये

मानवी हक्क शिक्षणाची ध्येये पुढीलप्रमाणे आहेत

१. मानवी अधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्यासाठी आदर वाढविणे.

२. मानवी व्यक्तिमत्वाचा पूर्ण विकास आणि त्याच्यात प्रतिष्ठेची भावना निर्माण करणे.

३. सर्व राष्ट्रांमध्ये, स्वदेशी लोक आणि वंशीय, राष्ट्रीय, जातीय, धार्मिक आणि भाषिक समुहांमध्ये समंजसपणा, आदर, लैंगिक समानता आणि मैत्री वाढविणे.

४. मुक्त समाजात प्रभावीपणे सहभागी होण्यासाठी सर्व व्यक्तींना सक्षम करणे.

५. शांतता राखण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या उपक्रमांना पुढे नेणे.

६. मानवी हक्कभंगाच्या बळींबद्दल विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती आणि आस्था निर्माण करणे.

७. सर्व राष्ट्रामध्ये मैत्री विकसित करणे आणि वांशिक, पारंपारिक, धार्मिक व भाषिक भेद नष्ट करणे.

**ब. मानव अधिकार शिक्षणाची उद्दिष्ट्ये**

मानव अधिकार शिक्षणाचे उद्देश पुढीलप्रमाणे

१. सर्व लोकांच्या मानव अधिकारांप्रती आदरास प्रोत्साहन देणे.

२. ज्ञान, कौशल्य आणि मानव अधिकारांची मूल्ये विकसित करणे.

३. सामाजिक मानसिक व मानवी व्यक्तिमत्त्व विकसित करणे.

४. प्रत्येक देशाच्या समस्या आणि आंतरराष्ट्रीय समुदायाच्या समस्यांवर मात करण्यासाठी लोकांना आणि धोरण निर्मात्यांना मार्ग व साधन विकसित करण्यासाठी मदत करणे.

५. सलोखा, सहिष्णुता व स्त्री-पुरुष समानता वाढविण्यास मदत करणे.

६. विद्यार्थ्यांना मानवी हक्कांच्या वैश्विकतेची जाणीव करुन देणे.

७. मानवी हक्क संरक्षणांच्या यंत्रणांचा परिचय करुन देणे.

८. विद्यार्थ्यात चिकित्सक विचार विकसित करुन जेथे मानवी हक्कभंग झाले आहेत, त्याबाबतीत विचार करायला प्रवृत्त करणे.

**क. मानव अधिकार शिक्षणाची प्रतिमाने**

मानव अधिकार शिक्षणाच्या मूल्यांना रुजविण्यासाठी अनेक प्रतिमाने विकसित करण्यात आली आहेत. विविध प्रतिमानांपैकी, खालील तीन प्रतिमाने मानव अधिकाराची उद्दिष्टे व ध्येये साध्य करण्यासाठी महत्त्वपूर्ण मानली जातात.

**१. मूल्ये आणि जागरूकतेचे प्रतिमान –** या प्रतिमानात मानव अधिकारांचे मूलभूत ज्ञान हस्तांतरित करण्यावर आणि शैक्षणिक संस्थांच्या पाठ्यक्रमाच्या माध्यमातून सार्वजनिक मूल्यांमध्ये एकीकरणास प्रोत्साहित करण्यावर लक्ष केंद्रित केले जाते.

**२. उत्तरदायित्त्वाचे प्रतिमान –** या प्रतिमानात मानव अधिकार उल्लंघनाचे निरीक्षण करण्यावर आणि लोकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यासाठी ज्या मार्गांचे अवलंबन करावयाचे आहे, त्या व्यावसायिक जबाबदाऱ्यांवर लक्ष केंद्रित केले जाते.

**३. रूपांतरित प्रतिमान–** या प्रतिमानाचा मुख्य उद्देश मानव अधिकारांचे दुरूपयोग ओळखणे आणि ते प्रतिबंधित करण्याच्या दिशेने लोकांना सशक्त करण्याचा आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न २**

**१. संयुक्त राष्ट्रसंघाने मानव अधिकार दशक ------ या कालावधीत घोषीत केलेले होते.**

अ.१९९५ ते २००४ ब. २००४ ते २०१४

क. १९८५ ते १९९४ ड. २००५ ते २०१४

**२. मानवी हक्क शिक्षण हे असे अध्ययन आहे ज्याद्वारे मानवी हक्कांशी निगडीत -------- विकसित करते.**

अ.ज्ञान ब. मुल्ये क. कौशल्ये ड. वरील सर्व

**३. मानवी हक्क शिक्षणाचे ध्येय खालीलपैकी कोणते आहे?**

अ.मानवी अधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्यासाठी आदर वाढविणे.

ब. मुक्त समाजात प्रभावीपणे सहभागी होण्यासाठी सर्व व्यक्तींना सक्षम करणे.

क.शांतता राखण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या उपक्रमांना पुढे नेणे.

ड. वरील सर्व

**४. मानव अधिकार शिक्षणाचे उद्देश खालीलपैकी कोणते आहेत ?**

अ.सर्व लोकांच्या मानव अधिकारांप्रती आदरास प्रोत्साहन देणे.

ब.ज्ञान, कौशल्य आणि मानव अधिकारांची मूल्ये विकसित करणे.

क.सामाजिक मानसिक व मानवी व्यक्तिमत्त्व विकसित करणे.

ड. वरील सर्व

**५. -------------या प्रतिमानात मानव अधिकारांचे मूलभूत ज्ञान हस्तांतरित करण्यावर भर दिला जातो.**

अ. मुल्ये व जागरूकतेचे प्रतिमान ब. उत्तरदायित्वाचे परिणाम

क. रुपांतरीत प्रतिमान ड. वरील सर्व

### १.२.३. मानवी हक्क शिक्षणाची गरज व महत्व

### अ. मानवी हक्क शिक्षणाची गरज

मानवी हक्क शिक्षणामध्ये मानवी हक्क, त्यांचे संरक्षण तसेच त्याच्या उल्लंघनानंतर करावयाच्या उपाययोजना या सर्व बाबतीत योग्य ते ज्ञान, दृष्टीकोन, मूल्ये, कौशल्ये इत्यादींचा विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. मानवी हक्क शिक्षणाची गरज पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१. व्यक्तीस तिच्या मानवी अधिकारांबद्दल जागरुक करण्यासाठी**

समाजात विविध धर्म, जात, पंथ असलेले लोक राहतात. यामध्ये शिक्षित आणि अशिक्षित असे दोन्ही प्रकारचे लोक असतात. बऱ्याच व्यक्तींना स्वतःचे मुलभूत हक्क काय आहेत? हे माहीत नसते. अशा व्यक्तींना समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क व न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क या हक्कांची ओळख करुन देण्यासाठी मानवी हक्कांचे शिक्षण देण्याची गरज आहे.

**२. मानवी हक्क चळवळीविषयी लोकांमध्ये संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी –**

मानवी हक्कांसाठी देशात व जगभरात ज्या चळवळी व आंदोलने झालेली आहेत त्याची माहिती लोकांना करुन देणे गरजेचे आहे व त्याबद्दल संवेदनशीलता निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी मानवी हक्क शिक्षणाची गरज आहे. उदा. स्त्रियांवरील हुंड्याची प्रथा बंद व्हावी म्हणून चळवळीद्वारे या प्रथेचे दुष्परिणाम लोकांना लक्षात आणून देणे व त्याद्वारे या चळवळीत सक्रिय सहभाग लोकांनी घेण्यासाठी मानवी हक्क शिक्षणाची आवश्यकता आहे.

**३. मानवी हक्कांबाबत योग्य दृष्टीकोन आणि मूल्ये विकसित करण्यासाठी**

न्यायाधीश प्लीमा बेवी यांच्या मते, समाजात मानवी हक्कांचे उल्लंघन होण्याचे एकमेव कारण म्हणजे असहिष्णुता होय. एखाद्या किरकोळ घटनेतसुद्धा मोठ्या प्रमाणात हिंसाचार भडकू शकतो. सहिष्णुता हे मूल्य एका रात्रीत संक्रमित करता येत नाही. ते मूल्य हळूवारपणे व टप्प्याटप्प्याने संपादित करता येईल. विद्यार्थ्यांमध्ये समता, बंधुता, स्वातंत्र्य, देशभक्ती इ. मूल्ये टप्प्याटप्प्याने विकसित करण्यासाठी मानवी हक्कांच्या शिक्षणाची गरज आहे.

**४. सामाजिक बदलांसाठी**

समाजामध्ये आजही स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. समाजातील काही वंचित समूह आजही प्रगतीपासून वंचित आहेत. ही दरी दूर करण्यासाठी समाज परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. मानवी हक्क शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवून आणता येईल.

**५. भीतीमुक्त व गरजमुक्त समाज निर्मितीसाठी –**

समाजात आजही अन्याय अत्याचाराच्या विविध घटना घडताना दिसतात. त्यामुळे समाजात सर्वत्र भीतीचे व दहशतीचे वातावरण पसरलेले आहे. अशा परिस्थितीत समाजाला भितीमुक्त किंवा दहशतमुक्त करण्यासाठी मानवी हक्क शिक्षणाची गरज आहे.

**६. मानवी हक्कांचा योग्य उपयोग होण्यासाठी –**

समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपले हक्क जाणून घेतले व ते मिळविले, दुसऱ्यांच्या हक्कांवरती गदा आणली नाही किंवा आक्रमण केले नाही तर प्रत्येकास चांगले जीवन जगता येईल. यातून प्रत्येक व्यक्तीला आपले हक्क उपभोगावयास मिळतील व त्यामुळे प्रत्येक व्यक्ती समाधानी, संतुष्ट व समाज गरजमुक्त बनेल. यासाठी मानवी हक्क शिक्षणाची गरज आहे.

**७. आर्थिक बदलांसाठी**

प्रत्येक व्यक्तीला काम करण्याची, आपले जीवनमान उंचावण्याची समान संधी आवश्यक असते. तसेच स्वातंत्र्य, न्याय इत्यादींबाबत विद्यार्थ्यांचे हक्क माहित करुन दिल्यास विद्यार्थी श्रमाला अधिक महत्व देतील. पर्यायाने देशाचा आर्थिक विकास साधला जाईल.

**८. व्यक्तीला मानवतावादी बनविण्यासाठी**

मानवी हक्कांचे संक्रमण व्यक्तीमध्ये मानवतावादी दृष्टीकोनातून होण्यासाठी मानवी हक्क शिक्षणाची गरज आहे.

**९. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी**

व्यक्तीला आपले हक्क उपभोगण्यास मिळाले नाहीत तर त्याच्या स्वातंत्र्यावर गदा येते आणि असंतोषाचे वातावरण निर्माण होते. प्रत्येक व्यक्तीला त्याचे स्वतःचे हक्क मिळाले तर तो दुसऱ्याचे हक्क हिरावून घेणार नाही. यामुळे परस्पर सहकार्याचे वातावरण निर्माण होईल व सर्वत्र शांतता प्रस्थापित होण्यास मदत होईल. त्यासाठी मानवी हक्क शिक्षणाची गरज आहे.

**ब. मानवी हक्क शिक्षणाचे महत्व (Importence of Human Rights Education)**

आज जग हे जागतिक खेडे बनलेले आहे आणि मानवी हक्कांचे पालन करणे यासारखे मूल्य जागतिक पातळीवर सामायिक (Shared) केले जाते. मानवाधिकार शिक्षण मूल्ये, विश्वास आणि दृष्टीकोन यांना प्रोत्साहित करते, जे सर्व व्यक्तींना त्यांच्या स्वतःच्या आणि इतरांच्या अधिकारांचे पालन करण्यास प्रोत्साहित करते. मानवाधिकार शिक्षणातून मानवी हक्कांशी संबंधित मुल्ये प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येक समुदायात प्रत्येकाच्या सर्वसाधारण जबाबदारीची समज विकसित होते.

भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. तस्करी (trafficking), महिलांचे व्यावसायिक आणि लैंगिक शोषण, धार्मिक उल्लंघने, जातीसंबंधित समस्या अशी काही उदाहरणे आहेत ज्यात मानवी हक्कांचे उल्लंघन केले जाते. जर भारतातील मानवी हक्कांचे उल्लंघन केले गेले तर जगातील सर्वात मोठी लोकशाही धोक्यात येईल. त्यामुळे शांतता, विकास आणि लोकशाहीसाठी मानवी हक्कांची आवश्यकता आहे.

मानवी हक्कांचे ज्ञान त्यांच्या उल्लंघनाविरुद्ध सर्वोत्तम संरक्षण आहे. जेव्हा आपण एखाद्याच्या अधिकारांबद्दल शिकतो तेव्हा आपण इतरांच्या हक्कांचा आदर करण्यास शिकतो. या अधिकारांचे पूर्ण आणि सार्वभौमिक उपभोग सुरक्षित करण्यासाठी सर्व मानवाधिकारांना प्रोत्साहन देणे, प्रचार करणे आणि त्यांचे रक्षण करणे आवश्यक आहे. मानवाधिकार विवादांचे निराकरण करण्यासाठी जागरुकता महत्वाची आहे. ही परिपक्व भागीदारी केवळ मानवाधिकारांच्या शिक्षणामुळेच प्राप्त करता येते. शिक्षण दैनंदिन जीवनात मानवाधिकारांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांचे संरक्षण करण्यासाठी आणि लागू करण्यासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करते. शिक्षण मानवाधिकारांच्या वास्तविक कल्पना करण्यासाठी आणि त्यांचे ज्ञान संरक्षित करण्याचे एक साधन आहे.

मानव अधिकार शिक्षणाचे महत्व पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

१. मानवाधिकार शिक्षण परिणामकारक मानवी हक्कांचे शिक्षण मूल्ये आणि अभिवृत्ती बदलण्यास मदत करते.

२. मानवी हक्क शिक्षणातून व्यक्तीच्या वर्तनात सकारात्मक बदल घडून येतो.

३. मानवी हक्क शिक्षणातून समाजातील विविध समुहात सामंजस्य वाढून सहभागी शिक्षणाला प्रोत्साहित मिळते.

४. मानवी हक्क शिक्षण समुदायांमध्ये आणि राष्ट्रांमधील एकजुटीच्या दृष्टीकोनाला विकसित करते.

५. यामधून मानवी हक्काविषयी योग्य ज्ञान आणि विश्लेषणात्मक कौशल्ये विकसित होतात.

६. याद्वारे मानवाधिकारांविषयी जागरुकता वाढविता येते आणि मुलांना भेदभावपूर्ण आचरण आणि वर्तनाविरुद्ध शिक्षित करता येते.

७. मानवाधिकार शिक्षणामुळे व्यक्तींना मानवाधिकार काय आहेत, त्यांची व्याख्या काय आहे आणि ते कसे महत्वाचे आहेत हे समजते.

८. हे शिक्षण लोकांना मानवाधिकार कायद्याबद्दल आणि समाजातील अन्याय, गैरवापर आणि अत्याचारांबद्दल जागरूक करते.

९. मानवाधिकार शिक्षण लोकांना लोकशाही प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होण्यास मदत करते आणि त्यांना त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी योग्य मार्ग निवडण्यास प्रोत्साहित करते.

१०. हे शिक्षण लोकांना समाजातील अन्याय आणि गैरवापर दूर करण्यासाठी एकत्र येण्यास आणि आवाज उठवण्यासाठी प्रेरित करते.

वरील माहितीवरून आपणास असे म्हणता येते कि, शिक्षण हे मानवाधिकार शिक्षणासाठी एक आवश्यक साधन आहे. शिक्षणामुळे व्यक्तींना त्यांचे हक्क समजतात, ते अन्याय आणि गैरवापर ओळखतात आणि त्यांना योग्य उपाययोजना करता येतात. मानवाधिकार शिक्षणामुळे व्यक्तींना ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये मिळतात, ज्यामुळे ते स्वतःच्या आणि इतरांच्या मानवाधिकार-संरक्षणासाठी लढू शकतात.

थोडक्यात मानव अधिकार शिक्षणाचा महत्वाचा परिणाम म्हणजे लोकशाहीचे सिद्धांत, कायद्याचे शासन आणि सामाजिक न्याय साध्य करण्यावर होईल. शिवाय, शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी याची मदत होईल. मानव अधिकार शिक्षण आपल्याला एक टिकाऊ सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्थिरता साध्य करण्यास सक्षम बनवते.

**मानवाधिकार शिक्षणाचे स्वरूप**

मानवाधिकार शिक्षणाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

१. शैक्षणिक संस्था - शाळा, कॉलेज आणि विद्यापीठांमध्ये मानवाधिकार शिक्षण कार्यक्रम चालवले जातात.

२. सामुदायिक कार्यक्रम - अनेक समुदाय-आधारित संस्था मानवाधिकार शिक्षण कार्यशाळा आणि चर्चा आयोजित करतात.

३. मानवाधिकार संस्था - विविध मानवाधिकार संस्था आणि संघटना मानवाधिकार शिक्षणासाठी प्रशिक्षण आणि संसाधने उपलब्ध करतात.

४. ऑनलाईन संसाधने - अनेक ऑनलाइन संसाधने, माहिती आणि प्रशिक्षण सामग्री मानवाधिकार शिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ३**

**१. मानवी हक्क म्हणजे काय?**

a) शासनाचे नियम  b) न्यायालयाचे आदेश

c) प्रत्येक व्यक्तीस मिळणारे मूलभूत अधिकार  d) शिक्षकांचे हक्क

**२. मानवी हक्क शिक्षणाचा मुख्य उद्देश काय आहे?**

a) मानवी हक्क परीक्षा उत्तीर्ण होणे

b) मानवी हक्कावर बंधने आणणे.

c) लोकांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक करणे

d) रोजगार मिळवणे

**३. खालीलपैकी कोणते शिक्षण व्यक्तीला स्वतःच्या हक्कांची जाणीव करून देते?**

a) वैज्ञानिक शिक्षण b) मानवी हक्क शिक्षण

c) क्रीडा शिक्षण d) व्यावसायिक शिक्षण

**४. मानवी हक्क शिक्षणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य कोणते?**

a) ते फक्त प्रौढांसाठी आहे

b) ते केवळ कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी आहे

c) ते सर्वांसाठी उपयुक्त आहे

d) त्याची गरज नाही

**५. मानवाला स्वातंत्र्य, समता आणि सुरक्षितता याची हमी कोठून मिळते?**

a) नोकरीतून b) शिक्षणातून c) मानवी हक्कांमधून d) राजकारणातून

### १.२.४. मानवी हक्क शिक्षणाची तत्वे

आजच्या जागतिक युगात व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आणि समाजात शांतता, न्याय व समानता प्रस्थापित करण्यासाठी मानवी हक्कांचे शिक्षण अत्यावश्यक झाले आहे. हे शिक्षण केवळ हक्कांची ओळख करून देत नाही, तर व्यक्तीला सजग, सहिष्णु, जबाबदार आणि सक्रिय नागरिक म्हणून घडवते. यामध्ये काही मूलभूत तत्त्वांचा समावेश असतो, जे शिक्षणाची दिशा निश्चित करतात.

मानव अधिकार शिक्षणात संयुक्त राष्ट्र संघाने, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विविध पद्धती व तंत्रे यांच्या माध्यमातून मानव अधिकाराचा प्रसार करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे योजिली आहेत. मानवी हक्क शिक्षणाची तत्त्वे मानवाच्या प्रतिष्ठेची, सन्मानाची आणि सार्वत्रिक हक्कांची जाणीव निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जातात.

मानवाधिकार शिक्षणाची प्रमुख तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१. **सार्वत्रिकता आणि अविभाज्यता –** सर्व मानवी हक्क हे सर्व व्यक्तींना समान आणि सार्वत्रिक असतात. कोणत्याही प्रकारचे हक्क उदा. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी सर्वांसाठी अपरिहार्य आहेत. मानवी हक्क हे कोणताही भेदभाव न करता प्रत्येकासाठी लागू होतात.

२. **समानता –** मानवी हक्क शिक्षणात वर्ग, जात, धर्म, लिंग, वय, भाषा, अपंगत्व इ. कोणताही भेदभाव केला जात नाही. प्रत्येक व्यक्तीला समान हक्क आणि संधी मिळणे गरजेचे आहे.

३. **सन्मान आणि प्रतिष्ठा –** प्रत्येक माणसाला स्वतःच्या अस्तित्वाचा सन्मान मिळावा. मानवी हक्क शिक्षणातून लोकांना इतरांच्या प्रतिष्ठेचा आदर कसा करायचा हे शिकवले जाते.

४. **सक्रिय सहभाग –** मानवी हक्क शिक्षण हे फक्त माहिती देणारे नसून विद्यार्थ्यांचा आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असतो.विद्यार्थ्यांनी चर्चांमध्ये, सामाजिक उपक्रमांमध्ये, निर्णयप्रक्रियेत भाग घ्यावा.

५. **सहिष्णुता आणि आंतरसांस्कृतिक समज –** मानवी हक्क शिक्षणात वेगवेगळ्या संस्कृती, धर्म, परंपरा, आणि दृष्टिकोन यांचा आदर करणे शिकवले जाते.हे शिक्षण हिंसेऐवजी संवाद आणि सहकार्य यावर भर देते.

६. **सामाजिक न्याय आणि उत्तरदायित्व –** मानवी हक्क शिक्षणाने लोकांना स्वतःच्या व इतरांच्या हक्कांची जाणीव होण्यास मदत होते. शासन, संस्था आणि नागरिक यांची हक्कांची पूर्तता करण्यासाठी उत्तरदायी असले पाहिजेत.

७. **सांस्कृतिक अनुकूलता –** मानवी हक्क शिक्षण स्थानिक संदर्भानुसार आणि सांस्कृतिक मूल्यांनुसार योग्यरित्या समजावून सांगितले पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण अधिक जवळचे वाटते.

८. **कृतीयुक्त शिक्षण –** मानवी हक्क शिक्षण फक्त पुस्तकी ज्ञान देत नाही, तर हक्कांचे रक्षण करण्यासाठी कृतीशील बनवते. ते विद्यार्थ्यांना सामाजिक प्रश्नांवर काम करण्यास प्रेरणा देते.

९. **लोकशाही आणि कायद्याचे राज्य –** नागरिकांनी लोकशाही प्रक्रियांचा आदर करणे आणि कायद्याचे पालन करणे शिकले पाहिजे. लोकशाही मूल्ये म्हणजे मतस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आणि उत्तरदायित्व यांचा समावेश.

१०. **सततची शिकवण आणि दीर्घकालीन दृष्टिकोन –** मानवी हक्कांची शिकवण ही सातत्यपूर्ण स्वरूपाची आहे. ही शिकवण जागतिक शाश्वत विकासाशी सुसंगत आहे.

मानवी हक्क शिक्षणाची तत्त्वे ही फक्त माहिती देण्यासाठी नसून, व्यक्तीला सजग, जबाबदार आणि संवेदनशील नागरिक बनवण्यासाठी असतात. ही तत्त्वे शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर जसे कि, शाळांमध्ये, महाविद्यालयांमध्ये आणि समाजामध्ये लागू करणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे, मानवी हक्क शिक्षणाची तत्त्वे ही केवळ वैचारिक नाहीत, तर सामाजिक परिवर्तनाचे साधन आहेत. आजच्या बदलत्या समाजात ही तत्त्वे अंगीकारणे म्हणजे लोकशाही, सहिष्णुता व मानवी प्रतिष्ठेची खरी जोपासना होय.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ४**

१. **खालीलपैकी कोणता विचार मानवी हक्क शिक्षणाच्या तत्त्वात बसतो?**

A) माझेच मत योग्य आहे

B) वेगवेगळ्या मतांचा आदर करावा

C) जे मोठे आहेत त्यांचाच निर्णय अंतिम

D) फक्त आपल्या हक्कांची मागणी करावी

२. **मानवी हक्क शिक्षणाचे तत्त्व म्हणजे**

A) अधिकार मिळाले म्हणजे कर्तव्य संपले

B) केवळ स्वतःचा विचार करणे

C) अधिकारांसोबत कर्तव्यांची जाणीव ठेवणे

D) इतरांचे हक्क नाकारणे

**३. खालीलपैकी कोणती कृती मानवी हक्क शिक्षणाच्या तत्त्वांनुसार चूक आहे?**

A) समाजातील दुर्बल घटकांना मदत करणे

B) इतर धर्माचा आदर करणे

C) स्त्रियांसोबत भेदभाव करणे

D) सर्वांना बोलण्याची संधी देणे

**४. मानवी हक्क शिक्षणाने व्यक्तीमध्ये काय विकसित होते?**

A) ईर्ष्या  B) जबाबदारी आणि सहकार्याची भावना

C) क्रौर्य  D) अज्ञान

**५. मानवी हक्क शिक्षणाच्या तत्त्वांनुसार समाजातील प्रत्येक व्यक्तीला हक्क असतो**

A) फक्त मत देण्याचा  B) केवळ नोकरीचा

C) सन्मानाने जगण्याचा  D) दुसऱ्यांवर तक्रार करण्याचा

**१.३. सारांश**

अशा प्रकारे मानवी हक्क हे मानवाच्या जीवनाचे अविभाज्य भाग आहे असे लक्षात येते. मानवी हक्काशिवाय कोणत्याही व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करून घेणे शक्य होत नाही. मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी मानवी हक्क शिक्षण आवश्यक आहे. मानवी हक्क शिक्षणातून व्यक्तीला स्वत:चे व इतरांचे हक्क समजतात, त्याचप्रमाणे एकमेकांची कर्तव्येही समजतात. मानवी हक्क व कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मानवी हक्कांचा समाजात प्रचार, प्रसार होण्यासाठी मानवी हक्क शिक्षण आवश्यक ठरते.

**१.४. महत्वाच्या संकल्पना**

१. मानवी हक्क  समाजातील प्रत्येक व्यक्तीला मानव या नात्याने जन्मापासून स्वाभाविकपणे प्राप्त होणारे हक्क म्हणजे मानवी हक्क होय.

२. मानवी हक्क शिक्षण  मानवी हक्क शिक्षण म्हणजे अशा शिक्षणाची प्रक्रिया जी व्यक्तीला स्वत:च्या व इतरांच्या मानवी हक्कांची जाणीव करून देते, त्यांचा आदर करायला शिकवते आणि हक्कांचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी प्रेरित करते.

**१.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे**

**स्वयं अध्ययन प्रश्न १ उत्तरे**

१. १९८८ साली

२. पहिला

३. थिओडोर मेनन

४. अमेरिकन स्वातंत्र्याचा

५. ६ मार्च, २००१

**स्वयं अध्ययन प्रश्न २ उत्तरे**

१. १९९५-२००४

२. वरील सर्व

३. वरील सर्व

४. वरील सर्व

५. मूल्ये आणि जागरूकतेचे प्रतिमान

**स्वयं अध्ययन प्रश्न ३ उत्तरे**

१. प्रत्येक व्यक्तीस मिळणारे मूलभूत अधिकार

२. लोकांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक करणे

३. मानवी हक्क शिक्षण

४. ते सर्वांसाठी उपयुक्त आहे.

५. मानवी हक्कामधून

**स्वयं अध्ययन प्रश्न ४ उत्तरे**

१. वेगवेगळ्या मतांचा आदर करावा

२. अधिकारांसोबत कर्तव्यांची जाणीव ठेवणे

३. स्त्रियांसोबत भेदभाव करणे

४. जबाबदारी आणि सहकार्याची भावना

५. सन्मानाने जगण्याचा

## १.६ अधिक सरावासाठी प्रश्न

१. मानवी हक्क शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करा ?

२. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची कार्ये नमूद करा ?

३. मानवी हक्क शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टे स्पष्ट करा ?

४. मानवी हक्क शिक्षणाच्या तत्वांचे उदाहरणासह विश्लेषण करा ?

५. मानवी हक्क शिक्षणाच्या प्रतिमानांची माहिती स्पष्ट करा ?

**१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ**


१. कुलकर्णी, पी. के (२०१३), मानवी हक्क व सामाजिक न्याय, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स

२. के' सागर (२०१५), समग्र मानवी हक्क, पुणे : के' सागर पब्लिकेशन्स

३. के' सागर (२०१९), संपूर्ण महिला व बालविकास, पुणे : के' सागर पब्लिकेशन्स

४. कोतापल्ले, लक्ष्मण (२०११), भारतीय सामाजिक कल्याण, प्रशासन आणि समाजकार्य, औरंगाबाद, विद्या प्रकाशन

५. कपोले, अरविंद (२०१७), भारतीय समाज व शिक्षण, पुणे : निराली प्रकाशन

६. सांगोले, अरुण व अलीगावे महेश (२०१७), भारतीय समाज व शिक्षण, पुणे : सुविचार प्रकाशन

७. मंगळूरकर, मीना व आवटे, कमलादेवी (२०२४), भारतीय समाज व शिक्षण, पुणे : फडके प्रकाशन

८. जाधव, तुकाराम व शिरापूरकर, मानवी हक्क, पुणे : युनिक पब्लिकेशन्स


❑❑❑

## घटक २
# मानवी अधिकाराचे प्रश्न, चळवळी आणि संवर्धन


२.०. उद्दिष्टे

२.१. प्रास्ताविक

२.२. विषय विवेचन

२.२.१. बालकांचे मानवी अधिकार

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १

२.२.२. महिलांचे मानवी अधिकार

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न २

२.२.३. अल्पसंख्याकांचे मानवी अधिकार

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ३

२.२.४. दिव्यांगाचे मानवी अधिकार

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ४

२.३. सारांश

२.४. महत्वाच्या संकल्पना

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

२.६ अधिक सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


**२.०. उद्दिष्टे**

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपणास

१. मानवी हक्कासंदर्भातील प्रश्न किंवा समस्या समजतील.

२. मानवी हक्क संदर्भातील जनजागृतीची माहिती होईल.

३. बालकांच्या मानवी हक्कांची संकल्पना समजेल.

४. महिलांच्या मानवी हक्कांची माहिती होईल.

५. अल्पसंख्यांकांचे मानवी हक्क समजतील.

६. दिव्यांग व्यक्तींच्या अधिकारांचे विश्लेषण करता येईल.

## २.१. प्रास्ताविक

मानवी हक्क हे प्रत्येक व्यक्तीला जन्मतः मिळणारे मूलभूत हक्क आहेत. या हक्कांमध्ये जगण्याचा, स्वातंत्र्याचा, समतेचा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार अंतर्भूत असतो. पण वास्तवात, अनेक समाजांमध्ये हे हक्क पायदळी तुडवले जातात. स्त्री–पुरुष असमानता, जातीभेद, बालाश्रम, धार्मिक अत्याचार, अल्पसंख्याकांचा छळ, बालअत्याचारांच्या घटना, दिव्यांगाना भेडसावणाऱ्या अडचणी अशा अनेक रूपांत मानवी हक्कांचे उल्लंघन होत असते. या अन्यायकारक परिस्थितींविरुद्ध लढा देण्यासाठी आणि शोषित, वंचित घटकांच्या हक्कांची जपणूक करण्यासाठी जगभरात विविध मानवाधिकार चळवळी उभ्या राहिल्या. या चळवळींनी सामाजिक जागरुकता वाढवून कायद्यात सुधारणा घडवून आणल्या आणि लोकशाही मूल्यांना बळकटी दिली. मानवाधिकारांचे संरक्षण आणि संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचीही जबाबदारी आहे. समाजात समता, न्याय आणि बंधुता टिकून राहण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने मानवाधिकारांचा आदर व पालन करणे अत्यावश्यक आहे.

## २.२. विषय विवेचन

### २.२.१. बालकांचे मानवी हक्क

संयुक्त राष्ट्रसंघाच्या बालहक्क करार (१९९२) मधील कलम १ नुसार १८ वर्षांखालील प्रत्येक व्यक्ती म्हणजे बालक होय. भारतातील बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार वय वर्षे ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकाला मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. बालकांना जगण्याचा, विकासाचा, सुरक्षिततेचा व सहभागितेचा हक्क मिळण्यासाठी त्यांचे मानवी अधिकार अतिशय महत्वपूर्ण आहेत. मानवी अधिकारातून बालकांचा सर्वांगीण विकास होऊन प्रत्येक बालकाला विकासाची समान संधी उपलब्ध होते.

बालकांचे मानवी अधिकार समजावून घेण्यापूर्वी त्यांच्या संदर्भातील सद्यस्थिती व बालकांच्या विकासातील समस्या समजावून घेणे आवश्यक आहे.

**अ. बालकांची सद्यस्थिती व बालकांच्या विकासातील समस्या**

(१) सन २०११ च्या जनगणनेच्या प्राथमिक निष्कर्षांनुसार आपल्या देशात ० ते ०६ वर्षे वयोगटातील बालकाची संख्या १६ कोटी ४४ लाख ७८ हजार १५० इतकी आहे. एकूण लोकसंख्येतील त्याचे प्रमाण १३.६ टक्के इतके आहे.

(२) भारतातील निम्म्याहून अधिक बालके आरोग्याच्या मूलभूत सोयींपासून वंचित राहतात. आरोग्याच्या मूलभूत सोयींपासून वंचित राहत असलेल्या बालकांचे प्रमाण ५३ टक्के इतके आहे.

(३) युनिसेफच्या अलीकडील अहवालानुसार भारतात जन्मलेल्या सात बालकांपैकी एक बालक वयाची पाच वर्षे पूर्ण होण्यापूर्वी मृत्यू पावते.

(४) 'अ' जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे देशात दरवर्षी तीस हजारहून अधिक बालके प्रत्येक वर्षाला दृष्टीबाधित होतात.

(५) शाळेत जाणाऱ्या मुलांतील दर हजारांपैकी नऊ मुले आहारजन्य रक्तक्षयाची शिकार झालेली असतात. त्यातून एक प्रकारचा हृदयरोगही उद्भवतो.

(६) भारतातील सहा ते अकरा वर्षे या वयोगटातील २.२७ कोटी मुले व २.६१ कोटी मुली अशी एकूण चार कोटी ब्याऐंशी लाख मुले निरक्षर आहेत.

(७) २०११ च्या जनगणनेच्या प्राथमिक निष्कर्षानुसार भारतात ८२. २८ लाखांपेक्षा जास्त बालमजूर आहेत जो भारतातील श्रमशक्तीचा ३.१७ टक्के हिस्सा होतो. यातील बहुतेकांचे शोषण केले जाते. शेकडो मुले वेठबिगारच आहेत.

(८) दरवर्षाला भिकाऱ्याच्या व्यवसायात लोटण्यासाठी हजारो मुले पळवून नेऊन शारीरिकदृष्ट्या विकृत केली जातात.

(९) भारतात मुले व मुली यांच्याबाबत लैंगिक भेदभाव केला जातो. या भेदभावाचा गंभीरपणा आपल्या देशातील दरहजार पुरुषामागे ९४३ स्त्रिया (२०११ च्या जनगणनेच्या प्राथमिक निष्कर्षांनुसार) या स्त्री-पुरुष प्रमाणावरून दिसून येतो. ० ते ६ बर्षे वयोगटातील दर हजार पुरुषामागे ९१९ इतके असलेले स्त्रियांचे प्रमाण या परिस्थितीतील विदारकता अधिकच स्पष्ट करते. या असमतोलामुळे अनेक सामाजिक समस्या उद्भवल्या आहेत.

(१०) आपल्या समाजात बालकांपेक्षा बालिकाच मोठ्या प्रमाणात कुपोषणग्रस्त आहेत. आजारी पडण्याचे प्रमाण बालकांपेक्षा बालिकांतच जास्त आहे. पौगंडावस्थेत व आईपणात या कुपोषित बालिका प्रवेश करीत असल्याचा परिणाम म्हणूनच जन्मणाऱ्या अर्भकांचे वजन धोकादायक ठरेल इतके कमी असते.

(११) वय वर्षे ० ते ५ या वयोगटातील बालमृत्यूचे प्रमाण विचारात घेतले तर मुलांपेक्षा मुलींमध्ये ते ६१ टक्के इतके अधिक आहे.

(१२) बालकांमध्ये कुपोषण, बालमजुरी, लैंगिक शोषण, बालकांना शारीरिक इजा, बालगुन्हेगारी, दुर्गम भागात शैक्षणिक सोयी-सुविधांचा अभाव इत्यादी समस्या असलेल्या दिसतात.

**ब. भारतीय राज्यघटनेतील बालकांच्या संरक्षणविषयक तरतुदी**

भारतीय राज्यघटनेत बालकांचे हक्क, त्यांचा विकास यासंबंधी पुढील तरतुदी समाविष्ट आहे.

(१) कलम १५ (३) - राज्य महिला व बालकांसाठी विशेष तरतुदी करू शकते.

(२) कलम २१ () - ६ ते १४ वयोगटातील मुलांना राज्याने मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण द्यावे.

(३) कलम २३ - मानवाचा व्यापार अथवा वेठबिगारीस प्रतिबंध

(४) कलम २४ - धोकादायक कारखाने, खाणी अथवा धोकादायक व्यवसायात १४ वर्षांखालील बालकामगारास प्रतिबंध

(५) कलम ३९ (ए) - कामगार व बालके याच्या आरोग्याला हानिकारक नसेल असा रोजगार मिळवून देणे

(६) कलम ३९ (ऋ) - बालकांना निकोप, मुक्त व प्रतिष्ठेच्या वातावरणात विकसित होण्याची संधी आणि सुविधा दिल्या जातील. तसेच बालकाचा व युवकाचा शोषणापासून आणि नैतिक अधःपतनापासून बचाव केला जाईल.

(७) कलम ४५ - ६ वर्षांपर्यंतच्या सर्व बालकाना प्रारंभिक बालसंगोपन व शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी राज्य प्रयत्न करेल.

(८) कलम ५१() - ६ ते १४ वर्षांपर्यंतच्या प्रत्येक बालकाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे प्रत्येक माता-पित्याचे आणि पालकांचे कर्तव्य आहे.

**क. बाल हक्कांशी निगडीत महत्वपूर्ण कायदे**

बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणारे महत्वपूर्ण कायदे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) लैगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२

(२) लैगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण नियम, २०१२

(३) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०००

(४) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) दुरुस्ती अधिनियम, २००६

(५) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०११

(६) बालकांच्या हक्कांच्या रक्षणासाठीचा राष्ट्रीय आयोग अधिनियम, २००५

(७) बाल हक्कांच्या रक्षणासाठीचा राष्ट्रीय आयोग नियम, २००६

(८) बाल हक्कांच्या रक्षणासाठीचा राष्ट्रीय आयोग (दुरुस्ती) अधिनियम, २००६

(९) बालविवाह नियंत्रण अधिनियम, १९२९

(१०) बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, १९९२

(११) 'अर्भक दुग्ध पर्याय अधिनियम, १९९२

(१२) अर्भक दुग्ध पर्याय अधिनियम, २००३

(१३) अनैतिक दुर्व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६

**क. बालकांच्या हक्क संरक्षणासाठीचे आयोग**

बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात महत्वाची भूमिका असणाऱ्या राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग व राज्य बालहक्क संरक्षण आयोगाची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**१. राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग**

राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ अंतर्गत ५ मार्च, २००७ रोजी करण्यात आली. बालकांच्या घटनात्मक कायदेशीर हक्कांचे सरक्षण अंमलबजावणी करणे. तसेच बालकांविषयक धोरणांची व कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे हे आयोगाचे मुख्य कार्य आहे. राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग (National Commission for Protection of Child Rights - NCPCR) ही एक वैधानिक संस्था आहे.

**आयोगाची रचना**

(१) आयोगामध्ये एक अध्यक्ष व ६ सदस्य असतात.

(२) ६ सदस्यांपैकी कमीत कमी २ महिला सदस्य असल्या पाहिजे.

(३) बालकल्याण क्षेत्रात मौत्रिक योगदान दिलेल्या व्यक्तीची अध्यक्षपदी नेमणूक केली जाते.

(४) ६ सदस्य हे शिक्षण, बालआरोग्य, समाजकार्य क्षेत्रातील नेमले जातात.

**नेमणुकीची पद्धती**

केंद्रशासनाकडून बालहक्क आयोगाचे अध्यक्ष व ६ सदस्यांची नेमणूक केली जाते. तसेच महिला व बालविकास मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रशासनाने नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय निवड मंडळाच्या शिफारशीनुसार अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक केली जाते.

**आयोगाच्या सदस्यांचा कार्यकाल**

(१) आयोगाच्या अध्यक्षांसाठी ६५ वर्षे व सदस्यांसाठी ६० वर्षे वयोमर्यादा आहे.

(२) आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचा कार्यकाल ३ वर्षांचा असतो.

(३) आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांना दोनपेक्षा जास्त वेळा नेमता येत नाही.

(४) आयोगाचे अध्यक्ष व सदस्य केंद्रशासनाकडे राजीनामा पाठवून कधीही पदत्याग करू शकतात.

**आयोगाची कार्ये**

(१) बालहक्कांच्या उल्लंघनाच्या प्रकरणाची चौकशी करणे व त्याबाबत शासनाला कार्यवाहीची शिफारस करणे.

(२) बालसंरक्षणाशी संबंधित कायद्यांचे परीक्षण व पुनरावलोकन करतो व त्यांच्या अंमलबजावणीसाठी उपाययोजना करतो.

(३) बालहक्कांबाबत समाजात जनजागृती करणे.

(४) बालहक्क क्षेत्रात संशोधनाला प्रोत्साहन देणे.

(५) बाल निरीक्षण गृहे, बालकांची आरोग्य केंद्रे व विविध संस्था यांना अचानक भेटी देऊन तपासणी करणे.

**आयोगाचे अधिकार**

राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाला कायद्यान्वये दिवाणी न्यायालयाचे पुढील अधिकार प्राप्त झाले आहे.

(१) कोणत्याही व्यक्तीस न्यायालयात उपस्थित राहण्याचे आदेश देणे.

(२) कोणत्याही संस्थेत विशिष्ट कागदपत्रे सादर करण्यास सांगणे.

(३) कोणत्याही न्यायालयातून व कार्यालयातून सार्वजनिक अभिलेख मागविणे.

**आयोगाचा वार्षिक अहवाल**

आयोग प्रत्येक वर्षाचा वार्षिक अहवाल ३१ डिसेंबर पूर्वी केंद्रशासनाला सादर करतो. केंद्रशासन आयोगाचे वार्षिक व विशेष अहवाल संसदेपुढे मांडण्याची व्यवस्था करते.

**२. महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग**

बालहक्क संरक्षण कायदा, २००५ अन्वये महाराष्ट्रात जलै २००७ मध्ये राज्य बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या विविध बालहक्कविषयक मानाकनानुसार राज्य बालहक्क आयोगा-कडून विविध उपक्रम राबविले जातात.

केंद्र सरकारने पारित केलेल्या बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ अनुसार राज्यात कलम १७ अन्वये महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग स्थापन करण्यात आला आहे.

**राज्य बालहक्क आयोगामध्ये पुढील सदस्यांचा समावेश होतो.**

(अ) आयोगाचे अध्यक्ष हे बालकल्याणाच्या क्षेत्रात कार्य करणारे विख्यात व्यक्ती असतात.

(ब) राज्य सरकारद्वारे या आयोगात ६ सदस्यांची नेमणूक केली जाते, त्यामधील कमीत कमी २ महिला सदस्य असतात. त्याचप्रमाणे बालहक्क संरक्षण आयोगाला एक सचिव देखील असतो.

**नियुक्तीची पद्धती**

राज्य सरकारकडून अधिसूचनेद्वारे बालहक्क आयोगाच्या अध्यक्षाची नियुक्ती केली जाते. अध्यक्ष नियुक्तीसाठी महिला व बालविकास खात्यांच्या मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती केली जाते.

**कार्यकाल**

अध्यक्ष व सदस्य यांचा पदग्रहण केल्यापासूनचा कार्यकाल ३ वर्षांचा असतो. तसेच अध्यक्ष व सदस्यांना दोन पेक्षा अधिक वेळा हे पद धारण करता येत नाही.

**वार्षिक अहवाल**

राज्य बालहक्क सरक्षण आयोग प्रत्येक वर्षी आपल्या कामकाजाचा अहवाल राज्य सरकारला सादर करतो.

**राज्य बालहक्क संरक्षण आयोगाची कार्ये**

(१) सरकार किंवा सबंधित यंत्रणेला बालहक्क संरक्षण-विषयक शिफारशी करणे.

(२) बालहक्काची पायमल्ली करणाऱ्या व्यक्ती अथवा यंत्रणांविरुद्ध कारवाईची शिफारस करणे.

(३) बालहक्क सरंक्षणविषयक आदेश अथवा अर्जाबाबत सर्वोच्च अथवा उच्च न्यायालयाकडून मार्गदर्शन घेणे.

(४) बालहक्कविषयक तक्रारींची जाहीर सुनावणी घेऊन शिफारशी करणे.

(५) बालहक्कविषयक कायद्यांचा आढावा घेणे आणि समित्यांच्या माध्यमातून चिल्ड्रन होमची पाहणी करणे व बालहक्क-विषयक घटकांची आकडेवारी गोळा करून शिफारशी करणे.

(६) बालहक्कविषयक आंतरराष्ट्रीय करारांचा अभ्यास करणे आणि सध्याची धोरणे, उपक्रम यांचा आढावा घेऊन बालकांच्या हिताकडे सर्वाधिक लक्ष देणे.

(७) समाजाच्या अनेक स्तरावर बालहक्कविषयक साहित्याचा प्रसार व त्यासाठी प्रकाशन, प्रसारमाध्यमे आणि परिसंवाद आदींचा उपयोग करणे.

(८) बालहक्काचा भंग झालेल्या प्रकरणांची स्वतःहून दखल घेऊन त्याचा तपास करणे.

(९) बालहक्क कायदा, २००५ अंतर्गत कलम १४ आणि २४ यांनुसार १४ वर्षांखाली असलेल्या मुलांना सक्तीने शिक्षण देण्याची तरतूद करणे.

(१०) राज्य सरकार अथवा अन्य यंत्रणांच्या नियंत्रणाखालील बालगुन्हेगार कोठड्यांची तपासणी करणे.

(११) बालकांविषयक सुरक्षा उपायांची नियमितपणे आणि दरवर्षी अहवाल प्रकाशित करणे.

(१२) मुलांच्या हक्कांना बाधा आणणाऱ्या दहशतवाद, कौटुंबिक हिंसाचार, छळ व पिळवणूक यांचा अभ्यास करून बालकविषयक उपाययोजनांबाबत शिफारशी करणे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १**

१. **भारतीय राज्यघटनेतील कोणत्या कलमानुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे** प्राथमिक शिक्षण दिले जाते?

अ. कलम २१ ए ब. कलम २२

क. कलम २३ ड. कलम २४

२. **लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम ---- वर्षातील आहे?**

अ. २०१२ ब. २०१३

क. २०१४ ड. २०१५

३. **राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना कधी झाली?**

अ. २००७ ब. २००८

क. २००९ ड. २०१०

४. **बालहक्क आयोगाची कार्ये खालीलपैकी कोणती आहेत?**

अ. बालहक्क उल्लंघण प्रकरणांची चौकशी करणे

ब. बालकांबाबत समाजात जनजागृती करणे

क. बालक क्षेत्रात संशोधनाचा प्रोत्साहन देणे

ड. वरील सर्व

५. **राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगात अध्यक्ष व ------सदस्य असतात.**

अ. ६ ब. ७ क. ८ ड. ९

### २.२.२. महिलांचे मानवी हक्क

पारंपारिक भारतीय समाजात अशा अनेक धार्मिक व सामाजिक प्रथा रूढ होत्या की, ज्यामुळे स्त्रियांना दुय्यम लेखण्याची मानसिकता आजही समाजात असल्याचे दिसते. भारतीय समाजात पूर्वीच्या काळात प्रचलित असलेल्या सतीची चाल, स्त्री-भ्रूणहत्या, बालविवाह, विधवाविवाहास प्रतिबंध, केशवपन, स्त्रियाना शिक्षण घेण्यास प्रतिबंध, बहु-पत्नीविवाह यासारख्या चालीरीती, रुढींचा स्त्रियांच्या जीवनावर किती विपरीत परिणाम झाला असेल याची केवळ कल्पना देखील आपणास आजच्या काळात करवत नाही.

आज एकविसाव्या शतकातही भारतीय महिलांना अनेक प्रकारच्या गंभीर समस्यांशी झुंज द्यावी लागत आहे. रोज वृत्तपत्रात महिला अत्याचाराच्या बातम्या येतांना दिसतात. यावरून पुरुषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अद्यापही पुरेसा निकोप नाही हे लक्षात येते. अगदी प्राचीन काळापासून स्त्रिया सामाजिक व कौटुंबिक अन्यायाच्या बळी ठरल्या होत्या, पारंपरिक भारतीय समाजात तर स्त्रियांना अनेक हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते इतकेच नव्हे तर, स्त्री ही पुरुषाच्या मार्गातील अडसर आहे अशा दृष्टिकोनातून स्त्रियांकडे पाहिले जात होते. परिणामी, भारतीय समाजातील एक दुर्बल व अन्यायग्रस्त घटक अशी स्थिती त्यांना प्राप्त झाली होती. जगातील इतर देशातील स्त्रियांची अवस्थाही यापेक्षा फारशी वेगळी नव्हती. साधारणतः विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून स्त्रियांच्या अवस्थेत व सामाजिक स्थानात बदल होऊ लागला. मानवी हक्क विषयक जागृतीमुळे

स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातही परिवर्तन होण्यास याच सुमारास सुरुवात झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान युरोपीय समाजात निर्माण झालेल्या विशिष्ट परिस्थितीमुळे स्त्रियांना अर्थार्जनासाठी घराच्या चार भिंतींच्या बाहेर पडणे भाग पडले. त्यातून त्यांना थोडेफार आर्थिक स्वावलंबन लाभले. स्त्रियांच्या स्थितीत बदल होण्यास हा घटक प्रामुख्याने कारणीभूत ठरला होता.

अर्थात, स्त्रिया घराच्या बाहेर पडू लागल्या तरी स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व समाजाच्या गळी लगेच उतरणे शक्य नव्हते. स्त्रियांना दुय्यम लेखण्याच्या पुरुषांच्या वृत्तीतही फारसा फरक पडला नव्हता. त्यांच्या हक्कांच्या प्रश्नाकडे विशेष गांभीर्याने पाहिले जात नव्हते. अशा परिस्थितीत स्त्रियांच्या हक्कांच्या प्रश्नाला चालना देण्याच्या कामी संयुक्त राष्ट्रांनी पुढाकार घेतला. संयुक्त राष्ट्रांच्या प्रयत्नामुळेच स्त्रियांचे मानवाधिकार या प्रश्नाकडे जागतिक समुदायाचे लक्ष वेधले गेले.

**महिलांचे मानवी हक्क**

**अ. भारतीय राज्यघटनेत नमूद महिलांचे मानवी अधिकार**

(१) आपल्या घटनेने महत्त्वाची घटनात्मक पदे भूषविण्यास महिलांना पात्र ठरविले आहे. राष्ट्रपतिपद, पतप्रधानपद, सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाचे पद, मुख्य निर्वाचन आयुक्ताचे पद, महालेखापरीक्षकाचे पद यांसारखी सर्व महत्त्वाची घटनात्मक अधिकारपदे प्राप्त करण्याचा हक्क महिलांना मिळाला आहे.

(२) भारतीय राज्यघटनेत असे स्पष्टपणे म्हटले आहे की, राज्य नागरिकांमध्ये धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यांपैकी कोणत्याही आधारावर भेदभाव करणार नाही.

(३) भारतीय घटनेने नागरिकांना संधीची समता दिली असून त्या संदर्भात असे नमूद करण्यात आले आहे की, कोणत्याही नागरिकाला धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान, वास्तव्याचे ठिकाण या किंवा यांपैकी कोणत्याही एका कारणावरून राज्याच्या नियंत्रणाखालील पद मिळविण्यास अपात्र ठरविले जाणार नाही.

(४) आपल्या राज्यघटनेत नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांचा (भाग ४ए, कलम ५१ए) समावेश करण्यात आला आहे. राज्यघटनेच्या या भागातही महिलांना समानतेची वागणूक देण्यासंबंधी आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासंबंधी उल्लेख आहे.

(५) मूलभूत कर्तव्यांपैकी एक कर्तव्य असे सांगितले आहे की, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक किंवा वर्गीय भेदभावाच्या पलीकडे जाऊन सर्व भारतीय जनतेत ऐक्य व बंधुभावाची भावना वाढीस लावली जावी तसेच स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करावा.

(६) राज्यघटनेच्या सरनाम्यात दिलेल्या सामाजिक व आर्थिक न्यायाच्या अभिवचनाची पूर्तता करण्यासाठी घटनाकारांनी मार्गदर्शक तत्त्वांची योजना केली आहे. मार्गदर्शक तत्त्वांतही स्त्री-पुरुष समानता आणि स्त्रियाच्या हक्कांचे रक्षण यांवर भर दिला असल्याचे दिसून येते. खाली दिलेली मार्गदर्शक तत्त्वे स्त्री-पुरुष समानता व स्त्रियांच्या हक्काचे रक्षण यांवर भर देतात.

I. स्त्री-पुरुष सर्व नागरिकांना उपजीविकेची पुरेशी साधने उपलब्ध होण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी राज्याकडून प्रयत्न केला जाईल. कलम (३९ (E))

II. स्त्री व पुरुष यांना समान कामासाठी समान वेतन मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. (कलम ३९(डी))

III. स्त्री-पुरुष कामगारांचे आरोग्य आणि शक्ती तसेच मुलांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग केला जाणार नाही, याची काळजी घेतली जाईल. (कलम ३९(ई).)

IV. सहा वर्षांखालील सर्व बालकाची पूर्वबाल्यावस्था देखरेख व शिक्षा यांसाठी राज्य प्रयत्न करील. (कलम ४५)

(१२) भारतीय राज्यघटनेने प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वाचा स्वीकार केला आहे; त्यामुळे देशातील सर्व प्रौढ स्त्री-पुरुषाना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे. स्त्रियांच्या हक्कांच्या संदर्भात ही तरतूद विशेष महत्त्वपूर्ण म्हणावी लागते. प्रौढ मताधिकारामुळे राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असा अधिकार पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियानाही मिळाला असल्याने स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित होण्यास मोठा हातभार लागला आहे.

(१३) त्र्याहत्तराव्या घटनादुरुस्ती कायद्यान्वये पंचायत राज्यसंस्थांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रात तर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांसाठी जागा एक-द्वितीयांश जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

(१४) चौऱ्याहत्तराव्या घटनादुरुस्तीन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**ब. महिलांच्या सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण**

केंद्र सरकारने २००१ मध्ये महिला सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण जाहीर केले. या धोरणाचे उद्दिष्ट महिलांचे सबलीकरण व विकास घडवून आणणे, महिलांविरुद्ध करण्यात येणारा सर्व प्रकारचा भेदभाव दूर करणे आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांत महिलांचा सक्रिय सहभाग वाढविणे हे आहे. त्याकरिता एक राष्ट्रीय कृती कार्यक्रमही निश्चित करण्यात आला आहे. त्यामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची माहिती घेणे, अन्यायग्रस्त स्त्रियांना न्याय मिळवून देणे, स्त्रियाना शासकीय धोरणे व योजना यांचा लाभ मिळवून देणे, विविध संस्था, संघटना, मंडळे, आयोग यामध्ये स्त्रियांना अधिकारपदे मिळवून देणे, स्त्रियांना उद्योग व व्यवसाय करण्यासाठी वित्तीय संस्था व बँका यांच्यामार्फत अर्थसाहाय्य उपलब्ध करून देणे, स्त्रियांना व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रशिक्षण देणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना मदत करणे, नोकरी करणाऱ्या महिलांना नोकरीच्या ठिकाणी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

**क. महिलांचे हक्क संरक्षणविषयक आयोग**

**१. राष्ट्रीय महिला आयोग**

सन १९९० च्या राष्ट्रीय महिला आयोग कायद्यांतर्गत भारत सरकारने १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील-

(१) महिलांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदींचे अध्ययन करून त्यावर लक्ष ठेवणे.

(२) महिलांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या कायद्यांचे दुरुस्त्या सुचविणे, पुनरावलोकन करून त्यात आवश्यकतेनुसार

(३) महिलांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांच्याशी अध्ययन करणे.

(४) महिलाच्या हक्कांचे रक्षण करणे, त्याकरिता महिला हक्काचे उल्लघन झाल्यासंबंधीच्या घटनाची दखल घेऊन त्याबाबत चौकशी करणे.

(५) महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी त्यांच्याकडून आलेल्या विनंती अर्जावर विचार करणे व त्यासंबंधी योग्य ती कारवाई करणे.

(६) असहाय्य व गरजू स्त्रियांना कायदेविषयक अथवा अन्य बाबींची मदत करण्यासाठी पुढाकार घेणे.

(७) महिलांना सन्मानाची वागणूक देण्याबद्दल लोकांत जाणीव निर्माण करणे, इत्यादी.

**२. महाराष्ट्र राज्य महिला आयोग**

देशात सन १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना झाल्यानंतर घटक राज्यांनी राज्य महिला आयोगाची स्थापना करावी, अशी मागणी पुढे आली. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने २५ जानेवारी, १९९३ रोजी अध्यादेशान्वये महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना केली. पुढे २५ एप्रिल, १९९३ रोजी राज्यशासनाने महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम पारित केला. राज्य महिला आयोग ही एक वैधानिक संस्था असून आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे आहे.

**रचना**

महिला आयोगामध्ये अध्यक्ष, सहा गैर सदस्य, एक सदस्य सचिव आणि राज्याच्या पोलीस महासंचालकांचा समावेश असतो.

**आयोगाची मुख्य उद्दिष्टे**

(१) समाजामध्ये स्त्रियांचा आत्मसन्मान व दर्जा सुधारणे.

(२) स्त्रियांना मिळणारी मानहानीची वागणूक थांबवून त्यांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी उपाय सूचविणे.

(३) स्त्रियांसाठी असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी होण्यावर लक्ष ठेवणे.

(४) स्त्रियांचा आत्मसन्मान आणि दर्जा सुधारण्यासाठी शासनाला मार्गदर्शन करणे.

**३. महिलांसाठी विशेष न्यायालये**

राज्यात महिलांसाठी तेरा विशेष न्यायालये अहमदनगर, औरंगाबाद, अकोला, अमरावती, बुलढाणा, बीड, जळगाव, नागपूर, यवतमाळ, ठाणे, पुणे, कोल्हापूर व मुंबई येथे स्थापन करण्यात आली आहेत. या न्यायालयामध्ये भारतीय दंडसंहिता कलम ४९८ (ए), ३०६ (बी), ३७५ व महिलांवरील अत्याचार विषयक इतर तक्रारी दाखल केल्या जातात.

**४. महिलांसाठी कौटुंबिक न्यायालये**

कौटुंबिक न्यायालये अधिनियम, १९८४ अन्वये भारतात कौटुंबिक न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील पहिले महिला कौटुंबिक न्यायालय सन १९८८ मध्ये पुणे येथे स्थापन झाले. पुढे सन १९८९ मध्ये मुबई येथे दुसरे न्यायालय स्थापन करण्यात आले. आजमितीस राज्यात सोळा महिला कौटुंबिक न्यायालये कार्यरत आहेत.

## ड. महिला हक्कांच्या संरक्षणासाठी महत्वपूर्ण कायदे

### १. हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१

हुंडा पद्धतीच्या दुष्परीणामाचा विचार करून भारतीय संसदेने ई.स. १९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक अधिनियम केला. या कायद्याने हुंडा देणे अथवा घेणे तसेच हुंड्याची मागणी करणे या बाबी शिक्षेस पात्र ठरविल्या असून त्यासंबधी शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

### २. हुंडा प्रतिबंधक (दुरुस्ती) अधिनियम, १९८६

भारतीय संसदेने इ.स. १९८६ मध्ये हुंडापद्धतीला आळा घालण्यासाठी हुंडा प्रतिबंधक (दुरुस्ती) अधिनियम, १९८६ हा महत्वपूर्ण कायदा पारित केला. हुंड्यासाठी स्त्रीचा बळी घेणाऱ्या म्हणजे तिच्या मृत्यूस कारणीभूत होणाऱ्या व्यक्तींना कठोर शासन दिले जावे असा या कायद्याचा मुख्य उद्देश होता. या अधिनियमानुसार हुंडाबळीसाठी जी कोणी व्यक्ती जबाबदार असेल अशा व्यक्तीला कमीत कमी सात वर्षे तुरुंगवासाची कि जी गुन्ह्याच्या स्वरूपानुसार जन्मठेपेपर्यंत वाढविली जाऊ शकते अशी शिक्षा सुनावली जाते.

### ३. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

भारतीय संसदेने इ.स. २००५ मध्ये स्त्रियांचे कौटुंबिक अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी हा कायदा पारित केला आहे. या कायद्यानुसार महिलांच्या शारीरिक किंवा मानसिक आरोग्यास, सुरक्षिततेस, जीवितास धोका पोहोचवण्याचा उद्देश असेल आणि त्यामध्ये शारीरिक, लैंगिक, भावनात्मक व लैंगिक गैरवर्तन यांचा समावेश असेल तर या कायद्यानुसार संबधित व्यक्तीस तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. या कायद्यानुसार पिडीत व्यक्ती किंवा स्त्री हि नुकसान भरपाई किंवा मोबदला या स्वरूपात मदतीची मागणी करून शकते. न्यायालयाला अर्ज प्राप्त होताच तीन दिवसांचे आत सुनावणीची पहिली तारीख दंडाधिकारी निश्चित करतात.

### ४. गुन्हेगारी कायदा (सुधारणा)

देशातील सर्व स्तरातील महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला आळा घालण्यासाठी २ एप्रिल २०१३ रोजी गुन्हेगारी कायदा (सुधारणा) अधिनियम २०१३ पारित करण्यात आला आहे. या कायद्यात बलात्काराऐवजी 'लैंगिक अत्याचार' असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. या कायद्यानुसार महिलेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या पुरुषाविरुद्ध गुन्हा सिद्ध झाल्यास त्यास कमीत कमी २० वर्षे सक्तमजुरीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. तसेच गुन्हा गंभीर स्वरूपाचा असेल तर त्यास जन्मठेप किंवा मृत्यूदंड पर्यंत शिक्षा वाढविली जाऊ शकते.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**१. राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना कधी झाली?**

अ. १९९२ ब. १९९४

क. १९९६ ड. १९९८

**२. राष्ट्रीय महिला आयोगाची कार्ये कोणती आहेत?**

अ. महिलांच्या समस्या सोडविणे

ब. महिलांच्या हक्काचे संरक्षण करणे

क. गरजू महिलांना कायदेशीर मदत करणे

ड. वरील सर्व

**३. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना कधी करण्यात आली?**

अ. १९९३ ब. १९९४

क.१९९५ ड.१९९६

**४. महाराष्ट्रात पहिले कौटुंबिक न्यायालय कोठे स्थापन करण्यात आले?**

अ. १९८४ ब. १९९४

क.१९९५ ड.१९९६

**५. महिला सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण कधी जाहीर करण्यात आले?**

अ. २००१ ब. १९९४

क.१९९५ ड.१९९६

**२.२.३. अल्पसंख्याकांचे मानवी अधिकार**

भारतीय राज्यघटनेने न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांचा अंगिकार केला आहे. त्यादृष्टीने भारतीय राज्यघटनेत आदिवासी, मागासवर्गीय व अल्पसंख्याक यांना शिक्षणाची समान संधी देण्याच्या दृष्टीने विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. भारत सरकारने मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी व जैन या सहा धार्मिक समुदायांना अल्पसंख्याक समाजाचा दर्जा दिला आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या लोकसंख्येत मुस्लिमांची लोकसंख्या १४.२ टक्के, ख्रिश्चन २.३ टक्के, शीख १.७ टक्के, बौद्ध ०.७ टक्के, जैन ०.४ टक्के आहेत. गोपालसिंह समितीने मुस्लीम व नवबौद्ध या धार्मिक अल्पसंख्याक यांना शैक्षणिकदृष्ट्या मागास म्हटले आहे. भारतीय घटनेनुसार कोणत्याही समाजाला अल्पसंख्याक दर्जा देण्यासाठी धार्मिक व भाषिक आधार मानला गेला आहे.

**अल्पसंख्याकाची व्याख्या**

(१) ‘भारतासारख्या खंडप्राय देशात जे लोक निवासी संख्येने कमी आहेत अशा लोकांना अल्पसंख्याक म्हणून राज्यघटनेत संबोधले आहे.’

(२) ‘अल्पसंख्याक म्हणजे सर्वसाधारण धर्म किंवा भाषा यांच्याशी एकत्व पावलेल्या नागरिकांचा वेगळा गट होय.’

**अल्पसंख्यांकांच्या शिक्षणविषयक समस्या**

(१) अल्पसंख्याक मुलांसाठी त्यांच्या मातृभाषेतून शिक्षणाचा अभाव असलेला आपल्याला दिसतो.

(२) तसेच अल्पसंख्याकांमधील मुस्लीम, बौद्ध समाज असे आहेत की, ज्यामध्ये अजूनही शिक्षणाचा पाहिजे तेवढा प्रसार झालेला नाही.

(३) तसेच अल्पसंख्याक लोकांच्या भाषेत पाठ्यपुस्तके उपलब्ध नाहीत. त्याची कमतरता जाणवते.

(४) अल्पसंख्याक समाजाच्या भाषा विषयाच्या शिक्षकांची कमतरता आहे.

(५) भारतीय राज्यघटनेतील शैक्षणिक अधिकाराची माहिती बहुतेक अल्पसंख्याक गटांना नाही.

(६) मुस्लीम समाजामध्ये मुलींना शिक्षण देण्याबाबत उदासीनता दिसून येते.

(७) आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणारे अल्पसंख्याक पुरेसे शिक्षण घेऊ शकत नाही.

(८) अल्पसंख्याक समाजाच्या भाषेमध्ये पुरेशी ग्रंथालये, वाचनालये व तंत्रशिक्षणाची सोय नाही.

**सच्चर समितीचा अहवाल**

मुस्लिमांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्र शासनाने २००५ मध्ये न्या. राजिंदर सच्चर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने सर्वेक्षण करून मुस्लिमांचे शासकीय नोकरीतील प्रमाण ४.९ टक्के इतके कमी असल्याचे सांगितले. तसेच समितीने मुस्लीम समाजातील पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या व्यक्तींची संख्या ३.४ टक्के इतकीच असल्याचे नमूद केले आहे.

**अल्पसंख्याकांचे मानवी हक्क**

**अ. भारतीय राज्यघटनेतील अल्पसंख्याक हक्कविषयक तरतुदी**

(१) भारतीय राज्यघटनेच्या कलम २९ मध्ये अल्प-संख्याकांना आपली भाषा, लिपी व संस्कृतीचे संरक्षण करण्याचा अधिकार देण्यात आला आहे, तसेच शासकीय किंवा शासन अनुदानित शिक्षणसंस्थांमध्ये कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जाती, भाषा इत्यादींच्या आधारावर प्रवेश नाकारला जाणार नाही.

(२) भारतीय राज्यघटनेच्या कलम ३० मध्ये धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांना आपल्या आवडीच्या शिक्षण संस्था स्थापन करण्याचा व प्रशासित करण्याचा अधिकार देण्यात आला आहे

(३) भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५० अ मध्ये भाषिक अल्पसंख्याकांच्या मुलांसाठी मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणाच्या पर्याप्त सुविधा निर्माण करण्याची जबाबदारी राज्य तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकण्यात आली आहे.

**ब. राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोग**

११ नोव्हेंबर, २००४ रोजी राष्ट्रीय अल्पसंख्याक संस्था आयोग (National Commission for Minority Educational Institutions) स्थापन करण्यात आला. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३० नुसार धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांना आपल्या आवडीच्या शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार दिला आहे. या अधिकाराबाबत संरक्षण करणे व त्याबाबत केंद्र व राज्य सरकारला सल्ला देण्याचे कार्य आयोगाकडून केले जाते.

**क. राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग**

'राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग कायदा, १९९२' यानुसार १९९३ साली राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना करण्यात आली.

**आयोगाची रचना : अध्यक्ष + उपाध्यक्ष + ५ सदस्य**

अध्यक्षांसहीत सदस्यांमध्ये प्रत्येकी एक सदस्य हा अल्पसंख्यांक समुदायातील असावा. आयोगातील अध्यक्ष व सदस्य यांचा कार्यकाल ३ वर्षांचा असतो.

**आयोगाची कार्ये :**

१) केंद्र आणि राज्यांतर्गत अल्पसंख्यांकाच्या विकासाच्या प्रगतीचे मुल्यांकन करणे.

२) घटना/संसद/राज्य विधीमंडळाद्वारे केलेल्या कायद्यांमध्ये नमूद केलेल्या संरक्षणांवर देखरेख ठेवणे.

३) केंद्र किंवा राज्य सरकारांना अल्पसंख्यांकांच्या अधिकारांच्या संरक्षाणासाठी प्रभावी उपाय योजना राबवण्यासाठी शिफारस करणे.

४) अल्पसंख्यांकांच्या सामाजिक-आर्थिक आणि शैक्षणिक विकासाशी संबंधीत विषयांवर अभ्यास संशोधन व विश्लेषण इ. चे आयोजन करणे.

५) केंद्र सरकारला दरवर्षी आपला वार्षिक अहवाल सादर करणे

**ड. अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी पंतप्रधान नवीन १५ कलमी कार्यक्रम**

जून, २००६ मध्ये अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली. या कार्यक्रमाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.

(१) शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध करणे.

(२) नोकऱ्यांमध्ये अल्पसंख्याकांना न्याय्य वाटा देणे.

(३) अल्पसंख्याक संस्थांना पायाभूत सुविधा पुरविणे.

(४) जातीय हिंसेस प्रतिबंध करणे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ३**

**१. भारत सरकारने किती धार्मिक समुदायांना अल्पसंख्याक समाजाचा दर्जा दिला आहे?**

अ. ६ ब. ४

क. ३ ड. २

**२. भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या कलमानुसार अल्पसंख्याकांना आपली भाषा, लिपी व संस्कृतीचे संरक्षण करण्याचा अधिकार दिला आहे?**

अ. कलम २९ ब. कलम ३१

क. कलम ३२ ड. कलम ३५

**३. मुस्लिमांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीची पाहणी करण्यासाठी न्या. सच्चर समिती केंद्र शासनाने कधी नेमली?**

अ. २००५ ब. २००४

क. २००३ ड.२००२

**४. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाची नियुक्ती कोणाकडून करण्यात येते?**

अ. केंद्र शासन ब. राज्य शासन

क. राष्ट्रपती ड. पंतप्रधान

**५. भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या कलमानुसार भाषिक व धार्मिक संस्था स्थापन करण्याचा अधिकार आहे?**

अ. कलम ३० ब. कलम ३२ क. कलम ३४ ड. कलम ३६

### २.२.४. दिव्यांगाचे मानवी अधिकार

शरीराचा एखादा अवयव, किंवा मानसिक क्षमता एखाद्याला नसणे किंवा शारीरिक व्याधी असणे ही व्यक्तीच्या आयुष्यात सर्वांत वाईट बाब असते. ही त्रुटी नैसर्गिकपणे वा अनपेक्षित, दुर्दैवी अपघाताने निर्माण झालेली असू शकते. सन २०१५ पासून माननीय पंतप्रधान यांनी अपंगांसाठी दिव्यांग (Extra gifts) हा नवीन शब्द सांगितला आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात २ कोटी ६८ लक्ष लोक दिव्यांग असून त्यांचे लोकसंख्येतील एकूण प्रमाण २.२१ टक्के आहे. अपंग व अक्षम लोकाचे कल्याण हे अतिशय आव्हानात्मक कार्य आहे. सर्व नागरिक, स्वयंसेवी संघटना आणि शासन यांना या संदर्भात त्यांच्या जबाबदारीची जाणीव होईल, तेव्हा या कार्याची पूर्तता होऊ शकेल.

इ. स. १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी पारित केलेल्या अपंगांच्या हक्कांच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे, 'आर्थिक सामाजिक नियोजनाच्या सर्व टप्प्यांवर अपंग व्यक्तींना त्याच्या खास गरजांचा विचार करायला लावण्याचा अधिकार आहे.' संयुक्त राष्ट्रांनी १९८१ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय अपंग वर्ष' म्हणून घोषित केले होते 'जागतिक अपंग दिवस' दरवर्षी ३ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. अपंगांच्या गरजा व त्याच्या समस्या यासंदर्भात लोकामध्ये जाणीव निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

आरोग्यसंपन्न व्यक्तींइतक्याच अपंग व्यक्तीही समाजाचे महत्त्वाचे अंग आहे. त्यांच्या उद्धारासाठी व पुनर्वसनासाठी आटोकाट प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे. अपंगांना जगण्याचा उत्साह असतो. त्यांच्यावर सोपवलेले काम ते अन्य व्यक्तींप्रमाणेच परिणामकारकतेने करू शकतात, हे सिद्ध करण्याची त्यांना संधी हवी असते. थोड्याशा मदतीने ते आपल्या शारीरिक अडचणीवर मात करू शकतात.

#### अपंगत्वाचा अर्थ

अपंगत्वाचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी अपंग व्यक्ती कोणाला म्हटले जाते, हे पाहावे लागते. अपंग व्यक्ती शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या दुर्बल असतात. सामान्यतः अपंग व्यक्तीच्या शरीराचा एखादा अवयव किंवा काही अवयव अंशतः किंवा पूर्णतः निकामी झालेले असतात. काही व्यक्ती मानसिकदृष्ट्या विकलांग असतात; म्हणजे अशा व्यक्तींच्या मेंदूचे कार्य योग्य प्रकारे अथवा पुरेशा कार्यक्षमतेने चालत नाही; त्यामुळे त्यांना इतर सर्वसामान्य माणसाप्रमाणे वागणे शक्य होत नाही.

अपंग व्यक्ती शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या दुर्बल असल्याने त्यांच्यावर काही मर्यादा पडणे स्वाभाविक असते. त्यांच्याकडे इतर सामान्य माणसांइतकी कार्यक्षमता नसते. शारीरिक दुर्बलतेमुळे त्यांना काही कार्ये इतर सामान्य माणसांप्रमाणे करता येत नाहीत. दुसऱ्या शब्दांत असे म्हणता येईल की, अपंग व्यक्तींना आपली सामान्य भूमिका व्यवस्थितपणे पार पाडणे शक्य होत नाही.

**अपंगत्वाचे प्रकार**

अपंगत्वाचे शारीरिक अपंगत्व आणि मानसिक अपंगत्व असे दोन प्रकार पाडता येतील.

१. शारीरिक अपंगत्व याचा अर्थ व्यक्तीच्या शरीराचा एखादा अवयव किंवा काही अवयव दुर्बल राहिल्याने अथवा निकामी झाल्याने आलेले अपंगत्व होय. शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तींमध्ये अंध, मूकबधिर, शारीरिकदृष्ट्या अक्षम व्यक्ती इत्यादींचा समावेश होतो.

२. मानसिक अपंगत्व याचा अर्थ व्यक्तीच्या मेंदूच्या कार्यात बिघाड निर्माण झाल्याने आलेले अपगत्व होय. मानसिकदृष्ट्या अपंग व्यक्तीमध्ये मतिमंद व्यक्तींचा व मनोरुग्णांचा समावेश होतो.

**अपंग व्यक्तींचे मानवी हक्क**

अपंग व्यक्तीदेखील इतर सर्वसामान्य माणसांइतक्याच मानवी हक्कांच्या दावेदार आहेत, हे सर्वप्रथम आपण समजावून घेण्याची गरज आहे. त्यांच्या हक्कांचे रक्षण होईल आणि त्यांना त्या हक्कांचा पुरेपूर लाभ घेता येईल हे पाहण्याची जबाबदारी संपूर्ण समाजावर पडते. अपंग व्यक्तीदेखील इतर सर्वसामान्य माणसांप्रमाणेच बहुताशी दैनंदिन व्यवहार करू शकतात.

सन २०११ च्या जनगणनेनुसार एकूण दिव्यांगा-पैकी ४५ टक्के दिव्यांग हे निरक्षर आहे. दिव्यांग व्यक्तींना स्वतःच्या शारीरिक अक्षमतेबरोबर सामाजिक पूर्वग्रहांनाही सामोरे जावे लागते. त्यामुळे दिव्यांग व्यक्तींचे समाजातील स्थान उंचाविण्यासाठी पुढील तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**अ. दिव्यांगाचे हक्काबाबत राज्यघटनेत नमूद तरतुदी**

भारतीय राज्यघटनेत दिव्यांग व्यक्तींच्या अधिकारांबाबत पुढील तरतूद आहे-

(१) घटनेच्या भाग ४ मधील कलम ४१ हे दिव्यांग व्यक्तीबाबत महत्त्वाचे ठरते. या कलमात राज्यसंस्थेस कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क व दिव्यांग व्यक्तींच्या बाबतीत लोक-साहाय्य उपलब्ध करून देण्याबाबत परिणामकारक तरतुदी करण्याचा अधिकार आहे.

(२) तसेच राज्यघटनेच्या परिशिष्ट ७ मधील सूची २ मध्ये दिव्यांग व रोजगारक्षम नसलेल्या व्यक्तींना साहाय्य हा विषय विनिर्दिष्ट केला आहे. या तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तींच्या संरक्षण कल्याण पुनर्वसन व विकास यासाठी शासनाकडून कायदे करण्यात येतात.

**ब. दिव्यांगांशी संबंधित कायदे**

**(१) भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम, १९९२ -**

सदर कायद्यास १ सप्टेंबर, १९९२ रोजी संसदेची मान्यता मिळाली. या कायद्यानुसार दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी भारतीय पुनर्वसन परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. सदर परिषद दिव्यांग व्यक्तींच्या शिक्षण व प्रशिक्षणाची प्रमाणके तयार करते, तसेच दिव्यांग व्यक्तींबाबतच्या विविध कोर्सेसला या संस्थेकडून मान्यता देण्यात येते.

**(२) दिव्यांग व्यक्ती (समान संधी, अधिकारांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ –**
हा देशातील दिव्यांगतेविषयीचा प्रमुख अधिनियम आहे. दिव्यांग व्यक्तींना समान संधी, त्यांच्या अधिकारांचे संरक्षण व राष्ट्र उभारणीमध्ये त्यांचा संपूर्ण सहभाग हे तो अधिनियम सुनिश्चित करतो.

यामध्ये चार प्रकारच्या तरतुदी आहेत–

(अ) दिव्यांगतेच्या सुरुवातीलाच निदान करून त्यावर प्रतिबंधक उपाययोजना करणे.

(ब) दिव्यांग व्यक्तींसाठी शिक्षण, नोकरी, सकारात्मक कृती, निःपक्षपात व सामाजिक सुरक्षितता जपणे.

(क) दिव्यांग व्यक्तींसंदर्भात धोरणविषयक बाबींसाठी केंद्रीय व राज्य स्तरावर समन्वय समित्या व कार्यकारी समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

(ड) या कायद्यानुसार दिव्यांग व्यक्तींना अधिकारां-पासून वंचित ठेवण्याविरुद्धच्या तक्रारींसाठी केंद्रीय स्तरावर ‘दिव्यांग व्यक्तींसाठी मुख्य आयुक्त’ व राज्य स्तरावर आयुक्त यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**(३) निःक्षम व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६**

सदर कायदा संसदेत २०१६ मध्ये पारित झाला असून तो २८ डिसेंबर, २०१६ रोजी अधिसूचित झाला आहे. या कायद्याने पूर्वीच्या १९९५ च्या दिव्यांगविषयक कायद्याची जागा घेतली आहे. या कायद्यातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे आहे–

(A) या कायद्यात निःक्षम व्यक्तींचे हक्क व अधिकार नमूद आहे.

(B) निःक्षमतेचे पूर्वीचे प्रकार ७ हून २१ पर्यंत वाढविण्यात आले आहेत.

(C) दिव्यांग व्यक्तीच्या अधिकाराचे संरक्षण करण्याची जबाबदारी राज्यावर सोपविली आहे.

(D) समावेशक शिक्षण उपलब्ध करून देणे ही शिक्षण संस्थांची जबाबदारी आहे.

(E) दिव्यांग व्यक्तींचे शासकीय संस्थातील आरक्षणाचे प्रमाण ३ टक्के ते ४ टक्के करण्यात आले आहे.

(F) दिव्यांग व्यक्तीचे धोरण तयार करण्यासाठी या कायद्यानुसार केंद्रीय सल्लागार मंडळ व राज्य सल्लागार मंडळ स्थापन करण्यात येणार आहे.

(G) दिव्यांग व्यक्तींना वित्तीय मदत करण्यासाठी केंद्र व राज्य निधी स्थापन करण्याची तरतूद आहे.

(H) दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे उल्लंघनविषयक खटले चालविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात विशेष न्यायालय स्थापन्याची तरतूद आहे

**४. बहुविकलांग कायदा, १९९९**

सन १९९९ मध्ये बहुविकलांग व्यक्तींसाठी बोर्ड ऑफ नॅशनल ट्रस्टची स्थापना करण्यात आली. या बोर्डाची घटना म्हणजे बहुविकलांग कायदा होय. हा कायदा स्वमग्न, पक्षाघात, मतिमंदत्व व बहुविकलांग ग्रस्त व्यक्तीच्या पुनर्वसनासाठी व सक्षमीकरणासाठी करण्यात आला. सदर कायदा हा पालकाच्या माझ्यानंतर माझ्या दिव्यांग बालकाचे काय होणार? या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी कार्यरत आहे.

**क. दिव्यांग व्यक्तींचे राष्ट्रीय धोरण, २००६**

(अ) भारत शासनाने दिव्यांग व्यक्तीच्या भौतिक, शैक्षणिक व आर्थिक पुनर्वसनास अनन्यसाधारण महत्त्व देऊन प्रथम १९९९ व नंतर फेब्रुवारी, २००६ मध्ये राष्ट्रीय दिव्यांगासाठीचे धोरण जाहीर केले.

(ब) या धोरणात अपंग बालक व स्त्रियांचे पुनर्वसन, मुक्त वातावरण, सामाजिक सुरक्षा व संशोधन यांवरही भर देण्यात आला. या धोरणाने दिव्यांगाच्या पुनर्वसनात सकारात्मक बदल झालेले आहे.

(क) या धोरणाच्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व बाबींच्या समन्वयासाठी सामाजिक न्याय व सबली-करण मंत्रालयाचा 'दिव्यांगजन सबलीकरण विभाग' हा नोडल विभाग म्हणून कार्य करतो.

(ड) या धोरणानुसार केंद्रीय समिती राष्ट्रीय धोरणाच्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व बाबींमध्ये समन्वय घडवून आणण्याचे काम करते. अशीच एक समिती राज्य स्तरावरही कार्य करते.

(इ) या धोरणानुसार राष्ट्रीय धोरणाच्या अंमल-बजावणीमध्ये केंद्र स्तरावर निःक्षम व्यक्तींसाठी मुख्य आयुक्त, तर राज्य स्तरावर राज्य आयुक्त महत्त्वाची भूमिका बजावतात.

**स्वयं अध्ययन प्रश्न ४**

**१. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील दिव्यांगाचे लोकसंख्येतील एकूण प्रमाण ----- टक्के आहे.**

अ. २.२१ ब. ४ टक्के

क. ५ टक्के ड. ६ टक्के

**२. माननीय पंतप्रधान यांनी अपंगांसाठी दिव्यांग (Extra gifts) हा नवीन शब्द वापरावा असे कधी सांगितले ?**

अ. २०१५ ब. २०१६ क. २०१७ ड. २०१८

**३. दिव्यांग व्यक्तींचे राष्ट्रीय धोरण कधी जाहीर झाले ?**

अ. २००६ ब. २००७

क. २००८ ड. २००९

**४. निःक्षम व्यक्तींचे हक्क अधिनियम हा कायदा कधीचा आहे ?**

अ. २०१६ ब. २०१७

क. २०१८ ड. २०१९

**५. भारतीय राज्यघटनेच्या कलम------ मध्ये दिव्यांग व्यक्तींस लोकसाहाय्य उपलब्ध करून देण्याबाबत परिणामकारक तरतुदी करण्याचा अधिकार आहे.**

अ. ४१ ब. ४२ क. ४३ ड. ४४

## २.३. सारांश

अशा प्रकारे मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन झाले तरच महिला, बालके, अल्पसंख्याक व दिव्यांग व्यक्तींच्या अधिकारांचे संरक्षण होईल. या व्यक्तींच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत अनेक संरक्षणात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत, त्याचा समाजात प्रचार व प्रसार करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे महिला, बालके व दिव्यांग यांच्या मानवी हक्क संरक्षणाचे कायदे करण्यात आले आहेत, त्याचीही समाजात जनजागृती होणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीने जागरूक राहून आपल्या सभोवताल असणाऱ्या व्यक्तींविषयी समता, बंधुता, एकता व धर्मनिरपेक्षतेची भूमिका ठेऊन वर्तन केले तर यातून मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन घडून येईल.

## २.४. महत्वाच्या संकल्पना

१. महिलांचे हक्क महिलांना समान संधी, सन्मान, सुरक्षितता आणि स्वातंत्र्य मिळण्याचा हक्क, ज्याद्वारे महिला स्वत:ला सक्षम करू शकतात त्यास महिलांचे हक्क म्हणतात.

२. बालकांचे हक्क प्रत्येक मुलाला जन्मापासून ते १८ वर्षे वयापर्यंत सुरुक्षित, सुसंस्कृत, आरोग्यदायी व आनंदी जीवन जगता येण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अधिकारास बालकांचे हक्क म्हणतात.

३. दिव्यांगांचे हक्क अपंगत्व असलेल्या व्यक्तींना इतर सर्व व्यक्तीप्रमाणे समान संधी, सन्मान, स्वातंत्र्य आणि विकास करता येण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अधिकारास दिव्यांगांचे हक्क असे म्हणतात. यासाठी भारतीय राज्यघटनेत दिव्यांगाच्या प्रगतीसाठी संरक्षणात्मक तरतुदी व दिव्यांग हक्क संरक्षण करणारे कायदे करण्यात आले आहेत.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १**

१. २.२१ टक्के

२. दिव्यांग

३. ४१

४. १९८१

५. वरील सर्व

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न २**

१. १९९२

२. वरील सर्व

३. १९९३

४. १९८४

५. २००१

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ३**

१. ६

२. कलम २९

३. २००५

४. केंद्र शासन

५. कलम ३०

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ४**

१. २.२१

२. २०१५

३. २००६

४. २०१६

५. ४१

## २.६ अधिक सरावासाठी प्रश्न

१. भारतीय राज्यघटनेत नमूद बालकांच्या मानवी अधिकारांचे विवेचन करा ?

२. राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाची कार्ये नमूद करा ?

३. महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाची माहिती नमूद करा ?

४. भारतात महिलांना भेडसावणाऱ्या समस्या स्पष्ट करा ?

५. राष्ट्रीय महिला आयोगाच्या कार्याचे विवेचन करा ?

६. महिलांसाठीची विशेष न्यायालये व कौटुंबिक न्यायालये यांची माहिती सांगा ?

७. महिलांच्या सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण २००१ चे विवेचन करा ?

८. भारतातील अल्पसंख्याक समाजाची माहिती नमूद करा ?

९. भारतीय राज्यघटनेतील अल्पसंख्याकांच्या संरक्षणविषयक तरतुदींचे विवेचन करा ?

१०. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे कार्य नमूद करा ?

११. भारतीय राज्यघटनेत नमूद दिव्यांगाचे अधिकार नमूद करा ?

१२. दिव्यांगांशी संबंधित कायद्यांचे थोडक्यात विवेचन करा ?

**२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ**

१. के' सागर (२०१५), समग्र मानवी हक्क, पुणे : के' सागर पब्लिकेशन्स
२. के' सागर (२०१९), संपूर्ण महिला व बालविकास, पुणे : के' सागर पब्लिकेशन्स
३. कुलकर्णी, पी. के (२०१३), मानवी हक्क व सामाजिक न्याय, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स
४. कोतापल्ले, लक्ष्मण (२०११), भारतीय सामाजिक कल्याण, प्रशासन आणि समाजकार्य, औरंगाबाद, विद्या प्रकाशन
५. कपोले, अरविंद (२०१७), भारतीय समाज व शिक्षण, पुणे : निराली प्रकाशन
६. सांगोले, अरुण व अलीगावे महेश (२०१७), भारतीय समाज व शिक्षण, पुणे : सुविचार प्रकाशन
७. मंगळूरकर, मीना व आवटे, कमलादेवी (२०२४), भारतीय समाज व शिक्षण, पुणे : फडके प्रकाशन
८. जाधव, तुकाराम व शिरापूरकर, मानवी हक्क, पुणे : युनिक पब्लिकेशन्स

❑❑❑